नं ४/९६३

सन १९२५ साल

मराठी वाङ्मय

म. का. कारखानीस, बी. ए.

चिटणीस,

डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी, पुणें.

सन १९२७

किंमत १ रु.

नं० / १५८३

प्रस्तावना.

डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटी या सुप्रसिद्ध संस्थेचे एक उत्साही चिटणीस आणि अनुभवी व मार्मिक शिक्षक व लेखक रा. महादेव काशिनाथ कारखानीस, बी. ए. यांनीं इ. स. १९२५ सालांतील मुंबई. व मध्यप्रांतांतील मराठी वाङ्मयाची जंत्री सोसायटीमार्फत प्रसिद्ध केली आहे.

या ग्रंथानें मराठी वाङ्मयाचा अभ्यास करण्यास व आढावा घेण्यास निःसंशय मोठी मदत होईल. सन १९१६ सालीं एकदा असाच उपक्रम करण्याचे हेतूनें एक नुसती नामावळीच प्रसिद्ध केली होती. परंतु ती आश्रयाचे अभावीं तशीच पडून राहिली. तथापि एक संपूर्ण आणि शक्य तर सटीक यादी प्रसिद्ध व्हावी अशी वाढती इच्छा दृष्टयुत्पत्तीस आल्यावरून तसा प्रयत्न रा. कारखानीस यांनीं केला आहे. निरनिराळ्या साहित्यसंमेलनांतून याविषयीं सरकारास विनंति करणारे ठरावही मंजूर झालेले आहेत.

सुमारें २५।३० वर्षांमागें सरकार दर सालांतील वाङ्मयाचा एक सटीक आढावा प्रसिद्ध करीत असे. एक सरकारी अहवाल–लेखक कै. रा. पाटकर हे डे. व्ह. ट्रा. सोसायटीचे एके वेळीं चिटणीसही होते. अहवालाप्रमाणेंच सरकार एक त्रैमासिक यादीही छापून प्रसिद्ध करीत असतें. सन १८९९ नंतर हे अहवाल प्रसिद्ध करण्याचें बंद झाल्यामुळें या बाबतींत आमचे मतें वाङ्मयाभ्यासकांचा मोठाच तोटा झाला आहे. वाङ्मयाच्या इतिहासरचनेस तर हे आढावे अत्यंत साहाय्यक असत. यांच्या अभावानें वाङ्मयाचा निर्दोष इतिहास लिहिणें विलक्षण दगदगीचें झालें आहे. वास्तविक देशी भाषेंतील ग्रंथसंपत्तीविषयीं सरकारचें मायेचें धोरण एकोणिसाव्या खिस्ती शतकाच्या उत्तरार्धापासून अगदींच उलटून गेलें! ह्याचा परिणाम असा झाला कीं, या वाङ्मयाची जाहीर वास्तपुस्तही पुढें सरकारनें बंद केली, यांत आश्चर्य नाहीं. वास्तविक देशी भाषेंत उत्तम वाङ्मय निर्माण करण्याचें एक स्वतंत्र खातें चालविणें सरकारचें कर्तव्य आहे. त्याच विद्यापीठामार्फत देशी वाङ्मयाभिवृद्धीचे अनेक उपक्रम सरकारनें चालवावयास हवे होते. स्वतंत्र ग्रंथालयें देखील स्थापावयास हवीं होतीं. परंतु एल्फिन्स्टन माल्कम यांची पाठ फिरतांच ग्रांट पेरी प्रभृति देशी विरोधकांचा जोर

झाला आणि सर्वच पारडें फिरलें ! आतां कोठें पुनः ही चूक ध्यानांत येत चालल्याची अस्पष्ट भावना सरकारास होत असावी असें वाटतें. सांप्रत आमचेकडे विद्याखात्याची सत्ता आली आहे, तिचे धुरीणांचें लक्ष इकडे जाईल तर मध्येंच उलटलेल्या या प्रवाहाची दिशा पुनः इष्ट तशी फिरविणें त्यांस सहज शक्य आहे ! ' योजकस्तत्र दुर्लभः ' हेंच खरें !

वाङ्मयाचें प्रतिवार्षिक समालोचन सरकारनें पुनः प्रसिद्ध करणें हाही आजवरची चुकीची दिशा सोडून योग्य मार्ग लावण्याचा एक अल्पसा प्रयत्न म्हणतां येईल. आतां सरकार कधीं जागें होईल तें होवो. तोंवर आप-आंला करतां येईल तेवढी हालचाल आपणच केली पाहिजे. म्हणजे त्याचा इष्ट तो परिणामही सरकारावर होईल. या दृष्टीनें रा. कारखानीस यांचा हा प्रयत्न अत्यंत अभिनंदनीय आहे. सरकारी त्रैमासिक यादीचे साहाय्यानें पुस्तकांची विषयवार यादी डे. व्ह. ट्रा. सोसायटीचे कचेरींत रा. कारखानीस यांनीं तयार करविली. हें काम अत्यंत श्रमाचें होतें आणि या किचकट कामास वेळही फार लागला. परंतु नुसती उघडीबोडकी यादी प्रसिद्ध कर-ण्यानें व्हावा तसा उपयोग होत नाहीं असा अनुभव आल्यामुळें या यादीचा निष्कर्ष सुसंगतवार देणारा आणि एकंदर ग्रंथसामग्रीचें साधारण स्वरूप पुढें उभें करणारा एक आढावा याला जोडून प्रसिद्ध करणेंही अत्यवश्य होतें. हें अवघड कामही रा. कारखानीस यांनीं अंगावर घेऊन उत्साहानें तडीस नेलें आहे.

साधारणपणें कविता, चरित्रें इत्यादि विभाग पाडून थोडक्यांत त्या त्या शाखांत कमीजास्त काय दिसतें त्याची रूपरेषा रा. कारखानीस यांनीं या उपोद्घातांत काढिली आहे. यांत सूक्ष्म वाटाघाट अगर चर्चा मुद्दामच टाळली आहे. कारण वाङ्मयाच्या निरनिराळ्या शाखांतील रत्नभांडाराविषयीं एकमत होणें प्रायः अशक्य होय. " नैको मुनिर्यस्य मतं प्रमाणम् " हाच येथला अनुभव. या परीक्षणक्षेत्रांत पाऊल फार जपून टाकावें लागतें. कारण निरंकुश टीकाकार कृताकृत पाहतीलच अशी ग्वाही कोणीं द्यावी ?

रा. कारखानीस यांच्या निरनिराळ्या ग्रंथांवरील अभिप्रायांशीं मतभेद असेल तो व्यक्त करण्याचें हें स्थळ खचित नाहीं. उदाहरणार्थ, आधुनिक

कवींविषयीं त्यांचे अभिप्रायांत जरा निराशेची छटा मारतांना दिसते. परंतु आम्हांस आधुनिक कवींच्या कृतींत एक नवाच जोम स्पष्टपणें प्रतीत होऊन आमचा आशावृक्ष त्यानें एकंदरींत टवटवीतच झालेला आम्हांला दिसतो.

क्वचित थोडी दुरुस्तीपुस्तीही माहितीच्या दृष्टीनें या ग्रंथांत सुचवितां येईल. उदाहरणार्थ 'झेंडूचीं फुलें' हा कवितासंग्रह रा. अज्ञातवासी यांनीं नुसता प्रकाशित केला आहे. त्यांचा जनक बागवान केशवकुमार होय. हीच चूक दुसऱ्याही एका लेखकानें केलेली नुकतीच पाहण्यांत आली.

रा. कारखानीस यांचा शाखावार आढावा वाचतांना कानांना जरा तुटक तुटक वाटतो. साहजिकच आहे. सर्व वाङ्मयाचे एकंदर सावयव संपूर्ण मूर्तीबद्दल सामान्य वर्णन दिल्याशिवाय त्यांतील 'लावण्याची ठेव' डोळ्यांत भरत नाहीं. नुसतें डोळा, नाक, कान इत्यादि अवयवांचें सौंदर्य स्वतंत्र वर्णून संकलित सौंदर्य स्वरूप मनांवर ठसावत नाहीं. पेटीच्या निरनिराळ्या कप्यांत ठेवलेल्या संपत्तीप्रमाणें हें नुसतें विभक्त स्वरूपवर्णन ऐकून मनाचें आकर्षण होत नाहीं. परंतु निरनिराळ्या अवयवांतून वाहणाऱ्या सौभाग्यसरिता एकत्र होऊन जो सौंदर्यसंगम होतो त्याची नव्हाळी कांहीं अपूर्वच होय. वाङ्मयाचें असें सांग वर्णन होतांच 'सुंदर तें ध्यान' असा अनुभव येऊन या जोडलेल्या स्थितींत पूर्वींच्याच अवयवांत नवीन आत्मा दृष्टीसमोर खेळूं लागतो. असो. रा. कारखानीस यांनीं जें अवयववर्णन केलें आहे, त्यावरून अवयवीचें ध्यान आतां उपासकांनीं स्वयंप्रज्ञेनेंच निर्माण करावें आणि या अवयवीचे सर्व पूर्वावतारही चित्तांत आठवावे. आठवतांच या कोटिसूर्यसुंदराची आरती मुखानें सहज बाहेर पडून अननुभूत आनंदाची प्राप्ति होईल !

रा. कारखानीस यांनीं म्हणजे डे. व्ह. ट्रा. सोसायटीनें हा जो उपक्रम केला आहे त्याला सरकार, जनता व शिक्षणसंस्था यांनीं कर्तव्यबुद्धीनें चांगलें साहाय्य केलें पाहिजे म्हणजे उत्साह वाढून याहीपेक्षां अधिक सेवा करण्यास त्यांस हुरूप चढेल.

कार्तिक शुद्ध १२ शके १८४९.
पुणें.

दत्तो वामन पोतदार.

अनुक्रमणिका.

इ. स. १९२५ चें मराठी वाङ्मय.

उपोद्धात.

या वर्षीं मराठी भाषेंत नहानमोठीं ५९१ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. सन १९१५ सालीं प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांची संख्या ३०८ होती. यावरून गेल्या १० वर्षांत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची संख्या सारखी वाढत आहे हें उघड दिसून येईल. सन १९२५ सालीं गुजराथी भाषेंत ५५३, कानडींत ५९ व सिंधींत २३४ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. मुंबई इलाख्यांतील गुजराथी आणि मराठी भाषांत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची संख्या जवळजवळ सारखीच असते असें म्हणण्यास हरकत नाहीं. मराठी पुस्तकांची यादी देण्यापूर्वीं साधारणपणें निरनिराळ्या विषयांवर प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांसंबंधींचा थोडक्यांत विचार केला आहे, त्यायोगानें मराठी वाचकाला या वेळच्या मराठी वाङ्मयाची सहज कल्पना येईल. पुस्तकांचे पुढीलप्रमाणें वर्ग पाडले आहेतः—१ चरित्रें, २ नाटकें, ३ गोष्टी व कादंबऱ्या, ४ कविता, ५ किरकोळ, ६ शालोपयोगी, ७ धर्म व तत्वज्ञान, ८ वैद्यक व आरोग्य, ९ धंदे व कला, १० कायदा, ११ इतिहास व राजकारण, १२ ज्योतिष, १३ कोश, १४ मासिकें व नियतकालिकें. पदार्थविज्ञान शास्त्रावर जीं कांहीं थोडीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. तीं शालोपयोगी असल्यामुळें त्या सदरांत घातलीं आहेत. स्वतंत्र आणि महत्वाचें असें कोणतेंच शास्त्रिय पुस्तक या वर्षीं प्रसिद्ध झालें नाहीं. शास्त्रीय वाङ्मयांत मराठी भाषा फार मागें आहे ही गोष्ट शोचनीय आहे. पुढें एकएक वर्ग घेऊन तत्संबंधानें थोडा बहुत विचार केला आहे.

चरित्रें.

या वर्षीं एकंदर २५ चरित्रें प्रसिद्ध झालीं. मुलांचे रामदास, जॉर्ज वॉशिंग्टन व सुबोध रामकृष्णचरित्र हीं पुस्तकें मुलांकरितां सोप्या भाषेंत लिहिलेलीं आहेत. श्रीगुरुगोविंद, श्रीमाधवनाथदीपप्रकाश, श्रीनिरंजन-बोध हीं सत्पुरुषांचीं चरित्रें त्यांच्या भाविक भक्तांनीं लिहिलीं आहेत. या वर्षीं प्रसिद्ध झालेल्या चरित्रग्रंथांत रा. फाटक यांचें न्यायमूर्ति रानडे यांचें चरित्र, रा. साने यांचें नामदार गोखले यांचें चरित्र, व रावबहादूर लट्ठे यांचें शाहू छत्रपतींचें चरित्र हे ग्रंथ विशेष महत्वाचे आहेत. न्यायमूर्ति रानडे यांचें चरित्र त्यांच्या मृत्यूनंतर पाव शतकानें प्रसिद्ध झालें आहे. रा. फाटक जर पुढें आले नसते, तर न्यायमूर्तींचे चरित्र प्रसिद्ध होण्याचा योग आला असता कीं नाहीं याची शंकाच आहे. रा. फाटक यांनीं परिश्रमपूर्वक माहिती गोळा केली आहे. त्यांच्या चरित्राची भाषा साधी आहे. खरोखर पाहिलें असतां न्यायमूर्ति रानडे यांनीं धार्मिक, सामाजिक, औद्योगिक व राजकीय चळवळींत प्रामुख्यानें भाग घेऊन देशाची ४० वर्षें निरलसपणें सेवा केली. तेव्हां न्यायमूर्तींचें चरित्र म्हणजे या देशांतील वरील सर्व चळ-वळींचा त्या काळचा इतिहास होय; आणि म्हणूनच फाटक यांनीं लिहि-लेल्या चरित्रापेक्षां अधिक विस्तृत चरित्राची अत्यंत आवश्यकता आहे. रा. फाटक यांचें हें चरित्र पुढील लेखकांस फार उपयोगी पडेल. नामदार गोखले यांचेंही विस्तृत चरित्र यापूर्वींच प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होतें व तें भारतसेवकमंडळांतील त्यांच्या अनुयायांकडून व्हावें अशी साहजिकच महा-राष्ट्रांतील जनतेची अपेक्षा होती; पण ती सफल होण्यास बराच कालावधि गेला पाहिजे असें दिसतें. विस्तृत चरित्राचे अभावीं रा. साने यांनीं लिहि-लेलें चरित्र सामान्य वाचकाला चरित्रनायकाच्या कर्तृत्वाची व थोरपणाची जाणीव देण्यास पुरेसें होईल यांत शंका नाहीं. लेखक स्वतः राष्ट्रीय पक्षाचे

असतांनाही त्यांनीं समतोल बुद्धीनें कै. नामदार गोखले यांचें चरित्र लिहिण्याचा प्रयत्न केला आहे, ही गोष्ट त्यांस भूषणावह आहे. रा. साने यांची भाषाही गोड आहे. श्रीशाहू छत्रपति यांच्या निधनानंतर थोड्याच दिवसांनीं रावबहादूर लट्ठे यांनीं त्यांचें बरेंच विस्तृत चरित्र छापून प्रसिद्ध केलें. अशा प्रकारचा योग हा अपूर्व आहे. रावबहादूर लट्ठे यांच्या या ग्रंथावर विरुद्ध टीकांचा भडिमार झाला.

महाराष्ट्रांतील नवीन पिढीला ज्याच्या नांवापलीकडे विशेष कांहीं माहिती नाहीं अशा एका थोर पुरुषाचें संक्षिप्त चरित्र या वर्षी प्रसिद्ध झालें. रा. गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांच्या, महाराष्ट्रावर झालेल्या उपकारांची जाणीव, या पुस्तकानें महाराष्ट्राला होईल यांत शंका नाहीं. चरित्रांतील माहिती जरी थोडी आहे, तरी चरित्रनायकांचा मोठेपणा व त्यांनीं केलेलें कार्य यांची कल्पना देण्याला ती पुरी होईल.

रा. पांगारकर यांनीं आपल्या एकनाथचरित्राची तिसरी आवृत्ति प्रसिद्ध केली आहे. या आवृत्तींत नाथचरित्राची जास्त माहिती लेखकास देतां आली नाहीं. द्वितीय आवृत्तीची ही नवी आवृत्ति तर्जुमा आहे. फक्त पुस्तकाचे शेवटीं ५ पानें जास्त देऊन त्यांत नाथांच्या ग्रंथांतील आणखी कांहीं उतारे दिले आहेत. महाराष्ट्रकविचरित्रकार रा. आजगांवकर यांनींही एक एकनाथचरित्र या वर्षी प्रसिद्ध केलें आहे. रा. आजगांवकर यांचा महाराष्ट्रकवींच्या ग्रंथांचा व्यासंग फार दांडगा आहे. यामुळें त्यांचेंही एकनाथचरित्र वाचनीय झालें आहे. मुरूड येथील विद्वान् मराठी लेखक रा. बाळकृष्ण अनंत भिडे यांनीं 'तुकारामाचें आयुष्य व शिकवण' याजवर सुंदर निबंध लिहिला आहे. त्याचीही तृतीयावृत्ति या वर्षी निघाली आहे. रा. परांजपे यांच्या मोरोपंतांच्या चरित्राची ४ थी आवृत्ति निर्णयसागरनें काढली आहे. मराठी भाषेंत एकाद्या चरित्रग्रंथाची ४ थी आवृत्ति निघणें ही एकच गोष्ट त्या पुस्तकाची किती लोकप्रियता आहे हें सांगण्यास पुरी आहे.

महाराष्ट्रभाषाचित्रमयूर रा. आठल्ये यांनीं समर्थ रामदासस्वामी यांचें एक मोठें चरित्र या वर्षीं प्रसिद्ध केलें आहे. आठल्ये यांचा लेखनव्यासंग फार दांडगा आहे. मराठी भाषेंतील ते वयोवृद्ध लेखक आहेत. त्यांची भाषा साधी व मोहक असते. लेखकानें हें चरित्र केवळ भाविकपणानें लिहिलें. लेखकानें चिकित्सक बुद्धीनें व ऐतिहासिक दृष्टीनें समर्थांचें चरित्र लिहिलें असतें तर या ग्रंथाची गणना उत्कृष्ट ग्रंथांत झाली असती. पण प्रस्तुत चरित्र हें निवळ भाविकपणानें व नुसत्या अंधश्रद्धेनें लिहिलें असल्यामुळें तें पोथीवजा झालें आहे.

या ठिकाणीं आणखी एका चरित्रग्रंथाचा उल्लेख केला पाहिजे. तो ग्रंथ म्हणजे रा. मुंडले यांनीं लिहिलेलें थॉमस पेन याचें चरित्र हा होय. उत्कट देशाभिमान, निरलस व साधी वृत्ति, निःस्वार्थता, न्यायप्रियता, परहिततत्पर-रता व अनेक विघ्नांना न भितां स्वकर्तव्य करण्याची आवड इत्यादि गुणांमुळें ज्याचें नांव अजरामर झालें आहे अशा या थोर विभूतीच्या चरित्रापासून महाराष्ट्राला पुष्कळ गोष्टी शिकतां येतील. रा. मुंडले यांच्या या चरित्राला डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें बक्षीस दिलें आहे.

नाटकें

या वर्षीं २६ नाटकें प्रसिद्ध झालीं. त्यांपैकीं त्राटिका, प्रेमसंन्यास, एकच प्याला, संत सखूबाई व कुंजविहारी हीं जुनींच नाटकें आहेत. प्रो. केळकर यांची त्राटिका आज ३० वर्षें महाराष्ट्राचें मनोरंजन करीत आहे. या नाटकाची संगीत आवृत्तिही अलीकडे निघाली आहे. कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या सौभद्राची लोकप्रियता आज ४० वर्षांनंतरही कायम आहे, हें त्या नाटकाच्या नवीन नवीन आवृत्ति निघत आहेत यावरून उघड दिसत आहे. रा. गडकरी यांचीं नाटकें सध्यां किती लोकप्रिय आहेत हें

सांगण्यास नको. रा. हरिभाऊ आपटे यांचें संत सखूबाई हें नाटक सामान्य जनतेला फार आवडलें आहे. याची ही ५ वी आवृत्ति आहे. याच नाटकावरून याच नांवाचा चित्रपट हिंदुस्थान सिनेमा कंपनीनें तयार केला आहे. वरेरकर यांच्या कुंजविहारी नाटकाची दुसरी आवृत्ति या वर्षी निघाली आहे.

नवीन नाटकांपैकीं पेशव्यांचा पेशवा, प्रतापसिंह व शिवपावित्र्य हीं तीन ऐतिहासिक संगीत नाटकें आहेत. नाना फडणीस, उदेपूरचा महाराणा प्रतापसिंह व श्रीशिवछत्रपति हे तिघे या तीन नाटकांचे नायक आहेत. महाराणा प्रतापसिंह व शिवछत्रपति या विभूतींच्या चरित्राचे विषय घेऊन अनेक नाटककारांनीं नाटकें लिहिलीं आहेत. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचें शिवपावित्र्य वाङ्मयदृष्ट्या सरस वठलें आहे. पण या नाटकाचे प्रयोग महाराष्ट्राचे रंगभूमीवर अद्यापि झालेले नाहींत. पेशव्यांचा पेशवा या नाटकाचे प्रयोग नाट्यकलाप्रवर्तक मंडळी नेहमीं करीत असते.

अहंकार, प्रबोधचंद्रोदय, भर्तृहरि, राणीचा बावटा, घोषयात्रा, भरतभाव व गोपाळकाला या नाटकांचा विषय पौराणिक अथवा धार्मिक आहे. प्रबोधचंद्रोदय नाटक श्रीकृष्णमित्र यति यांनीं लिहिलेल्या संस्कृत नाटकाचें भाषांतर आहे. यांत आर्यधर्माचें श्रेष्ठत्व दाखविलें आहे व जैन, बौद्ध व हिंदुधर्मांतील पाखंड मतें यांचें विनोदपर खंडण केलें आहे. हें नाटक रंगभूमीवर येण्याचा संभव नाहीं. राणीचा बावटा हें नाटक भारतांतील प्रमिलास्वयंवरावर रचिलें आहे. घोषयात्रा हें भारतांतील सर्वांना परिचित अशा आख्यानाच्या आधारानें रचलेलें आहे. अहंकार हेंही पौराणिक नाटक आहे. भरतभाव हें लहानसें नाटक मुलांकरितां रा. दोंदे यांनीं लिहिलें आहे. चित्रकूटावरील रामाची व भरताची भेट हा यांतील मुख्य भाग आहे. यांत स्त्रीची भूमिका एकही नसल्यामुळें विद्यार्थ्यांना संमेलनप्रसंगीं करण्यास योग्य असें हें नाटक आहे.

नवा खेळ व सौभाग्यलक्ष्मी ह्या नाटकांचे विषय सामाजिक आहेत सौभाग्यलक्ष्मी या नाटकाचा पुनर्विवाह हा विषय आहे. विधवांची अनुकंपनीय स्थिति लक्षांत घेऊन विधवाविवाहाकडे समाजानें सहानुभूतीच्या दृष्टीनें पहावें असा लेखकाचा हेतु आहे.

राजाचें बंड व मुक्तधारा या नाटकांचे विषय राजकीय आहेत. आजपर्यंतच्या नाटकांपेक्षां राजाचें बंड या नाटकाचा विषय अगदींच भिन्न आहे. या नाटकाची रचनाही स्वतंत्र आहे. राजाला प्रजेला स्वातंत्र्य देऊन कसें सुखी करितां येईल व स्त्रीच्या प्रेमानें मनुष्याच्या आंगचें सामर्थ्य कसें प्रकट होतें, या दोन गोष्टी रा. त्रिंबकराव कारखानीस यांनीं दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्र नाटक मंडळी या नाटकाचे प्रयोग करीत असते. मुक्तधारा हा कविसम्राट रवींद्रनाथ टागोर यांच्या नाटकाचा अनुवाद आहे. मनुष्याचें स्वातंत्र्य नष्ट करणें हें सृष्टिक्रमाविरुद्ध आहे व तें अमानुष व अशक्य आहे हें या नाटकांत दाखविलें आहे. मूळच्या नाटकांतील सर्व स्वारस्य मराठींत आणणें हें फार कठीण काम आहे, तरी रा. किरात यांच्या या अनुवादानें मराठी वाचकांना कवीच्या मूळच्या नाटकाची बरीच कल्पना येईल यांत शंका नाहीं. वरवंचना हें शेरडीनच्या एका नाटकाचें रूपांतर आहे.

राधाकृष्णांचें प्रेम हें हिंदुस्थानांतील अनेक काव्यांचा व नाटकांचा विषय झालेलें आहे. अलीकडील नाटकांतून व काव्यांतून हें प्रेम शुद्ध व अत्यंत उदात्त होतें व त्यांत विषयसुखाचा बिलकूल संबंध नव्हता हें दाखविण्याची प्रवृत्ति विशेष दिसून येत आहे. रा. गुर्जर यांनीं आपल्या नंदकुमार नाटकांत या प्रेमाची शुद्धता, निःस्वार्थता व उज्वलता दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. गंधर्व नाटकमंडळी या नाटकाचे प्रयोग मधून मधून करीत असतात, पण ते विशेष लोकप्रिय झाल्याचें दिसत नाहीं.

मुंबई, सोलापूर, पुणें वगैरे मोठमोठ्या शहरांतून दरवर्षीं शिशुसप्ताह व आरोग्यसप्ताह मोठ्या थाटानें पाळण्याची पद्धति सध्यां सुरू झाली आहे.

या वेळीं आरोग्यासंबंधानें व मुलांच्या जोपासनेसंबंधानें कांहीं भाषणें व लहान नाटकें करून दाखवितात. आरोग्य व शिशुसप्ताह हीं अशा प्रसंगा-करितां रचलेलीं दोन नाटकें होत.

संगीत भर्तृहरि हें नाटक भर्तृहरि राजाचे दंतकथेवरून लिहिलें आहे. या नाटकाचा प्रयोग महाराष्ट्र रंगभूमीवर झालेला ऐकिवांत नाहीं. संगीत गोपाळकाला हें गोपाळकाल्याचे दिवसांकरितां लिहिलेलें अगदीं छोटें नाटक आहे.

जोशी यांचें स्थानिक स्वराज्य हें विनोदपर नाटक आहे. या नाट-कांतील विनोद कांहींसा ग्राम्य असल्याबद्दल टीका वर्तमानपत्रांत आली होती. म्युनिसिपालिटीच्या कारभारांत जरी कांहीं दोष असले तरी स्थानिक स्वराज्याचा असा बोजवारा करून दाखविणें इष्ट नाहीं, असेंहि पुष्कळांचें म्हणणें आहे. या नाटकाला पुण्यास सतत गर्दी असते. आनंदविलास नाटकमंडळी हें नाटक करीत असते.

काव्यें.

या वर्षी लहान मोठीं मिळून कवितांचीं १०० पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांपैकीं २४ निरनिराळ्या मेळ्यांच्या पद्यावलींचीं पुस्तकें आहेत. मेळ्यांच्या पद्यावलींत अनेक नूतन कवींची काव्यचमत्कृति झळकत असते. तथापि या सर्व कवितांत प्रतिभा फारच थोडी दिसून येते. श्रीगणेशाची भक्ति हा जरी या काव्यांचा प्रधान विषय असावयास पाहिजे, तरी त्याला पुष्कळशा मेळ्यांतून गौणस्थान दिलें जातें. धार्मिक, औद्योगिक, राजकीय व दुसऱ्या अनेक बाबींवर हें कवित्व वाहात असतें. प्रतिपक्ष्यावर टीका करण्याची ही उत्तम संधी असते. आजपर्यंत सुधारक व प्रागतिक हेच या टीकेचा विषय होते, पण अलीकडे प्रतिसहकार पक्षाकडे टीकेचा ओघ वळला आहे.

समाजामध्यें एकमेकांचीं मनें दूषित होण्याला कांहीं कांहीं पदें खचित कारणीभूत होतील.

संगीत नाटकांतील पदें स्वतंत्र रीतीनें छापवून ती पद्यावलि नाटक सुरू असतांना नाटकगृहांत वाटण्याची अलीकडे चाल सुरू झाली आहे. या वर्षी 'वर पाहिजे,' 'त्राटिका,' 'पेशवाई,' 'जनता जनार्दन,' 'बालक्रीडा,' व 'शलेमो' या सहा नाटकांच्या पद्यावल्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

प्रसिद्ध विद्यमान किंवा गतकालीन व्यक्तीच्या चरित्रावर किंवा मराठ्यांच्या इतिहासांतील कांहीं संस्मरणीय प्रसंगांवर पोवाडे रचून ते उत्सवाच्या प्रसंगीं म्हणण्याचा प्रघात अलीकडे जोरानें सुरू झाला आहे. या पोवाड्यांपैकीं बरेच पोवाडे श्रीशिवछत्रपतींच्या आयुष्यक्रमांतील अद्भुत प्रसंगांवर रचलेले असतात. या वर्षी अशा प्रकारचे सहा पोवाडे प्रसिद्ध झाले. त्यांपैकीं एक कै. टिळकांवर आहे व बाकीचे चार शिवछत्रपतींच्या आयुष्यांतील निरानिराळ्या प्रसंगांवर रचलेले आहेत. एक पोवाडा बाजीप्रभु देशपांडे ह्यांजवर आहे. या पोवाड्यांतील कवित्वस्फूर्ति व प्रतिभा पुष्कळ वेळां नांवाजण्याजोगी असते व श्रोतृवृंदाच्या भावनांत खळबळ उडवून देण्याची शक्ति यांत असते.

गोरक्षणाकडे महाराष्ट्र जनतेचें चित्त अलीकडे बरेंच वेधलेलें दिसतें. या वर्षी गोरक्षणाकडे जनतेचें चित्त जास्त वेधण्याकरितां 'भूमातेचे हंबरडे,' 'शेतकऱ्यांस विनंति,' 'गाईचा हंबरडा,' ही तीन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या 'शेतकऱ्यांचें मधुर गायन,' या छोट्या काव्याची तिसरी आवृत्ति ह्या वर्षी निघाली आहे.

या वर्षी जुन्या दोन कवींचीं काव्यें कॉलेजांतील विद्यार्थ्यांकरितां प्रसिद्ध झालीं आहेत. महानुभावी कवि दामोदर पंडित यांचें 'वत्सहरण,' हें काव्य ठाण्याचे रा. विनायकराव भावे ह्यांनीं प्रसिद्ध केलें, व सामराज कवीचें 'रुक्मिणीहरण,' हें काव्य फर्ग्युसन कॉलेजचे प्रो. तुळपुळे यांनीं प्रसिद्ध केलें.

काव्याच्या स्पष्टीकरणार्थ दोन्ही पुस्तकांत टीपा दिलेल्या आहेत.

जुनीं व दुर्मिळ पुस्तकें पुनर्मुद्रित करण्याचे कामीं रा. गो. ब. अधिकारी यांचा उत्साह प्रशंसनीय आहे. कुंटे यांचें 'शिवाजी' काव्य किती तरी वर्षें दुर्मिळ झालें आहे. तें या वर्षीं रा. अधिकारी यांनीं प्रसिद्ध केलें. आधुनिक लोकप्रिय कवि रेंदाळकर यांची सर्व कविता रा. अधिकारी यांनीं या वर्षीं प्रसिद्ध केली.

या वर्षीं लहान मोठीं स्वतंत्र अशीं ९ काव्यें प्रसिद्ध झालीं. त्यांत जळगांवचे प्रसिद्ध कवि तिवारी यांचीं 'राधामाधव' व 'झांशीची संग्रामदेवता' हीं मुख्य आहेत. या दोन्ही काव्यांची मराठी वर्तमानपत्रें व मासिकें यांनीं मुक्तकंठानें स्तुति केली. राधेचें कृष्णावरील निरसीम व पवित्र प्रेम हा पहिल्या काव्याचा विषय आहे. झांशीची राणी लक्ष्मीबाई यांचा अलौकिक पराक्रम हा दुसऱ्या काव्याचा विषय आहे. लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं आपल्या 'अबलाविजय' या काव्यांत स्त्रियांची महती वर्णन केली आहे. नेरूरकरांचें 'पर्वती' हें, ते रचीत असलेल्या एका मोठ्या काव्याच्या अंगभूत असणारें लहानसें काव्य आहे. यांत पर्वती पाहून लेखकाच्या मनांत आलेले विचार व त्याच्या मनःस्थितीचें वर्णन आहे. 'चहा' या काव्यांत चहाचे दुष्परिणाम व त्याची बेसुमार झालेली वाढ यांचें वर्णन आहे. ही या काव्याची दुसरी आवृत्ति आहे. 'पंचव्यसननिषेध' या छोट्या काव्यांत चहा, भांग, गांजा, दारू, व तंबाखू, या पांच व्यसनांपासून दूर राहाण्याचा उपदेश केला आहे. हुंडा घेण्याचा दुष्परिणाम, 'नवरदेवास शेलापागोटें' या लहान काव्यांत चटकदारपणें दाखविला आहे; व अविवाहित तरुणांनीं हुंडा न घेण्याचा दृढ निश्चय करावा, असा त्यांना उपदेश केला आहे. 'संजयप्रबोधन' या काव्यांत महाभारतांतील एका आख्यानांत विदुलेनें संजयाला प्रोत्साहनपर व क्षत्रियाला योग्य असा जो उपदेश केला आहे त्याचा मराठींत अनुवाद केला आहे.

या वर्षीं स्फुट कवितांच्या संग्रहांची मात्र गर्दी उडाली आहे. बारा कवींनीं आपल्या स्फुट कविता एकत्र करून छापल्या आहेत. ‘ कांहीं तरी ’ हा रा. हरि सखाराम गोखले यांच्या स्फुट कवितांचा संग्रह मनोहर आहे. याला प्रो. लाघू यांनीं जोडलेली प्रस्तावना त्या काव्यापेक्षां जास्त मनोहर आहे. ‘ गीत द्विदल ’ या पुस्तकांत श्री. कमलाबाई देशपांडे व त्यांचे बंधु यशवंतराव केळकर यांनीं आपल्या कविता संग्रहीत केल्या आहेत. ‘ अज्ञातवासी ’ या नांवानें ओळखले जाणारे रा. केळकर यांच्या ‘ झेंडूच्या फुलां ’ पैकीं कांहीं फुलें सुगंधित आहेत.

रामदास, ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या ग्रंथांतील उतारे असलेलीं दहा पुस्तकें या वर्षीं प्रसिद्ध झालीं आहेत. ‘ स्वातिधारा ’ या पुस्तकांत ज्ञानेश्वरींतील सुंदर असे १०८ उतारे घेतले आहेत. ‘ समर्थसंजीवन ’ व ‘ समर्थरत्नसंग्रह ’ या पुस्तकांत रामदासस्वामींच्या ग्रंथांतून उत्कृष्ट उतारे घेतले आहेत.

श्रीकृष्ण, दत्त, मारुती वगैरे देवता व साधु यांचीं स्तुतिपर पद्यें असलेलीं वीस पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत. स्फुट कवितांत देखील पुष्कळ कवींनीं आपल्या इष्ट देवतेच्या स्तवनार्थ कांहीं पद्यें रचलेलीं आहेत. महाराष्ट्र-कवींचा भाविकपणा विशेषसा कमी झाला नाहीं असें यावरून दिसतें.

स्त्रियांनीं आपल्या भगिनीवर्गाकरितां ‘ स्त्रीगीत,’ ‘ स्त्रीगीतसंग्रह,’ ‘ स्त्रीगीतरत्नमाला ’ अशीं तीन पुस्तकें व ‘ वटसावित्रीचें गाणें ’ हीं प्रसिद्ध केलीं आहेत. यंदाच्या कविवर्गांत पांच सहा कवयित्री आहेत ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे.

एकंदरींत पाहतां स्वतंत्र काव्य करण्याची प्रवृत्ति आपल्या आधुनिक कवींत फार कमी दिसते. बहुतेकांना स्फुट कविता करण्यांत आनंद वाटतो व त्यांतच त्यांची भरारी दिसून येते. स्वतंत्र काव्य रचण्याइतकी प्रतिभाशक्ति त्यांच्यांत नाहीं किंवा स्वतंत्र काव्य रचण्यास लागणारा दीर्घ व्यासंग व चिकाटी त्यांच्यांत नाहीं असें म्हणावें लागतें.

कादंबऱ्या व गोष्टी.

मराठी भाषेंत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांत सर्वांत मोठी संख्या कादंबऱ्या व गोष्टी यांची असते. या वर्षीं लहानमोठ्या कादंबऱ्या व गोष्टी मिळून १०७ पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. यांपैकीं निरनिराळ्या आणा मालांनीं प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांची संख्या ४२ आहे. चार आणे माला, तीन आणे माला, एक आणा माला, नवीन एक आणा माला, विविधवृत्त माला, व हिंद एजन्सी यांनीं हीं ४२ पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. प्रत्येक माला आपल्या पुस्तकाच्या चार पांच हजार प्रती काढते. यावरून या मालांच्या पुस्तकांचा खप किती जारीनें होत असतो याची कल्पना होईल. गुप्त पोलीसाच्या चातुर्याच्या गोष्टी व प्रेमकथा यांचाच सुकाळ मालांच्या पुस्तकांतून असतो. विद्यार्थी व ज्याला थोडें फार वाचतां येत आहे असा बहुजनवर्ग यांतच या मालांच्या पुस्तकांचा खप जारीनें होतो. मालांतून उत्कृष्ट वाङ्मय निपजणें ही गोष्ट अशक्य आहे. तरी वाचकांची सदभिरुचि बिघडून देण्याची जबाबदारी या मालांच्या प्रकाशकांवर व लेखकांवर आहे व ती जबाबदारी ते पाळतील अशी आशा करण्यास पुष्कळ जागा आहे.

या वर्षीं प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्यांपैकीं हरिभाऊ आपटे यांची ‘ सूर्यग्रहण,’ काळे यांची ‘जिंजीवास,’ बापट यांची ‘ पानिपतची मोहीम, ’ धनुर्धारी यांची ‘ वाईकर भटजी,’ व नारायण हरी आपटे यांची ‘ लांछित चंद्रमा,’ या जुन्याच कादंबऱ्या आहेत. ‘ जिंजीवास ’ ही राजारामकालीन ऐतिहासिक कादंबरी महाराष्ट्रवाचकांस फार आवडली होती, पण मध्यंतरीं बराच कालपर्यंत तिची नवी आवृत्ति निघाली नाहीं. बापट यांची ‘ पानिपतची मोहीम ’ ही कांहीं वर्षांमागें बरीच लोकप्रिय होती. ही कादंबरी जुन्या संस्कृत कादंबऱ्यांच्या धर्तीवर असल्यामुळें हिच्यांत वर्णनाचा फार पाल्हाळ आहे. मराठी वाचकांची रुचि बदलल्यामुळें, मराठी इतिहासा-

वर अलीकडे पुष्कळच नवीन प्रकाश पडल्यामुळें, व रा. चिंतामणराव वैद्य यांची ' दुर्दैवी रंगू ' सारखी त्याच प्रसंगावर कादंबरी प्रसिद्ध झाल्यामुळें ' पानिपतची मोहीम ' पूर्वीप्रमाणें लोकप्रिय होणें शक्य नाहीं. तथापि ती अद्याप महाराष्ट्रवाचकांचें मनोरंजन करील. ' वाईकर भटजी ' ही कादंबरी हायस्कूलसमध्यें वाचनपुस्तक म्हणून मंजूर झाल्यानें व स्कूल लीव्हिंग परीक्षेलाही नेमिल्यामुळें तिला तिच्या गुणाला योग्य असें स्थान मिळालें आहे व तिची नवीन आवृत्तिही निघाली आहे.

हरिभाऊ आपटे यांची ' आजच ' ही कादंबरी या वर्षी प्रथम प्रसिद्ध झाली आहे. ही कादंबरी अपूर्ण आहे, तथापि तिचा शेवट हरिभाऊंनीं कोणत्या प्रकारें केला असता हें चाणाक्ष वाचकांच्या ध्यानांत येण्यास अडचण पडणार नाहीं. हरिभाऊंची ही अपुरी कादंबरी देखील वाचकांना मनोरंजक वाटेल. ' म्हैसूरचा वाघ ' ही हरिभाऊंची दुसरी कादंबरी या वर्षी प्रथमच प्रसिद्ध होत आहे. ही कादंबरी ' करमणूक ' या पत्रांत इ. स. १८९० सालीं क्रमशः प्रसिद्ध झाली. इंग्लिश कादंबरीकार मेडोज टेलर याच्या ' टिपु सुलतान ' या कादंबरीच्या आधारानें हरिभाऊंनीं आपली कादंबरी लिहिली आहे, पण ती जास्त आकर्षक व उठावदार करण्याकरितां त्यांनीं मूळ संविधानकांत कांहीं फरक केला आहे.

महाराष्ट्र-कुटुंबमालेच्या या वर्षी तीन कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. 'मजूर,' 'कसे दिवस जातील ?' व 'शिपाई' या तीन सामाजिक कादंबऱ्या आहेत. या मालेच्या कादंबऱ्या अगदीं नवीन धर्तीवर आहेत. खेडेगांवांतील लोकांचा आयुष्यक्रम, त्यांच्या अडचणी, त्यांच्यांतील गुणावगुण यांचें यथार्थ चित्र या कादंबऱ्यांत दिसून येतें, हाच यांतील विशेष आहे. खेड्यांतील दारिद्र्याला तेथील लोकांनीं शहरांत जाणें हा खरा उपाय नव्हे; शहरांतील राहाणीनें खेड्यांतील लोकांचा नैतिक व शारीरिक ऱ्हास होतो; सामायिक भांडवल, पतपेढ्या, व नवीन आउतें व खतें यांनीं शेतसुधारणा

केल्यानें खेड्यांची स्थिति सुधारेल, हें दाखविण्याचा लेखकांनीं प्रयत्न केला आहे. साधी भाषा, उदात्त विचार व चटकदार वर्णन या योगानें मालेचीं तिन्हीं पुस्तकें मनोरंजक झालीं आहेत.

प्रसिद्ध मराठी कादंबरीकार रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या 'श्याम-सुंदर' व 'दुहेरी कां दुटप्पी' या दोन कादंबऱ्या या वर्षीं प्रसिद्ध झाल्या आहेत. पहिल्या कादंबरींत मागासलेल्या वर्गांचें शिक्षण व अस्पृश्यांची सुधारणा कशी करितां येईल हें दाखविलें आहे. दुसऱ्या कादंबरींतिल संवि-धानक अगदीं साधें व नेहमींचें आहे, पण उत्कृष्ट भाषा व मनोहर विचार-सरणी यांनीं ही कादंबरी वाचकांचें मन आकर्षण करितें. पहिल्या कादंबरीं-तील नायकाचा साधा व सरळ स्वभाव, परोपकाराकरितां त्याची तळमळ, उच्च ध्येयाकरितां झटण्याचा त्याचा दृढ निश्चय व दुःखितांविषयीं त्याचें प्रेम यांमुळें ही कादंबरी तिचें संविधानक अतिशय साधें असतांनाही वाचकांच्या प्रेमास पात्र होते. रा. कोल्हटकरांच्या दोन्ही कादंबऱ्या उच्च प्रतीच्या आहेत.

रा. हडप यांनीं 'बाईल वेडा,' 'सौंदर्याचा फुलबाग' व 'मास्तरीण काकू' अशा तीन कादंबऱ्या या वर्षीं प्रसिद्ध केल्या आहेत. या तिन्हीं कादं-बऱ्यांत लेखकानें समाजांतील दुर्गुण दाखविण्याचा यत्न केला आहे. कादंब-रीकारानें कांहीं तरी उच्च ध्येय पुढें ठेवून कादंबरी लिहिली पाहिजे, निवळ समाजांतील काळीकुट्ट बाजू दाखवून भागणार नाहीं. रा. हडप यांनीं समा-जांतील दुर्गुणांचें इतकें कांहीं भडक वर्णन केलें आहे कीं, त्या योगानें तरुण व अपरिपक्व मनाच्या वाचकाचें मन त्यानें आकर्षिलें जातें. या कादं-बरीच्या अश्लीलतेबद्दल वर्तमानपत्रांतून लेख आले व स्त्रियांनीं त्यांचा निषेध केला. रा. हडप यांचे अंगीं लेखनचातुर्य आहे. रा. हडप यांनीं आपल्या लेखनाची दिशा बदलून ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिण्याला सुरुवात केली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. त्यांचे हातून उत्कृष्ट सामाजिक, ऐति-हासिक कादंबऱ्या पुढें येतील यांत शंका नाहीं.

या वर्षींच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांत नाथमाधवांची, ' स्वराज्याचें परिवर्तन,' जोशी यांची ' पावन तीर्थ ' व दामले यांची ' वसईचा रणसंग्राम ' या कादंबऱ्या विशेष महत्वाच्या आहेत. श्रीयुत नाथमाधव यांनीं मराठी इतिहासाच्या पूर्व भागावर एक कादंबऱ्यांची माला सुरू केली आहे. साधी भाषा, उत्तम वर्णनशैली, पात्रांचा स्वभावपरिपोष आणि इतिहासाला चिकटून राहण्याची आवड यांमुळें नाथमाधवांच्या या कादंबऱ्या महाराष्ट्रवाचकांना फार आवडतात. ' स्वराज्याचें परिवर्तन ' ही कादंबरी राजारामाच्या धामधुमीच्या कालावर रचलेली आहे. ' पावन तीर्थ ' व ' वसईचा रणसंग्राम ' या दोन्ही कादंबऱ्यांत पोर्तुगीज लोकांनीं धर्मवेडेपणामुळें हिंदूंचा नाहक छळ कसा केला व मराठ्यांनीं त्याचा प्रतिकार कसा केला याचें वर्णन आहे. रा. जोशी यांची ' मराठ्यांची ढाल ' ही राजारामकालीन कादंबरी आहे. संताजी घोरपडे याला त्याच्याच जोडीदार सरदारांनीं कसें छळलें व शेवटीं त्याचा कसा नाश केला याचें वर्णन या कादंबरींत आहे. याशिवाय ' पावागडचा प्रलय ', ' कोर्लईलचा किल्लेदार ' व ' मुक्तग्रहण ' या तीन ऐतिहासिक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या.

स्वतंत्र सामाजिक कादंबऱ्यांपैकीं नारायण हरी आपटे यांची ' न पटणारी गोष्ट ' हींत बालावृद्धविवाहाचे दुष्परिणाम दाखविले आहेत. दृढनिश्चयी नायिका परिस्थितीला न जुमानतां आपलें आयुष्य सदाचरणांत व परोपकारांत घालविते असें या कादंबरींत दाखविलें आहे. रा. फडके यांची ' कुलाब्याची दांडी ' हीही सामाजिक कादंबरी आहे. कॉलेजमधील श्रीमंत विद्यार्थी व विद्यार्थिनीं यांच्या आयुष्यक्रमाचें बरेंच वर्णन या कादंबरींत आहे. रा. फडके यांची भाषा व वर्णनशैली जरी मोहक आहे, तरी ही कादंबरी चांगलीशी वठली नाहीं. यांतील नायक केवळ परिस्थितीच्या प्रवाहाबरोबर वाहात जाणारा ध्येयशून्य तरुण आहे. ' जीवनक्रांति ' व ' मातृदेवता ' या लहान कादंबऱ्या विद्यार्थ्यांनीं वाचण्याजोग्या आहेत. विधवांची

असहाय स्थिति व त्यांचा समाजाकडून होणारा छळ हा नेहमीं सामाजिक कादंबऱ्यांचा एक उत्कृष्ट विषय होतो. ' हिरकणी ' व 'वणव्यांतील फूल' या कादंबऱ्यांचा हाच विषय आहे.

इंग्लिश कादंबऱ्यांच्या आधारानें लिहिलेल्या बऱ्याच कादंबऱ्या या वर्षीं प्रसिद्ध झाल्या आहेत. ' केवळ ध्येयासाठीं,' ' बकूळ,' ' हानिफा बेगम,' ' मोलकरीण,' ' शालिवाहन शक ' या सर्व कादंबऱ्या स्कॉट्स, रेनॉल्डस् वगैरे इंग्लिश कादंबरीकारांच्या ग्रंथांच्या आधारानें लिहिल्या आहेत. ' केवळ ध्येयासाठीं ' ही कादंबरी मराठी वाचकांना अगदींच अपरिचित अशी वाटते. विवाह म्हणजे गुलामगिरी अशी दृढभावना झालेली एक सुशिक्षित तरुणी विवाह न करितां समाजाचा छळ सोसून एका तरुणाच्या सहवासांत आयुष्य घालविते, यांतील ध्येयच मुळीं पौर्वात्यसमाजाला न पटणारें आहे.

लघुकथांमध्यें रा. कोल्हटकर व रा. केळकर या दोघां कसलेल्या लेखकांनीं लिहिलेलें ' कथासप्तक ' हें पुस्तक सरस आहे. लहान लहान जादूच्या अद्भुत कथा व स्त्रीपुरुषांच्या धाडसी चरित्रांच्या कथा प्रसिद्ध करण्यांत पुरंदरे कंपनी सर्वांत पुढें आहे. ' शुकबहात्तरी,' मुकुंदपंचविशी,' ' वेताळ-पंचविशी,' ' कळयंत्री घोडा,' ' गुलबकावली, ' ' मूर्खशिरोमणी ' या त्यांच्या पुस्तकांच्या पांच पांच सहा सहा आवृत्त्या निघाल्या आहेत. सहा आवृत्त्या निघण्याचें भाग्य हरि नारायण आपटे यांच्या कादंबऱ्यांना देखील लाभलें नाहीं. पुराणांतील कथा सरळ गोष्टीरूपानें देण्याचा उपक्रमही पुरंदरे मंडळींनीं चालविला आहे. ' पांडवप्रताप,' ' रामविजयसार ' व ' संतांचा बाजार ' हीं धार्मिक कथांचीं पुस्तकेंही लोकांना फार आवडलीं आहेत. त्या पुस्तकांच्याही पांच पांच सहा सहा आवृत्त्या निघाल्या आहेत. ' भारतांतील सुबोध गोष्टी ' व ' सुबोध भागवत ' हीं लहान मुलांकरितां रा. करमरकर यांनीं लिहिलीं आहेत.

बंगाली कादंबरीकारांपैकीं बाबू बंकिमचंद्र हे महाराष्ट्रवाचकांच्या फार

आवडीचे ग्रंथकार आहेत. 'विषवृक्ष,' 'कृष्णकांताचें मृत्युपत्र,' 'दुर्गेशनंदिनी,' वगैरे त्यांच्या कादंबऱ्यांचें भाषांतर पूर्वीच झालें आहे. सध्यां त्यांच्या सर्व कादंबऱ्यांचें भाषांतर करण्याचें काम सुरू आहे. या वर्षीं प्रसिद्ध झालेल्या चतुर्थखंडांत त्यांच्या चार कादंबऱ्यांचीं भाषांतरें दिलीं आहेत. 'चार बंगाली कथा' यांत चतर्जी यांनीं लिहिलेल्या चार लघुकथांचें भाषांतर दिलें आहे.

वर दिलेल्या संक्षिप्त वृत्तांतावरून या वर्षीं प्रसिद्ध झालेल्या कादंबऱ्यांत कांहीं उच्च दर्जाच्या आहेत ही गोष्ट दिसून येईल.

इतिहास व राजकारण.

इतिहास व राज्यव्यवस्था या विषयावर बरींच पुस्तकें या वर्षीं प्रसिद्ध झालीं आहेत, पण त्यांपैकीं बहुतेक शालोपयोगी असल्यामुळें त्यांचेविषयींचा उल्लेख 'शालोपयोगी पुस्तकें' या भागांत केला आहे. याशिवाय या वर्षीं इतिहासाचीं ८ पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. यांपैकीं 'गझनीच्या महमदाच्या स्वाऱ्या' व 'शिवाजी आणि चंद्रराव मोरे' हीं दोन पुस्तकें नानासाहेब वैद्य यांनीं लिहिलीं आहेत. महमदाच्या स्वाऱ्या या पुस्तकांत मराठी इतिहासांत आजवर उपलब्ध नसलेली अशी त्या काळची पुष्कळ माहिती दिली आहे. हिंदी लोकांनीं दुर्बळपणें महमदाला अडथळा करण्याचा प्रयत्न केला नाहीं, यामुळें महमदाला सहज जय मिळाला, अशी समजूत प्रचलित आहे. ही समजूत या पुस्तकानें नाहींशी होईल. अनंगपाळ व जयपाळ यांनीं प्रतिकूळ परिस्थितीला न जुमानतां महमदाचा प्रतिकार करण्याचा जो प्रयत्न केला त्याजबद्दल या उभयतां पितापुत्रांबद्दल आदर व धन्यता वाटते. शिवाजी व चंद्रराव मोरे या छोट्या निबंधांत चंद्ररावाला विश्वासघातानें शिवाजीनें मारला हा जो आरोप शिवाजीमहाराजांवर येतो, त्याचें खंडन करण्याचा यत्न केला

आहे व आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ पुष्कळ पुरावा दिला आहे. रा. सरदेसाई यांनीं आपल्या मराठी रियासतीच्या मध्यविभागाचा ४ था भाग या वर्षी प्रसिद्ध केला आहे. यांत माधवराव पेशव्यांची संपूर्ण कारकीर्द आली आहे. माधवरावाची कारकीर्द ज्याप्रमाणें मराठी इतिहासांत उज्ज्वल आहे, त्याप्रमाणें मध्यविभागांत हा भाग भाषा, मांडणी व माहिती इत्यादि सर्वच बाबतींत सरस आहे. 'राजधानी सातारा' या पुस्तकांत प्रो. कुंभारे यांनीं साताऱ्याची ऐतिहासिक माहिती दिली आहे. 'दैवाचा सातारा' हें पुस्तक प्रबोधनकार रा. ठाकरे यांनीं लिहिलें आहे व त्यांत त्यांच्या नेहमींच्या जोरदार भाषेत साताऱ्चें राज्य जाण्याला व प्रतापसिंहाला पदच्युत करण्याला ज्या व्यक्ति कारणीभूत झाल्या त्या सर्वांच्या कारस्थानांचें वर्णन आहे.

रा. साने यांनीं पेशव्यांच्या बखरीची ५ वी आवृत्ति या वर्षी काढली आहे.

राजकारण

राजकारणावर या वर्षी चार पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांपैकीं 'आजच्या स्वराज्यसंस्था' व 'भावी हिंदी स्वराज्य' हीं दोन पुस्तकें नाशीकचे रावसाहेब वझे यांनीं लिहिलीं आहेत. पहिल्या पुस्तकांत सध्यांच्या ग्रामपंचायती, लोकलबोर्डें, म्युनिसिपॉलिट्या, कौन्सिलें यांत हळूहळू फरक करून नमुनेदार हिंदी स्वराज्य कसें बनवितां येईल हें सांगितलें आहे. दुसऱ्या पुस्तकांत आर्य लोकांच्या प्राचीन संस्थांचें वर्णन दिलें आहे व कालमानाप्रमाणें फरक करून याच संस्था पुन्हा स्थापिल्यास भावी हिंदी स्वराज्य कसें तयार होईल हें सांगितलें आहे. रावसाहेब वझे यांचीं मतें फारशीं कोणाला पसंत होतील असें नाहीं, तथापि त्यांनीं मिळविलेली माहिती फार महत्वाची व मनोरंजक आहे. आणि या दृष्टीनेंही तीं पुस्तकें वाचण्याजोगीं आहेत 'हिंदी राजकारणाचें स्वरूप' या पुस्तकांत इस्लामपूरचे जावडेकर यांनीं हिंदुस्थानासारख्या परतंत्र देशाचें राजकारण व दुसऱ्या स्वतंत्र देशाचें राजकारण यांतील

तफावत दाखविली आहे. रत्नागिरीचे नामजोशी यांच्या 'महायुद्ध व स्वराज्य' या पुस्तकांत महायुद्धामुळें व 'लीग ऑफ नेशन्स' या संस्थेच्या स्थापनेमुळें स्वराज्य मिळण्याची बरीच आशा आहे हें दाखविलें आहे.

धर्म.

धर्म या सदराखालीं येतील अशीं लहानमोठीं ३० पुस्तकें या वर्षी प्रसिद्ध झालीं आहेत. यांपैकीं ७ पुस्तकें खिस्ती धर्मोपदेशक संस्थांनीं खिस्ती-धर्मासंबंधाचीं प्रसिद्ध केलेलीं आहेत. एक पुस्तक जैन धर्माचें आहे. चार पुस्तकें थिऑसाफिकल सोसायटीच्या सभासदांनीं प्रसिद्ध केलेलीं आहेत; आणि बाकीचीं १८ पुस्तकें हिंदुधर्माच्या अनुयायांनीं लिहिलेलीं आहेत.

श्रीयुत पांगारकर यांनीं स्पष्टीकरणार्थ टीपा दिलेल्या एकनाथी भागवताची निर्णयसागर छापखान्यानें तिसरी आवृत्ति छापली आहे. श्री. बाळासाहेब पंत प्रतिनिधि यांच्या चित्ररामायणाची दुसरी आवृत्ति यंदा बाहेर पडली आहे. 'चित्ररामायणा' सारख्या सुंदर पुस्तकाची एक आवृत्ति खपण्याला इतका दीर्घ काल लागावा हें पाहून मन खिन्न होतें. 'भागवतधर्ममाला' या मालेचीं दोन पुस्तकें या वर्षी निघालीं आहेत. श्रीमद्भागवताच्या एकादशस्कंधाचें सुबोध मराठी भाषांतर करावें हा या मालेचा हेतु आहे.

'केवळ हिंदुधर्मासाठीं,' 'धर्माचे मूल सिद्धांत,' 'तरुण पिढी व उपनिषदें' हीं तीन पुस्तकें मराठी थिआसॉफिकल फेडरेशनचे चिटणीस रा. राजाराम सखाराम भागवत यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत. हीं तिन्ही पुस्तकं मिसेस ॲनी बेझंट यांच्या मूळच्या इंग्लिश ग्रंथांची अगर व्याख्यानांचीं भाषांतरें आहेत. 'मनाच्या शंका' हें लहानसें पुस्तक रा. मराठे यांनीं लिहिलें आहे व त्यांत थिऑसफीचे उद्देश काय आहेत हें सांगितलें आहे.

'अज्ञानास ज्ञान' व 'गुरुकिल्ली' हीं 'आनंद'-सांप्रदायी पुस्तकें

आहेत. 'कैवल्यबोध,' 'कुकुरमुंडें एथील सनातनधर्मीय साधूंचीं व्याख्यानें,' 'हरनाथ यांचीं पत्रें' यांत साधु पुरुषांनीं आपल्या शिष्यांना केलेला पारमार्थिक उपदेश दिलेला आहे. शांतिनिकेतन मालेचें ५ वें पुष्प या वर्षी प्रसिद्ध झालें आहे. या मालेचा उद्देश डॉक्टर रवींद्रनाथ टागोर यांच्या चरित्राची व तत्वज्ञानाची महाराष्ट्रजनतेला माहिती करून देणें हा आहे.

'सनातनधर्मप्रवेश' या पुस्तकाची द्वितीयावृत्ति या वर्षी निघाली आहे. सनातन हिंदु धर्माच्या मुख्य तत्वांची माहिती बनारस कॉलेजमधील विद्यार्थ्यांस व्हावी या हेतूनें हें पुस्तक लिहिलें आहे. वे. दिवेकर शास्त्री यांनीं हिंदुधर्माचीं तत्वें तरुण पिढीला समजावीं म्हणून एक माला प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. या मालेचें पहिलें पुस्तक हिंदुधर्मशिक्षण हें होय. दिवेकर शास्त्री यांचीं पुस्तकें उपयुक्त माहितीनें भरलेलीं असतात व जुन्याचा व नव्याचा मेळ घालण्याचा त्यांत प्रयत्न केलेला असतो. पुरंदरे कंपनीच्या कृष्णबोध या पुस्तकाची बारावी आवृत्ति निघाली आहे. गृहस्थाश्रमी मनुष्यानें प्रपंचांत कसें वागावें याजबद्दल श्रीकृष्णानें अर्जुनास केलेला बोध यांत दिला आहे. 'पवनविजय' या दुसऱ्या पुस्तकाची तिसरी आवृत्ति याच कंपनीनें प्रसिद्ध केली आहे. यांत योगाची साधारण माहिती दिली आहे.

धर्म या सदराखालीं या वर्षी नवीन असें महत्वाचें पुस्तक प्रसिद्ध झालेलें नाहीं.

वैद्यक व आरोग्य.

मराठी भाषेंत वैद्यक या विषयावर महत्वाचे मोठे ग्रंथ क्वचितच प्रसिद्ध होतात. वैद्यकीय शिक्षण इंग्लिश भाषेंतून मिळत असल्यामुळें विद्वान् लेखक वाचकांच्या अभावीं मराठींत ग्रंथरचना करण्यास धजत नाहींत. या वर्षी या विषयावर लहानमोठीं १२ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. सांगलीचे वैद्य रा. परांजपे

यांनीं सोप्या भाषेंत विद्यार्थ्यांकरितां लहानलहान पुस्तकें लिहिण्यास सुरवात केली आहे व त्यांचीं पुस्तकेंही विद्यार्थ्यांना आवडतात. या वर्षी ' मज्जा-तंतूंची दुर्बलता, ' ' अमृतपान ' व ' ताक व आरोग्य ' अशीं तीन पुस्तकें त्यांनीं प्रसिद्ध केलीं. पहिल्या पुस्तकांत शहरची राहाणी, व्यायामाचा अभाव, चहा, कॉफी, सिगारेट यांसारखीं व्यसनें, सिनेमासारख्या करमणुकी या योगानें तरुण पिढीचें आरोग्य बिघडून त्यांच्या मज्जातंतूंची शक्ति कमी झाली आहे हें दाखविलें आहे. ' अमृतपान ' या पुस्तकांत उषःपान केल्यानें आरोग्यदृष्ट्या कोणते फायदे होतात, हें सांगितलें आहे. ' ताक व आरोग्य ' या पुस्तकांत ताकाचे आरोग्यदृष्ट्या फायदे वर्णन केले आहेत. रा. कोगेकर यांनीं ' दूध हें पृथ्वीवरील अमृत होय ' या लहानशा पुस्तकांत अन्न या नात्यानें दुधाचें श्रेष्ठत्व वर्णन केलें आहे. ' लिंबू-चिकित्सा ' या चिमुकल्या पुस्तकांत वैद्यकीय दृष्ट्या लिंबाचे गुणधर्म सांगितले आहेत. सातारचे रा. चितळे यांनीं प्रसिद्ध केलेलें ' गर्भिणी स्त्रियांस उप-युक्त सूचना ' या पुस्तकाचा विषय त्याचे नांवावरून सूचित होतो.

' आयुर्वेदांतील मूलतत्त्वें ' व ' ज्वर ' हीं दोन महत्वाचीं पुस्तकें या वर्षी प्रसिद्ध झालीं आहेत. पहिल्या पुस्तकांत आयुर्वेदाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या रोगांची चिकित्सा केली आहे व त्यांवर उपाय सुचविले आहेत. दुसरें पुस्तक वे. शा. सं. रा. ओगले यांनीं लिहिलें आहे. हें पुस्तक ते त्या वेळीं लिहित असलेला मोठा ग्रंथ ' चिकित्साप्रभाकर ' याचा एक भाग आहे. यांत सर्व प्रकारच्या ज्वरांची आयुर्वेदाच्या पद्धतीनें चिकित्सा केली आहे व त्यां-वर उपाय सुचविले आहेत.

पाश्चात्यांच्या संततिनियमनाचा प्रवेश पुस्तकरूपानें महाराष्ट्रांत नुकताच झाला आहे. संततिनियमनाचे पुरस्कर्ते प्रो. कर्वे यांनीं या विषयावर आपलें पुस्तक प्रसिद्ध केलें. प्रो. फडके यांनींही याच विषयावर एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. दोन्हीही पुस्तकांत कृत्रिम उपायांनीं गर्भधारणा न होऊं

देण्याचे उपाय सांगितले आहेत. दोन्हीही पुस्तकांवर विरुद्ध टीका बरीच झाली. ' मनोवांछित संतति ' हें बरेंच मोठें पुस्तक बडोद्यांतील जुम्मादादा व्यायामशाळेंतील रा. आगडकर यांनीं प्रसिद्ध केलें आहे. या पुस्तकांत ब्रम्हचर्य, आरोग्य, व्यायाम या विषयांचें महत्व वर्णन केलेलें आहे.

रा. भागवत यांनीं वशीकरणशास्त्रावर मेस्मेरिझम म्हणून एक ग्रंथ या वर्षीं प्रसिद्ध केला आहे.

कायदा.

मराठी भाषेंत कायद्याचीं पुस्तकें फारच थोडीं होतात. कायद्याचीं पुस्तकें प्रसिद्ध करणारे रा. खांडेकर यांचा लॉ प्रिंटिंग व रा. राजमाचीकर यांचा न्यायाश्रय हे महाराष्ट्रांत दोन छापखाने आहेत. रा. खांडेकर यांनीं या वर्षीं कायद्याचें कोणतेंही पुस्तक प्रसिद्ध केलें नाहीं. रा. राजमाचीकर यांनीं ' वतनदाराचा ॲक्ट, ' ' सटीक पोलीसबाबद ॲक्ट आणि गुरांचें अतिक्रमण व जुगाराबद्दल ॲक्ट, ' ' वारस सर्टिफिकेट व प्रोबेट ' व ' हिंदुस्थानचा पुराव्याचा ॲक्ट ' अशीं चार पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत. रा. राजमाचीकर यांच्या कित्येक पुस्तकांच्या ९ आवृत्ति निघाल्या आहेत. ज्या कायद्यांची सामान्य जनतेला नेहेमीं गरज लागते, अशा कांहीं थोड्या कायद्यांशिवाय इतर कायद्यांचीं पुस्तकें मराठींत प्रसिद्ध होत नाहींत.

ज्योतिषशास्त्र.

ज्योतिषावर या वर्षीं एकंदर ८ पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांपैकीं १ ग्रहज्योतिषाचें व ७ फलज्योतिषाचीं आहेत. या सर्व पुस्तकांपैकीं अत्यंत महत्वाचा ग्रंथ ' करणकल्पलता ' हा होय. या योगानें नवीन पंचांग करण्यास अत्यंत साहाय्य होईल. हें पुस्तक पंचांगप्रवर्तक कमेटीनें प्रसिद्ध

केलें आहे. ‘ जातकमार्गोपदेशिका,’ ‘ ज्योतिषशास्त्राचा ओनामा,’ ‘ ज्योतिष-संग्रह, ’ ‘ परिभ्रमणपद्धति ’ हीं व नेपोलियनची ‘ शकुनवंती ’ हीं सर्व पुस्तकें फलज्योतिषाचीं आहेत. फलज्योतिषाचा आपल्या समाजावर केवढा पगडा आहे याचें हें निदर्शक आहे. वर्षबोध सन १९२५ व वर्षभाविष्य शके १८४७ या पुस्तकांत त्या वर्षाचें फलज्योतिषदृष्ट्या भाविष्य वर्णन केलें आहे.

कोश.

या वर्षीं डॉक्टर केतकर यांनीं आपल्या ज्ञानकोशाचे १० ते १५ असे भाग छापले. या भागांतील मुख्य विषयांचा उल्लेख त्या त्या भागाखालीं दुसरीकडे केला आहे. दर भागाचीं ४५० पानें, याप्रमाणें डॉ. केतकर यांनीं २७०० पानें या वर्षीं छापलीं आहेत. सन १९२४ व १९२५ या दोन वर्षीं मिळून ज्ञानकोशाचा अर्धा भाग लिहून झाला. हा कोश मराठी भाषेचें भूषण आहे. आणि त्या बद्दल महाराष्ट्रजनता डॉ. केतकर यांची सदैव ऋणी राहील.

धंदे व कला

मराठी भाषेंत धंद्यांची व कलांची माहिती देणारीं फारच थोडीं पुस्तकें प्रसिद्ध होतात. इतर देशांत या विषयांवर प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांची यादी पाहिली ह्मणजे मनाला वाईट वाटतें व उद्योगधंद्यांत आपण किती मागें आहोंत याची तीव्र जाणीव होते. या वर्षीं उद्योगधंद्यांविषयीं लहान मोठीं १३ पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. उद्योगधंद्याचीं लहान लहान उपयुक्त पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत धनंजय प्रेसचे मालक रा. सडेकर हे नेहमीं पुढाकार घेत असतात. या वर्षीं त्यांनीं ‘ कलावैभव ’ ‘ फलक्रीषशास्त्र, ’ ‘ मुलांसाठीं घरगुती धंदे, ’ ‘ स्त्रियांसाठीं घरगुती धंदे ’ व ‘ साबण ’

अशीं ५ पुस्तकें प्रसिद्ध केलीं. मुलांकरितां व स्त्रियांकरितां धंदे हीं पुस्तकें रा. परांजपे यांनीं लिहिलीं आहेत व त्यांत अनेक उपयुक्त पदार्थ करण्याविषयींची माहिती सोप्या भाषेंत दिली आहे.

लहानपणापासून मुलांना शास्त्रीय व औद्योगिक शिक्षण मिळावें व त्यांची जिज्ञासा वाढावी म्हणून रा. वाडदेकर यांनीं लहान लहान पुस्तकें मुलांकरितां लिहिण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. ' मुलांची औद्योगिक करमणूक ' हें पुस्तक लहान मुलांना फार मजेदार वाटेल.

अलीकडे मोटार हांकणें हा एक स्वतंत्र धंदाच होऊन बसला आहे. या धंद्यासंबंधीं आजवर मराठींत पुस्तकें नव्हतीं. ' फोर्ड मोटार ड्रायव्हर ' हें पुस्तक या धंद्यांतील नवशिक्यांकरितां लिहिलें आहे. ' विद्युत्स्वावलंबन ' हें लहानसें पुस्तक तारखात्यांत काम करणाऱ्या लोकांना उपयुक्त वाटेल.

दादर एथील इंडियन फ्री इंडस्ट्रियल एज्युकेशन सोसायटीचे चिटणीस रा. खळदकर यांनीं ' यांत्रिक शिक्षण ' व ' स्वतंत्र धंदेशिक्षण व यंत्रकला, हीं दोन लहान पुस्तकें या वर्षीं प्रसिध्द केलीं आहेत. ' धंदेशिक्षण भाग २ रा ' हें लहानसें पुस्तक याच पद्धतीचें आहे व तें पुण्याचे रा. चव्हाण यांनीं प्रसिद्ध केलें आहे. उमरावतीचे रा. सहस्रबुद्धे यांनीं हिंदुस्थानांतील उद्योगधंद्याची म्युनिशन बोर्डानें श्रमपूर्वक जमविलेली माहिती मराठी वाचकांना देण्याकरितां ' नूतन औद्योगिक निबंधमाला ' काढिली. तिचें १ लें पुस्तक काढल्यावर तिला आश्रय न मिळाल्यामुळें ती दुर्दैवानें बंद करावी लागली.

नाशिकचे रावसाहेब वझे यांनीं प्राचीन हिंदी एंजिनीअरिंगची माहिती श्रमपूर्वक जुळवून ती ' प्राचीन हिंदी शिल्पशास्त्रसार ' या पुस्तकांत दिली आहे.

कला.

कला या सदराखालीं येणारीं ५ पुस्तकें या वर्षीं प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांपैकीं दोन हार्मोनिअम-शिक्षणासंबंधानें आहेत व राहिलेलीं तीन संगीतावर आहेत. चित्रकला व इतर अनेक कला यांवर एकही पुस्तक प्रसिद्ध झालेलें नाहीं. कला व धंदे यांजवर प्रसिद्ध होणारें अत्यल्प वाङ्मय पाहून मनास फार वाईट वाटतें.

किरकोळ.

जीं पुस्तकें इतर सदराखालीं देतां येत नाहींत तीं किरकोळ या सदरांत दिलीं आहेत. या सदरांत या वर्षीं एकंदर ६३ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. यापैकीं १५ पुस्तकें निरनिराळ्या संस्थांचे वार्षिक अहवाल व त्यांजवरील टीकांचीं आहेत. किरकोळ या सदराखालीं जीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांजवरून महाराष्ट्रापुढें या वर्षीं कोणते प्रश्न प्रामुख्यानें होते याची सहज कल्पना करितां येईल. शिक्षण, बेकारी, शिशुसंगोपन, मुंबई येथील बावला यांच्या खुनाला खटला व पुणें येथील कै० जोतिबा फुल्यांच्या पुतळ्याचें प्रकरण यांनीं महाराष्ट्राचें लक्ष सन १९२५ सालीं वेधून घेतलें होतें असें दिसतें. असहकारितेच्या ओहोटीबरोबर राष्ट्रीय शिक्षणाच्या ठिकठिकाणीं स्थापन झालेल्या शाळांनाही ओहोटी लागली. अशा वेळीं शिक्षणाचा प्रश्न प्रामुख्यानें महाराष्ट्रजनतेपुढें असावा ही गोष्ट अगदीं साहजिक होती. ही संधी साधून केसरीचे संपादक रा. केळकर यांनीं लिहिलेले शिक्षणविषयक लेख संग्रहीत करून त्याचा पहिला भाग रा. विश्वनाथ आणि कंपनी यांनीं छापला. राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय, सध्यांच्या शिक्षणपद्धतींत दोष कोणते आहेत, विश्वविद्यालयांत कोणत्या सुधारणा केल्या पाहिजेत या गोष्टींचें या लेखांत विवेचन केलें आहे. रा. लेले यांनीं ‘ आमच्या शिक्षणाचा प्रश्न ’ या

लहानशा पुस्तकांत याच प्रश्नाचा विचार केला आहे. शारीरिक शिक्षणाची आवश्यकता समाजाला आतां जास्त तीव्रतेनें भासूं लागली आहे. कुस्ती, डबलबार, मलखांब, नमस्कार वगैरे व्यायामांवर या दोन चार वर्षांतच जास्त पुस्तकें होण्यास आरंभ झाला आहे. 'बडोद्यांतील शारीरिक शिक्षण' हें प्रो. माणिकराव यांचें पुस्तक अवश्य वाचण्याजोगें आहे. लष्करी शिक्षण घेणें किती अवश्य आहे हें रा. आपटे यांनीं एका लहानशा निबंधांत दाखविलें आहे. चित्रशाळेनें 'डबल बार' या व्यायामावर एक सचित्र पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. खेळ आणि व्यायाम या विषयावरील मराठींतील वाङ्मय अत्यंत अल्प आहे.

खेडेगांवांतील धंदे बसत चालले, शेतकीही फायदेशीर होईनाशी झाली, मध्यम वर्गांतिल बेकारी वाढत चालली, या प्रश्नांची समाजाला फार काळजी वाटत आहे. कादंबऱ्यांतून, निबंधांतून, वर्तमानपत्रांतून याच विषयाची चर्चा चाललेली आपणांस दिसून येते. 'हृदयाचे बोल' या पुस्तकांत खेड्यांच्या ऱ्हासाचा प्रश्न लेखकानें उत्कृष्टपणें पुढें मांडला आहे; व नवीन खतें व आउतें यांचा उपयोग केल्यास खेड्यांतील स्थिति सुधारेल असें लेखकानें दाखविलें आहे. 'खादीरहस्य' व 'आमचें कर्तव्य' यांत प्रत्येक मनुष्यानें खादी वापरणें व सूत काढणें किती अवश्य आहे हें दाखविलें आहे.

शिशुसप्ताहाच्या चळवळीस नुकतीच सुरवात झाल्यामुळें त्याजविषयीं कांहीं तरी नवीन वाङ्मय प्रसिद्ध व्हावें हें साहजिकच आहे. 'शिशुसप्ताह' 'शिशुसप्ताहास पुराणग्रंथप्रामाण्य' व 'शिशुसंगोपनावर चार शब्द' हीं पुस्तकें शिशुसप्ताहप्रसंगीं लिहिलेलीं आहेत. शेवटच्या पुस्तकांत शिशुसंगोपनासंबंधानें उपयुक्त माहिती सोप्या भाषेंत दिली आहे, ती प्रत्येक आईनें वाचावी.

या वर्षीं पुण्यास कै. रा. जोतिराव फुल्यांच्या स्मारकाचा प्रश्न पुण्याचे म्युनिसिपालिटीपुढें आला होता. सत्यशोधकांच्या चळवळीचा धुमसत असलेला अग्नि या प्रश्नानें एकदम पेटला. 'देशाचे दुष्मान' हें पुस्तक या

वेळीं प्रसिद्ध झालें. कै. रा. टिळक व विष्णुशास्त्री वगैरे मंडळी देशद्रोही होती व ब्राह्मणसमाजही देशद्रोही आहे, हा या पुस्तकाचा मथितार्थ होता. या पुस्तकाबद्दल लेखकावर खटला झाला. 'जोतिबा फुल्यांच्या पुतळ्याचा बोजवारा,' 'सत्यशोधक का खिस्तसेवक,' 'जोतिप्रणीत शुभ वर्तमान' हीं पुस्तकें याच वेळीं प्रसिद्ध झालीं. या वर्षी मुंबईतील प्रसिद्ध मुसलमान व्यापारी मि. बावला यांच्या खुनानें तेथें मोठी गडबड झाली. या खुनाशीं इंदूर येथील कितीएक अधिकारी मंडळीचा संबंध असल्यामुळें यांत इंदूरच्या महाराजांचाही हात असावा अशी वदंता पसरूं लागली. महाराजांचा बावला–प्रकरणाशीं यत्किंचित् संबंध नाहीं हें दाखविण्याकरितां प्रबोधन मासिकांत रा. ठाकरे यांनीं कांहीं लेख प्रसिद्ध केले, ते त्यांनीं संग्रहीत करून 'महामायेचा थैमान' व 'बजरंगी सोटा' हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं.

हिंदुसंघटणेचा व शुद्धीचा प्रश्न या वेळेस जोरानें स्वामी श्रद्धानंदांच्या पुरस्कारानें पुढें येऊं लागला होता. 'मराठा' या टोपण नांवाखालीं 'हिंदुत्व म्हणजे काय व हिंदुसंघटणेची किती आवश्यकता आहे' याचें विवेचन करणारें एक पुस्तक इंग्लिशमध्यें प्रसिद्ध झालें. त्याचें भाषांतर डॉ. सावरकर यांनीं केलें. ग्रंथकाराशीं जरी मतभेद होत असला तरी उत्कृष्ट भाषा व विचारसरणी या दोन्ही दृष्टींनीं हें पुस्तक वाचनीय आहे.

तांबेशास्त्री यांचें 'संसारदर्पण' हें पुस्तक मराठी वाचकांना बरेंच आवडलें आहे असें दिसतें. या पुस्तकावर वर्तमानपत्रांचे अभिप्राय फार चांगले आले होते. या पुस्तकाची पहिली आवृत्ति लवकरच संपली. संसारांत मनुष्यानें कसें वागावें व आलेल्या संकटांस धैर्यानें कसें तोंड द्यावें याचें उत्कृष्ट विवेचन या पुस्तकांत केलें आहे. 'विवेकामृत' हें संसारी माणसांना उपदेशपर पुस्तक आहे. 'विद्यार्थिमार्गप्रदीप' या पुस्तकांत विद्यार्थ्यांनीं कसें वागावें, अभ्यास कसा करावा हें सांगितलें आहे. सौ. गिरिजाबाई केळकर यांच्या 'गृहिणीभूषण' पुस्तकाची ५ वी आवृत्ति निघाली आहे,

एवढें सांगितलें म्हणजे त्या पुस्तकाच्या चांगुलपणाबद्दल जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं. यांत उत्तम गृहिणी कसें व्हावें याबद्दल मुलींना सदुपदेश केलेला आहे. 'मंगळसूत्र' या पुस्तकांत असाच उपदेश केलेला आहे. 'दसऱ्याचें सोनें' हा एका अनुभविक शिक्षकाचा भावी शिक्षकांना उपदेश आहे.

रा. शिवराम महादेव परांजपे यांचीं 'कालिदासानें न लिहिलेलें नाटक' व 'साहित्यसंग्रह, भाग २ रा' हीं दोन पुस्तकें या वर्षी प्रसिद्ध झालीं आहेत. पहिल्या पुस्तकांत कालिदासाच्या शाकुंतल नाटकावर सुंदर टीका आहे व दुसऱ्या पुस्तकांत शिवरामपंतांचे कांहीं मनोहर लेख संग्रहीत केले आहेत. प्रबोधनसंपादक रा. ठाकरे यांनीं प्रबोधनांत प्रसिद्ध झालेले आपले कांहीं लेख पुस्तकरूपानें प्रसिद्ध केले आहेत. 'आमचें ओजस्वी वाङ्मय' हा नानासाहेब पावगी यांचा निबंध विविध माहितीनें भरलेला आहे. 'शील व नीतिमत्ता' या सुंदर पुस्तकाची नवी आवृत्ति या वर्षी निघालेली आहे. हें पुस्तक हायस्कूल्स व ट्रेनिंग स्कूलसकरितां वाचनपुस्तक म्हणून मंजूर झालें आहे. 'महाराष्ट्रीय नाटककार गडकरी' ही गडकऱ्यांच्या नाटकावरील टीका आहे. '१९२४ चा महाराष्ट्र' हें एक नवीन धर्तीवर लिहिलेलें पुस्तक आहे. यांत निरनिराळीं पत्रें आहेत व या पत्रद्वारें १९२४ सालीं महाराष्ट्रांत चाललेल्या सामाजिक, औद्योगिक व राजकीय चळवळींचें वर्णन यांत केलें आहे. लेखकानें निरानिराळ्या पक्षांचीं मतें मोठ्या चातुर्यानें पुढें मांडिलीं आहेत.

'कवि व काव्यसूचि' हें जरी लहानसें पुस्तक आहे, तरी या पुस्तकांत दिलेली जुने महानुभाव कवि व त्यांचे ग्रंथ यांजबद्दलची माहिती रा. भावे यांनीं फार परिश्रमानें मिळविली आहे. 'वऱ्हाड शाळापत्रक' हें फार जुनें मासिक पुस्तक आहे, त्याचा सुवर्णमहोत्सव या वर्षी होता. तन्निमित्त संपादकांनीं एक ३०० पानांचा जादा अंक काढला. यांत निरानिराळ्या लेखकांचे बरेच लेख होते. वऱ्हाडचे शिक्षक, शिक्षणसंस्था, वऱ्हाडचे निरनिराळे पुढारी

यांजबद्दल पुष्कळ माहिती या अंकांत दिली होती. एवढा मोठा जादा अंक काढण्याचें श्रमाचें व खर्चाचें काम संपादकांनीं मोठ्या हौसेनें केलें याजबद्दल त्यांचें अभिनंदन करणें योग्य आहे.

ब्राह्मणसमाजाला स्वतःच्या संघटणेची आवश्यकता वाटूं लागली, हें ' ब्राह्मणसंरक्षण ' या पुस्तकावरून दिसतें. ब्राह्मणानें ऐहिक सत्ता व सुखोपभोग सोडून ज्ञानदान व अध्यापनाचें कर्तव्य करावें, असा उपदेश ' राष्ट्रीय सभेस ब्राह्मणांची विनंति ' या पुस्तकांत केला आहे.

शालोपयोगी.

भाषा:—शालोपयोगी पुस्तकांपैकीं 'भाषा' या सदराखालीं येणाऱ्या पुस्तकांचा आपण विचार केला तर, प्रसिद्ध झालेल्या ३९ पुस्तकांपैकीं १३ पुस्तकें क्रमिक पुस्तकांतील गद्यपद्यार्थांचीं पुस्तकें आहेत, असें आपणांस दिसून येईल. अर्थांचीं पुस्तकें वर्गांत न वापरण्याविषयीं शाळाखात्याची सक्त मनाई आहे. तिला न जुमानतां बहुतेक शाळांतून शिक्षक हीं अर्थांचीं पुस्तकें मुलांना विकत घेण्यास सांगतात व त्यांच्याकडून अन्वयार्थ व शब्दार्थ घोकून घेतात. या अन्वयार्थांच्या पुस्तकांपैकीं बहुतेक पुस्तकें अगदीं टाकाऊ असतात, तरीही पुण्यासारख्या शहरच्या शाळांतून या अशा पुस्तकांचा खप सररास सुरू असतो ही शोचनीय गोष्ट आहे. ' बालबोध बाल पुस्तकां ' त अक्षरांचे नवीन पद्धतीवर गट करून चित्रांतच त्या शब्दाचें अक्षर दिलें आहे. उदा०-चमचा या शब्दांतील च हें आद्याक्षर चमच्यांतच दाखविलें आहे. 'मुलांकरितां सोपे धडे' हें जोडाक्षरविरहित पुस्तक शिशुवर्गाकरितां लिहिलेलें आहे.

शुद्धलेखनाचे नियम ज्यांत दिले आहेत अशीं चार पुस्तकें या वर्षीं प्रसिद्ध झालीं आहेत. निबंधलेखनावर दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. व्याकरणावरील तीन पुस्तकांपैकीं ' व्याकरणप्रवेशिका ' हें पुस्तक नवीन

आहे. रा. रामचंद्र भिकाजी जोशी यांनीं आपल्या व्याकरणांत इंग्लिश व्याकरणाचें विनाकारण पुष्कळ ठिकाणीं अनुकरण केल्यामुळें व्याकरणाचा निष्कारण घोटाळा झाला आहे, अशी शिक्षकवर्गाची बरींच वर्षें ओरड आहे. यामुळें नवीन व्याकरण रचण्याकडे शिक्षक मंडळींचें लक्ष लागलें आहे. प्रसिद्ध मराठी व्याकरणकार कै. दामले यांच्या मताप्रमाणें आपल्या व्याकरणाची रचना रा. भावे व कुळकर्णी यांनीं केली आहे. यापुढील दोन भाग या ग्रंथकारांनीं प्रसिद्ध केले आहेत. या ग्रंथकारांचीं हीं पुस्तकें विद्यार्थ्यांना फार उपयुक्त वाटतील.

हायस्कूलसमधील विद्यार्थ्यांकरितां गद्य व पद्य उताऱ्यांचीं पुस्तकें अनेक ग्रंथकारांनीं केलीं आहेत. स्कूल लीव्हिंग सर्टिफिकेट परीक्षेला दरवर्षी नवीन गद्य व पद्य यांतील उतारे नेमिले जातात. यामुळें या उताऱ्यांचीं व त्यांचे स्पष्टीकरण करणारीं पुस्तकें दर वर्षीं प्रसिद्ध होत असतात. ‘ गद्य-विलास,’ ‘ पद्यविलास ’ हीं अशा प्रकारचीं पुस्तकें आहेत. रा. किनरे यांच्या ‘ काव्यामोदा ’ च्या कित्येक आवृत्ति निघाल्या आहेत. ‘वृत्तबोध’ हें पुस्तक कै. परशुरामपंत गोडबोले यांच्या प्रसिद्ध वृत्तदर्पणाच्या धर्तीवर लिहिलेलें आहे. त्यांत मराठी वृत्तांची माहिती दिली आहे. पण त्यांत ‘ वृत्तदर्पणा ’ ची मोहकता नाहीं. ‘ सुलभ अलंकार ’ या पुस्तकांत अलंकारांची दिलेली माहिती साधारण वाचकालाही मनोरंजक वाटेल. मराठी शब्दांच्या व्युत्पत्तीवर कै. बापट यांच्या ‘ व्युत्पत्तिप्रदीपा ’ सारखें लहानसें व उपयुक्त पुस्तक दुसरें नाहीं. या पुस्तकाची दहावी आवृत्ति या वर्षीं निघाली आहे.

इतिहास व राजकारण:—

या विषयावर गेल्या तीन चार वर्षांत मराठींत नवीन पुस्तकांची चांगलीच भर पडली आहे. विश्वविद्यालयानें इतिहास हा विषय हायस्कूलसमधून मराठींत शिकविण्याची परवानगी दिल्यामुळें व हिंदुस्तानची राज्यव्यवस्था या विषयाला प्राथमिक शाळांतून व हायस्कूलसमधून प्राधान्य मिळाल्यामुळें या विषयावर चांगलीं पुस्तकें लिहिलीं जावीं, ही गोष्ट अगदीं स्वाभाविक

होती. इतिहास व राजकारण यावर या वर्षी २५ पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. मोडक, बर्वे, ब्रोडस, कु. भालचंद्र व रा. साठे यांनीं लिहिलेले इंग्लंडचे इतिहास साधारण वाचकांना देखील मनोरंजक वाटतील. बर्वे व मोडक यांनीं चित्रें व नकाशेही देण्याचा उपक्रम केला आहे. विषयाची रचना, प्रतिपादन, विषयाला अनुरूप भाषा व माहिती या बाबतींत इंग्रजींत विद्यार्थ्यांकरितां लिहिलेल्या इतिहासांच्यापेक्षां हीं पुस्तकें खात्रीनें कमी दर्जाचीं नाहींत. भारतीय राज्यव्यवस्थेवरील पुस्तकें नवाथे, नेने, करंदीकर वगैरे मंडळींनीं परिश्रमपूर्वक लिहिलीं आहेत. खालील इयत्तेंत इतिहास गोष्टीरूपानें शिकवावा हें तत्व आतां मान्य झालें आहे. या तत्त्वानुरूप रा. बोरवणकर, रा. फफे, रा. मोडक, रा. करमरकर वगैरे लेखकांनीं महाराष्ट्राचा इतिहास लिहिला आहे, व त्या पुस्तकांच्या दर वर्षी नवीन नवीन आवृत्ति निघत आहेत. हिंदुस्तानच्या इतिहासाला गोष्टींच्या रूपानें सुरवात करण्याची पद्धति शाळांत सुरू झाली आहे. यामुळें हिंदुस्तानच्या इतिहासांतील निवडक गोष्टी देणारीं पुस्तकें प्रसिद्ध होऊं लागलीं आहेत. रा. आपटे यांचें नवीन पुस्तक 'ऐतिहासिक दंतकथा व गोष्टी' हें विद्यार्थ्यांना फार आवडेल.

भूगोलः—

या वर्षी भूगोलाचीं ४८ पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांपैकीं २१ पुस्तकांत तालुक्याचा भूगोल दिला आहे व ११ पुस्तकांत जिल्ह्यांचा भूगोल दिला आहे. दुसऱ्या इयत्तेला तालुक्याचा भूगोल असतो व तिसऱ्या इयत्तेला जिल्ह्याचा भूगोल असतो. जे तालुके मोठाले आहेत व ज्यांत पुष्कळ शाळा आहेत अशा तालुक्यांचे भूगोल बहुधा प्रसिद्ध होतात. लहान मुलांकरितां मनोरंजक पद्धतीनें भूगोल लिहिण्याची पद्धति आपल्याकडे अद्यापि विशेष प्रमाणांत सुरू झाली नाहीं. बहुतेक भूगोलाच्या पुस्तकांत गांवें, नद्या, पोष्ट-ऑफिसें, डोंगर, उत्पन्नाचे जिन्नस या सगळ्यांच्या याद्या दिलेल्या असतात. प्रारंभीं एक लहानसा नकाशा दिलेला असतो व चित्रांचा पूर्ण अभाव असतो.

हीं पुस्तकें लहान मुलांचे हातीं शिक्षक देतात व त्यांजमधील माहिती मुलां-कडून पाठ करून घेतली जाते. भूगोल शिकविण्याची ही ठराविक पद्धति बहुतेक शाळांतून सुरू असल्यामुळें हा विषय मुलांना किती कंटाळवाणा वाटत असेल याची कल्पना सहज करितां येईल. शिक्षणखात्यानें भूगोल शिकविण्याच्या बाबतींत केलेले नियम पाळण्यापेक्षां मोडण्याकडे पुष्कळ शिक्ष-कांची प्रवृत्ति असते. यामुळें हीं याद्या दिलेलीं भूगोलपत्रकें त्यांना भारी आवडतात व या कारणानेंच त्यांचा खपही विलक्षण होतो. पण मुलांना योग्य अशींही कांहीं थोडीं पुस्तकें आतां प्रसिद्ध होऊं लागलीं आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. या पुस्तकांतील वर्णनें गोड असतात. भरपूर चित्रें व नकाशे यायोगानें मुलांना हा विषय मनोरंजक वाटावा व तो त्यांना चांगला कळावा अशी योजना या पुस्तकांतून केलेली असते. मुलांना कार्य-कारणसंबंध कळावा, व विचारशक्तीचा त्यांना उपयोग करितां यावा अशा पद्धतीनें हीं पुस्तकें लिहिलेलीं असतात. रा. गोखले, रा. खांडेकर व रा. ठोंबरे यांचे भूगोल या नवीन पद्धतीनें लिहिलेले आहेत व म्हणूनच ते मुलांना मनोरंजक वाटतात.

अंकगणितः—

या विषयावर गोखले व लिमये यांनीं लिहिलेलीं पुस्तकें आतां अगदीं जुनीं झालीं आहेत. दुसऱ्या, तिसऱ्या व चवथ्या इयत्तेकरितां नवीन पद्ध-तीनें लिहिलेल्या पुस्तकांची अत्यंत जरूर भासूं लागली आहे. रा. महाजन यांनीं या दिशेनें थोडासा प्रयत्न केला आहे. हायस्कूलसमधील बीजगणित मराठीमधून शिकविण्याचा उपक्रम सुरू झाल्यापासून मराठींत बीजगणि-ताचीं पुस्तकें लिहिण्यास प्रारंभ झाला आहे.

आरोग्यः—

आरोग्य या विषयाला मुलींच्या अभ्यासक्रमांत विशेष प्राधान्य मिळा-ल्यामुळें व ट्रेनिंग कॉलेज व हायस्कुलें यांत या विषयास जागा मिळाल्यामुळें

या विषयावर तीन चार चांगलीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. रा. देशमूख यांचें 'आरोग्यशास्त्र' माहिती, विवेचनपद्धति व आकृति यांमुळें सरस झालें आहे.

सृष्टिनिरीक्षणः—

प्राथमिक शाळांतून सृष्टिनिरीक्षण हा विषय आवश्यक झाला आहे. या विषयावर मुलांना योग्य अशीं पुस्तकें अगदींच नव्हतीं. रा. देशपांडे यांचें 'कीटकशास्त्र' सोप्या भाषेंत लिहिलेलें आहे. वर्णनात्मक पद्धतीनें पुस्तक लिहिलेलें असल्यामुळें व त्यांत भरपूर आकृति असल्यामुळें हें पुस्तक मुलांना फार आवडेल. पशुपक्षी यांच्या संबंधानें याच धर्तीवर त्यांनीं पुस्तक लिहिल्यास बालवाङ्मयांत ही उपयुक्त भर पडेल. 'सृष्टिनिरीक्षण' व 'वनस्पतींचीं फुलें,' 'शाळेंतलि बाग,' 'सृष्टिशास्त्र' हीं पुस्तकें प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या उपयोगी पडतील. शेतकी शाळांकरितां लिहिलेलें पाठात्मक कृषिशास्त्र हें त्या शाळांतील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना उपयुक्त वाटेल. हायस्कूलसमधून शास्त्रीय विषयही मराठींतून शिकविण्याची परवानगी मिळाली आहे. यामुळें या विषयावर पुस्तकें लिहिण्यास प्रारंभ झाला आहे. रा. श्रीखंडे यांचें आद्यमापन हें विज्ञानशास्त्राचें प्रारंभींचें पुस्तक आहे.

गोष्टीः—

मुलांच्या शिक्षणांत गोष्ट या विषयाचें महत्व अद्यापि आपल्या शिक्षकांच्या व पालकांच्या लक्षांत नीट आलेलें नाहीं. रा. वासुदेवराव आपटे, मालवणचे रा. मिसाळ, चित्रशाळेचे रा. जोशी हे व आनंद, बालोद्यान, कन्याशिक्षक हीं मासिकें या बाबतींत प्रयत्न करीत आहेत. या वर्षी मुलांना योग्य अशीं गोष्टींचीं ५।६ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. त्यांत रा. आंबेकर यांचे हितोपदेशाच्या भाषांतराचा उल्लेख केला पाहिजे. हें भाषांतर चांगलें वठलें आहे. बालचमूची चळवळ आतां बरीच लोकप्रिय झाल्यामुळें बालचमुविषयक वाङ्मय व गोष्टी मराठींत प्रसिद्ध होऊं लागल्या आहेत.

शिक्षणविषयकः—

दहा वर्षांपूर्वी मराठी भाषेंत शिक्षणविषयक वाङ्मय नव्हतेंच असें म्हटलें तरी चालेल. पण गेल्या १० वर्षांत त्यांत थोडाफार भर पडत चालली आहे ही आनंदाची गोष्ट आहे. 'शिक्षक आणि शिक्षण' हें पुस्तक सामान्य वाचकांनाही मनोरंजक वाटेल. 'पालक आणि शिक्षक यांनीं हें पुस्तक अवश्य वाचावें' अशी विविधज्ञानविस्तारानें त्याची शिफारस केली आहे. या पुस्तकाची चौथी आवृत्ति या वर्षी प्रसिद्ध झाली आहे. 'टांचणांचे नमुने' व 'स्मरणशक्ति व ती कशी वाढवावी' हीं पुस्तकें ट्रेनिंग कॉलेजचे विद्यार्थी व प्राथमिक शाळांतील शिक्षक यांजकरितां लिहिलेलीं आहेत.

'भाषाशास्त्र व मराठी भाषा' हें नवीन पुस्तक रा. कुळकर्णी यांनीं लिहिलें आहे. भाषाशास्त्र हा विषय अद्यापि मराठी वाचकांना परिचित झालेला नाहीं. रा. कुळकर्णी यांनीं आपल्या विषयाची माहिती चांगली दिली आहे. हें पुस्तक इंग्रजी न जाणणाऱ्या शिक्षकांना उपयुक्त वाटेल. ठाण्याचे रा. विनायकराव भावे यांनीं आपल्या 'महाराष्ट्र सारस्वत' या मराठी भाषेच्या सुंदर इतिहासाची नवी आवृत्ति काढली आहे. प्रत्येक शिक्षकानें हें पुस्तक अवश्य वाचण्याजोगें आहे.

आणखी एका शालोपयोगी पुस्तकाचा या ठिकाणीं उल्लेख केला पाहिजे. तें पुस्तक म्हणजे रा. साठे 'यांचें सुलभ अर्थशास्त्र' होय. या लहान पुस्तकांत अर्थशास्त्राच्या मुख्य तत्वांचें विवेचन इतक्या सोप्या रीतीनें केलें आहे कीं, प्राथमिक शाळांतील वरच्या इयत्तांतील मुलांनाही तें कळेल.

या वर्षी प्रसिद्ध झालेल्या शालोपयोगी पुस्तकांकडे नजर टाकल्यास असें दिसून येईल कीं, मराठींत विषय शिकविण्याची परवानगी मिळाल्यावर त्या विषयांचीं उत्कृष्ट पुस्तकें तयार होण्यास वेळ लागला नाहीं.

तत्त्वज्ञान.

या विषयावर या वर्षी लहान मोठीं १७ पुस्तकें प्रसिद्ध झालीं. यांत स्वतंत्र असें एकही पुस्तक नाहीं. योगशास्त्रावर प्रसिद्ध झालेल्या दोन पुस्तकांपैकीं एक पुस्तक मिसेस ॲनी बेझंट यांनीं दिलेल्या इंग्लिश व्याख्यानांचें भाषांतर आहे. दुसरें पुस्तक नागपूर प्रांतांतील प्रसिद्ध साधु गुलाबराव महाराज यांनीं लिहिलें आहे. महाराजांनीं यापूर्वींच या पुस्तकाचे दोन भाग प्रसिद्ध केले आहेत. या वर्षीं प्रसिद्ध झालेलें पुस्तक हा या ग्रंथाचा तिसरा भाग आहे. तो प्रश्नोत्तररूपानें लिहिला आहे. श्रीज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभव व चांगदेवपासष्टी' या ग्रंथांचें सरळ भाषांतर पुणें येथील इंदिरा प्रेसचे मालक रा. त्र्यं. ह. आवटे यांनीं कांहीं वर्षामागें प्रसिद्ध केलें. त्याची चौथी आवृत्ति या वर्षी निघाली आहे. 'गीतासंगति' व 'लघुगीता' या दोन लहान पुस्तकांत श्रीमद्भगवद्गीतेचें सार देण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीशंकराचार्यांच्या प्रस्थानत्रयीचें सार पंडित निश्चलदासजी यांनीं हिंदींत काढलें आहे, त्याचेंच भाषांतर आळंदी येथील ह. प. साखरेबुवा यांनीं केलें आहे. या सारांशाचीं अष्टपत्री सांच्याचीं ३७५ पानें झालीं आहेत. हारितायन ऋषींच्या त्रिपुरारहस्य-ज्ञानखंड या संस्कृत ग्रंथाचें रूपांतर ज्ञानविलास प्रेसचे मालक रा. बाळकृष्ण भाऊ जोशी यांनीं कांहीं दिवसांपूर्वीं केलें होतें, त्याची द्वितीय आवृत्ति या वर्षीं निघाली आहे. ' मानसोपचार ' या लहानशा पुस्तकांत रा. बोपोरीकर यांनीं गीता व उपनिषदें यांच्या आधारें ईश्वराची मानसपूजा कशी करावी हें सांगितलें आहे. पूर्वमीमांसापद्धतीबद्दल बहुजनसमाजांत फार गैरसमज आहे. न्यू पूना कॉलेजला जोडलेलें मीमांसाविद्यालय उघडतांना या पद्धतीचा इतिहास थोडक्यांत प्रोफेसर काणे यांनीं इंग्रजींत सांगितला. प्रोफेसर काणे यांचें हें भाषण उत्तम माहितीनें भरलेलें आहे. त्याचें भाषांतर अमरावतीचे विद्वान् लेखक रा. पु. बा. साठे यांनीं केलें आहे. रा. साठे

यांच्या 'पूर्वमीमांसापद्धतीचा इतिहास' या पुस्तकानें पूर्वमीमांसापद्धतीची साधारण वाचकाला चांगली कल्पना येईल. बंगालचे प्रख्यात साधु रामकृष्ण परमहंस यांच्या धर्ममतांचा, तत्त्वज्ञानाचा व बोधाचा सहज व सुलभ रीतीनें लाभ व्हावा म्हणून त्यांच्या कांहीं उक्ति रा. मिसाळ यांनीं 'रामकृष्ण-बोधामृत' या पुस्तकांत दिल्या आहेत. महात्मा गांधी यांचीं मतें रशियन तत्त्वज्ञानी काउंट टॉलस्टाय यांच्या तत्त्वज्ञानाशीं जुळत असल्यामुळें टॉलस्टाय यांच्या ग्रंथाकडे महाराष्ट्र जनतेचें लक्ष साहजिकपणेंच वेधलें. 'टॉलस्टायचें तत्त्वज्ञान' या पुस्तकांत नेरूरकर यांनीं टॉलस्टाय यांच्या ग्रंथांतील कांहीं उताऱ्यांचें भाषांतर दिलें आहे. 'ज्ञानदीप' या पुस्तकांत रा. कुळकर्णी यांनीं याच तत्त्वज्ञानाच्या मतांचें दिग्दर्शन केलें आहे. हें पुस्तक स्टेड साहेबांच्या इंग्रजी पुस्तकाचें भाषांतर आहे.

शिरडी येथें प्रसिद्धीस आलेले साधु साईबुवा स्वर्गस्थ झाल्यावर त्यांच्या शिष्यवृंदानें त्यांचें चरित्र, कथा, बोध, उक्ति व तत्त्वज्ञान यांची माहिती महाराष्ट्र जनतेला देण्याकरितां श्रीसाईबाक्सुधा नांवाचें मासिक पुस्तक सुरू केलें. त्यांतील ७ अंकांचा स्वतंत्र ग्रंथ शिष्यवृंदानें या वर्षीं प्रसिद्ध केला. 'समाधि-मार्ग' हें बौद्ध तत्त्वज्ञानाचें पुस्तक आहे. यांत प्रसिद्ध बौद्ध लेखक धर्मानंद कौसांबी यांनीं मनुष्याला समाधि कशी लावतां येईल याचें विवेचन केलें आहे.

मनोरंजन प्रेसनें या वर्षीं स्वामी रामतीर्थ यांच्या चरित्राचा, लेखांचा व भाषणांचा दुसरा भाग प्रसिद्ध केला. श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या ग्रंथाचा सरळ अर्थ देण्याकरितां रा. लिमये यांनीं एकमाला सुरू केली होती, पण ती लवकरच बंद झाली.

मासिकें व नियतकालिकें.

ज्ञातिविषयकः—

या वर्षीं एकंदर ६४ नियतकालिकें सुरू होतीं, त्यापैकीं १३ ज्ञाति-

विषयक होतीं. या ज्ञातिविषयक मासिकांत त्या त्या ज्ञातीच्या हिताचा विचार केलेला असतो. यांतील कांहींचा खप फारच मर्यादित आहे. 'प्रभुप्रभाता'-सारख्या कांहीं मासिकांत गोष्टी, कविता वगैरे सामान्य वाचकांना मनोरंजक वाटतील असेही विषय येतात. कासार, तेल्गू-समाचार, त्वष्टा, नूतन शैव, प्रभुप्रभात, भंडारीविजय, विविध लेखसंग्रह, शैवब्राम्हण, क्षात्रसेवक, शिक्षण-प्रकाश व ब्राह्मणपत्रिका हीं ज्ञातिविषयक नियतकालिकें होत. वंदे जिनवरम् व राजहंस हें जैनधर्मीय लोकांचें मासिक आहे.

धर्मविषयकः—

अंकुश, धर्मजागृति, साईलीला, साईवाक्सुधा, स्त्रियांची मैत्रीण, पुरुषार्थ व मुमुक्षु हीं सात धर्मविषयक नियतकालिकें होत. यांतील अंकुश हें गाणपत्यांचें मासिक आहे. धर्मजागृति हें मराठी थिऑसफिस्ट मंडळींचें मुखपत्र आहे. ठाण्याचे रा. भागवत हे त्याचे संपादक आहेत. शिरडीचे परलोकवासी साधुपुरुष साईमहाराज यांच्या भक्तांनीं साईलीला व साई-वाक्सुधा हीं दोन मासिकें चालविलीं आहेत. यांत त्या सत्पुरुषाच्या उक्ति व त्यानें केलेले चमत्कार यांचें वर्णन दिलेलें असतें. पुरुषार्थ हें मासिक आर्यसमाजाचे अनुयायी रा. सातवळेकर यांनीं चालविलें आहे. याची भाषा जोरदार असते व विचार प्रगमनशील असतात. रा. पांगारकर यांचें मुमुक्षु हें वारकरी सांप्रदायाचें व ब्राह्मणधर्माचें एक मुखपत्र झालें आहे. यांत धर्म-विषयक व भक्तिमार्गाचे लेख येत असतात. स्त्रियांची मैत्रीण हें स्त्रियांकरितां ख्रिस्ती समाजानें चालविलेलें मासिक आहे.

मुलांकरितां:—

आनंद, बालोद्यान व सुमन हीं तीन मासिकें बालवर्गाकरितां आहेत. यांतील सुमन हें अलीकडे अव्यवस्थितपणें निघत आहे; व बालोद्यानानें महिन्याचे महिन्यास अंक न काढतां एकदम पशुपक्ष्यादि प्राण्यांच्या गोष्टींनीं भरलेला एक जोडअंक काढण्याची पद्धत अलीकडे स्वीकारली आहे. यामुळें

त्यांतील बरीचशी गोडी कमी झाली आहे. आनंद मासिकानें बालवाचकाला रंजविण्याचें व त्याला ज्ञान प्राप्त करून देण्याचें आपलें काम अव्याहत चालविलें आहे. प्रौढ वाचकांकरितां एक पुरवणी देण्याचा नवीन उपक्रम त्यानें सुरू केला आहे.

औद्योगिक:—

महाराष्ट्र कृषीवल, शेतकी व शेतकरी, सहकारी मित्र, दूत, किर्लोस्कर-खबर व उद्यम या मासिकांत उद्योगधंदे व शेतकी यांचा विचार केलेला असतो. महाराष्ट्र कृषीवल, आणि शेतकी व शेतकरी, हीं शेतकरी समाजा करितां आहेत. सहकारी मित्र यांत इलाख्यांतील सहकारी चळवळीची हकिगत दिलेली असते; इतर देशांतील या चळवळीचें क्षेत्र, तिचा प्रसार, तिचें कार्य यांचीही माहिती यांत दिलेली असते. दूत हें मासिक अलीकडे टिकेकर-वाडीचे रहिवासी व धनुर्धारीचे चिरंजीव रा. टिकेकर यांनीं सुरू केलें आहे. यांत लहान लहान धंद्यांची उपयुक्त माहिती दिलेली असते. किर्लोस्करखबर या मासिकानें मराठी नियतकालिकांत पुष्कळच अघाडी मारलेली आहे. या मासिकाइतका खप चित्रमयजगत खेरीजकरून दुसऱ्या कोणत्याही मासिकाचा नाहीं. यांतील मजकूर माहितीनें भरलेला व तरुण पिढीला प्रोत्साहन देणारा असतो. उत्तम छपाई, सुंदर चित्रें, विविध विषयांची चांगली माहिती यां-योगें हें मासिकपुस्तक महाराष्ट्रांतील सर्व लोकांस अत्यंत प्रिय झालें आहे. उद्यम हें मासिक नागपूर येथील प्रसिद्ध वकील रा. पाध्ये हे काढीत असतात. यांत निरनिराळ्या उद्योगधंद्यांची उपयुक्त माहिती विचारपूर्वक दिलेली असते.

शिक्षणविषयक:—

कन्याशिक्षक, नवा शिक्षक, मराठी शिक्षक, शिक्षक, व वऱ्हाड शाळापत्रक, हीं शिक्षणविषयक पांच मासिकें आहेत. यांतील वऱ्हाड शाळापत्रक हें फार जुनें मासिक आहे. या मासिकानें नुकताच आपल्या अर्धशतवार्षिक सुवर्ण-महोत्सवानिमित्त विविध माहितीनें भरलेला असा जादा अंक प्रसिद्ध केला.

कन्याशिक्षक हें मासिक प्राथमिक शिक्षकांच्या व पालकांच्या उपयोगाकरितां पुणें येथील ट्रेनिंग कॉलेज फॉर वुइमेन ही संस्था चालवीत असते. यांत अगदीं लहान मुलांकरितां सोप्या कविता, गाणीं, मनोरंजक गोष्टी, स्थलवर्णनें व खेळ हीं येत असतात. याशिवाय निरनिराळे विषय कसे शिकवावे व ते मुलांना कसे मनोरंजक करावे याचें विवेचन केलेलें असतें. बालस्वभाव व बालमताची प्रवृत्ति यांचाही विचार केलेला असतो. प्रौढ मुलांकरितां कविताही दिलेल्या असतात. प्राथमिक शाळेच्या शिक्षणाविषयीं यांतील लेख फार काळजीपूर्वक लिहिलेले असतात. नवा शिक्षक हें मासिकपुस्तक अहमदनगरचे विद्वान मिशनरी रेव्हरंड मिस्टर राइट हे चालवीत असतात. अमेरिकेंतील शिक्षणविषयक कल्पना मराठींत आणण्याचा विशेष प्रयत्न या मासिकांत केलेला असतो. मराठी शिक्षक हें मासिक पुणें येथील ट्रेनिंग कॉलेज फॉर मेनचे प्रिन्सिपॉल आज तेरा वर्षें चालवीत आहेत. यांत प्राथमिक शाळेच्या शिक्षकांकरितां शिक्षणक्रमासंबंधीं माहिती दिलेली असते, त्यांना आपल्या कामांत येणाऱ्या अडचणींचें व शंकांचें निवारण केलेलें असतें. शिक्षक हें मासिक पुस्तक मागासलेल्या शिक्षकांकरितां चालविलें आहे. यांत शिक्षणविषयक लेख येत असतात व मागासलेल्या शिक्षकांचीं गाऱ्हाणीं व त्यांच्या आकांक्षा यांचा विचार केलेला असतो.

मनोरंजक:—

अरुण, चित्रमयजगत, मनोरंजन, प्रफुल्लता, व पूर्णानंद, हीं पांच मासिकें सामान्य जनतेला मनोरंजन व ज्ञानप्राप्ति करून देणारी आहेत. यांतील मनोरंजन हें फार जुनें आहे. मनोरंजनाला ३०वें वर्ष लागलें आहे. महाराष्ट्रामध्यें हें मासिक फार प्रिय झालेलें आहे. स्त्रियांचे लेख आजपर्यंत या मासिकांतच येत असत. केशवसुत, गडकरी, रेव्हरंड मि. टिळक, रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर वगैरे अनेक प्रसिद्ध कवींचीं काव्यें याच मासिकांत आलेलीं आहेत. रागिणीसारख्या सुंदर कादंबऱ्याही याच मासिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत.

चित्रमयजगत, हें मराठींतील पहिल्या प्रतीचें मासिक आहे. याच्या इतका खप दुसऱ्या कोणत्याही मासिकाचा नाहीं. यांत उत्तम चित्रें घातलेलीं असतात. सुरेख गोष्टी, कादंबऱ्या, शास्त्रीय माहिती, या योगानें हें मासिक फार आकर्षक झालें आहे. विचारपूर्वक लिहिलेले व ज्ञयविषयक लेखही या मासिकांत मधून मधून आढळतात. महात्मा गांधींच्या असहकारितेचा व खादीचा यांत उपदेश असतो.

शाळांनीं चालविलेलीं:—

कांहीं मोठमोठ्या शाळांतील विद्यार्थी शिक्षकांचे मदतीनें त्रैमासिकें चालवीत आहेत. या मासिकांत त्या शाळेंतील चळवळीची हकिकत, मुलांनी लिहिलेल्या गोष्टी, कविता, ऐतिहासिक व सामान्य विषयांवरील लेख असतात. अशीं मराठी मासिकें पुणें शहरांतच प्रसिद्ध होत असतात. नूतन मराठी विद्यालय, पुणें क्यँप एज्युकेशन सोसायटी (पुष्पवाटिका); हुजूरपागेंतलि मुलींचें हायस्कूल (बालिकादर्श), व महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचें हायस्कूल, अशा चार संस्था आपआपलीं त्रैमासिकें चालवीत आहेत. चिंचवड एथील अनाथ विद्यार्थिगृहही स्वावलंबन नांवाचें आपलें स्वतंत्र त्रैमासिक पुस्तक चालवीत आहे.

ऐतिहासिकः—

इतिहासाला वाहून घेतलेलीं दोन मासिकें सन १९२५ सालीं चालू होतीं. पुणें एथील भारत ऐतिहासिक संशोधक मंडळ आपलें एक त्रैमासिक चालवीत आहे. या मासिकांत मंडळ आपलें संशोधनवृत्त देत असतें. यांत अप्रकाशित पत्रें प्रसिद्ध होत असतात. रामदास आणि रामदासी या मासिकानें समर्थांचें वाङ्मय प्रसिद्ध करण्याचें व समर्थांच्या संप्रदायाची माहिती देण्याचें कार्य आस्थापूर्वक कितीएक वर्षे चालविलें आहे.

वाङ्मयात्मकः—

केवळ मनोरंजन हेंच ध्येय न बाळगतां वाङ्मयसेवा करणाऱ्या मासिकांत

विविधज्ञानविस्तार हें श्रेष्ठ होय. हें मासिक आज जवळ जवळ ६० वर्षें चाललें आहे. वर्गणीदार भरपूर नसतांनाही उच्च वाङ्मयसेवेचें व्रत या मासिकानें अव्याहत चालविलें आहे. आणि म्हणूनच महाराष्ट्राला त्याचा अभिमान वाटतो. महाराष्ट्रांतील अनेक कसलेल्या लेखकांचे यांत बहुविध विषयांवर लेख येत असतात. डॉ. केतकर यांचें विद्यासेवक याच प्रकारची वाङ्मयसेवा करीत आहे. कै. प्रो. टिपणीस यांनीं सुरू केलेलें व नंतर रा. विरकूड ह्यांच्या स्वाधीन केलेलें महाराष्ट्रसाहित्य यानेंही वाङ्मयसेवा चांगली चालविली होती. पण रा. विरकूड हे नोकरीनिमित्त बाहेर गेल्या-मुळें व या मासिकाचे पायीं त्यांना बरीच नुकसानी आल्यामुळें महाराष्ट्र साहित्याचा अवतार लवकरच संपला. बडोद्याचें द्वैमासिक सहविचार, याची जास्त जास्त सुधारणा होत आहे. यांतील लेखही भारदस्त असतात. प्रबोधन हें रा. ठाकरे यांचें मासिक सामाजिक व ऐतिहासिक बाबीला विशेष महत्व देतें. रा. सडेकर यांचा लोकमित्र आज ३० वर्षें आपलें काम अव्याहत करीत आहे. या मासिकानें मनोरंजन व बहुविध प्रकारची माहिती देण्याचें आपलें काम अनेक अडचणींला न जुमानतां चालविलें आहे. याज-बद्दल रा. सडेकर यांचे अभिनंदन करणें योग्य आहे. गोंव्यासारख्या दूर ठिकाणीं राहून महाराष्ट्रवाङ्मयाची सेवा करण्याची भारत-मित्राची हौस कौतुकास्पद आहे. समाजसेवक हें समाजसेवेला वाहिलेलें एकच मासिक आहे. समाजसेवेचे चाललेले प्रयत्न, मजुरांची स्थिति सुधारण्यास अवश्य करावयाच्या गोष्टी, इतर देशांतील समाजसेवेची हकीकत इत्यादि माहिती या मासिकांत दिलेली असते.

स्त्रियांकरितां:—

केवळ स्त्रियांसाठीं चालविलेलें ‘आर्य गृहिणी’ एवढेंच मासिक या वर्षी चालू होतें. या मासिकांत प्रसिद्ध स्त्रियांचीं चरितें देण्यांत येतात.

काव्यें:—

काव्याला वाहून घेतलेलीं काव्यरत्नावलि व रसवंती हीं दोन मासिकें चालू सालीं सुरू होतीं. काव्यरत्नावलि आज बरींच वर्षें चालू आहे व तिचें आयुष्य केवळ रा. फडणीस यांच्या दीर्घ प्रयत्नावर व चिकाटीवर अवलंबून आहे. रा. अधिकारी यांनीं मराठी कवींकरितां रसवंती म्हणून मासिक काढिलें, पण तें लौकरच बंद पडलें.

तत्त्वज्ञान:—

तत्त्वज्ञान विषयाचें विवेचन करणारें मराठी एकच त्रैमासिक आहे, तें तत्वज्ञानमंदिर हें होय. हें अमळनेर येथ प्रसिद्ध होत असतें. यांत पाश्चात्य व भारतीय दोन्हीही तत्वज्ञानाच्या पद्धतींचा विचार केलेला असतो.

ज्योतिष व व्यायाम:—

फलज्योतिपाचें 'हर्षल' हें मासिक आहे. व्यायामासंबंधीं 'व्यायाम' हें एकच मासिक आहे व तें उत्कृष्टपणें चालत आहे.

मराठी मासिकांची स्थिति द्रव्यदृष्ट्या समाधानकारक नाहीं. चार हजारांवर ज्यांच्या वर्गणीदारांची संख्या आहे, अशीं चित्रमयजगत, किर्लोस्करखबर, मनोरंजन, आनंद व मराठी शिक्षक यांसारखीं हाताचे बोटांवर मोजण्यासारखीं मासिकें आहेत. एक हजाराचेवर पण तीन हजारांचे आंत वर्गणीदार असलेलीं विद्यासेवकासारखीं कांहीं थोडीं मासिकें आहेत. छपाई व पोष्टेज हींच भागवितां भागवितां व्यवस्थापकांना पुरेसें होतें, मग संपादकाला वेतनाची आशाच नको, अशा स्थितींत ज्यांचे स्वतःचे छापखाने आहेत अगर ज्यांचें वाङ्मयाच्या प्रेमामुळें लिहिण्याचें काम सुरू असतें, असेच लोक द्रव्याची अपेक्षा न करितां मासिकें चालवीत असतात.

———

१९२५ चें मराठी वाङ्मय.

चरित्रें.

श्रीएकनाथमहाराज यांचें चरित्रः– लेखक आजगांवकर जे. आर. पृष्ठें २०८. प्रकाशक के. बी. ढवळे. प्रसिद्धीचें ठिकाण ठाकूरद्वार मुंबई नंबर २. प्रसिद्धीची तारीख १०।७।२५. साईझ क्राऊन १६ पेजी; प्रथम आवृत्ति. किंमत १२ आणे. मुद्रक सी. एस देवळे, मुंबईवैभव प्रेस, मुंबई नंबर ४. प्रती ४०००.

यांत आतांपर्यंत उपलब्ध झालेली नाथविषयक वंशावळीसुद्धां सर्व माहिती दिली आहे. समकालीन कवींचीही यांत माहिती दिली आहे. नाथांच्या काव्यांचें विस्तृत विवेचन केलें आहे व कांहीं वेंचेही दिले आहेत.

तुकारामबोवाः–ले. भिडे बी. ए. पृष्ठें १००, प्र. के. बी. ढवळे, प्र. ठि. ठाकुरद्वार मुंबई नंबर २, प्र. ता. १०।७।१९२५, साईज क्राऊन १६ पेजी. प्र. आ. किं. ॥८६, मु. सी. एस. देवळे, मुंबईवैभव प्रेस, मुंबई. प्रती ४०००.

तुकारामबुवांची आध्यात्मिक उन्नति कशी होत गेली याचें उत्कृष्ट विवेचन या ग्रंथांत आहे.

गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांचें चरित्रः––लेखक बोरवणकर आर. जी. पृष्ठें ८०, प्रकाशक लेखक. प्रसिद्धीचें ठिकाण गणेश लॉज ठाणें, प्रसिद्धीची तारीख १५।७।२५. साईझ क्राऊन, प्रथम आवृत्ति. किंमत १२ आणे. सचित्र. मुद्रक जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स ४९५।९६ शनिवार पेठ पुणें शहर. प्रती १०००.

हें चरित्र फारच त्रोटक आहे. भाषाही कांहीं ठिकाणीं अगदीं शुद्ध अशी नाहीं. चरित्रलेखकाला लेखनाला योग्य अशी भरपूर सामुग्री न मिळाल्यामुळें त्याला त्रोटक चरित्रच देऊन भागवावें लागलें. सार्वजनिक काकांचें हें पहिलें चरित्र होय. या चरित्राला रा. वामन मोरेश्वर पोतदार यांनीं प्रस्तावना जोडली आहे.

श्रीएकनाथचरित्रः–लेखक पांगारकर एल्. आर. पृष्ठें २००. प्रकाशक जी. एम्. वीरकर. प्रसिद्धीचें ठिकाण ६२१ गिरगांव रोड मुंबई, नंबर ४; प्रसिद्धीची तारीख २७ जुलै १९२५, साईझ डबल क्राऊन १६ पेजी. आवृत्ति तिसरी. किंमत १२ आणे. मुद्रक ए. एस. गोखले, विजय प्रेस, ५७० शनवार पेठ पुणें. प्रती ३१००.

रा. पांगारकर यांना नाथांच्या संबंधानें अधिक कांहीं माहिती न मिळाल्यामुळें ही तिसरी आवृत्ति दुसऱ्या आवृत्तीची नक्कल आहे. फक्त नाथांच्या श्रीमद्भागवतांतून ५ पानें वेंचे शेवटीं दिले आहेत.

सत्याग्रही बसवेश्वरः–ले. भिडे एल्. आर. पृष्ठें २०, प्र. बाळप्पा ब्रेंदाडे प्र. ठि. दावणगिरी, किं. २ आणे. प्र. ता. १५।१२।२४. आवृत्ति दाखल नाहीं. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस पुणें. प्रती २०००.

लिंगाईत पंथाचा आद्य संस्थापक श्रीबसवदेव यांनीं आयुष्यांत अनेक प्रसंगीं जो सत्याग्रह केला त्याचें वर्णन या छोट्या पुस्तकांत दिलेलें आहे.

देशभक्त गंगाधरराव देशपांडे यांचें चारित्र–पृष्ठें ७६, ले. एस्. के. कोण्णाल, प्र. ठि. बेळगांव, प्र. ता. २१।१२।२४, आवृत्ति १ ली, किं. ६ आणे. मु. व्ही. बी. रेंगे, धुंडिराज छापखाना, बेळगांव; प्रती १०००.

महात्मा गांधींचे अनुयायी व बेळगांवचे कांग्रेसपक्षाचे पुढारी रा. देशपांडे यांचें हें संक्षिप्त चरित्र आहे.

महात्मा गांधी–ले. राष्ट्रसेवक, पृ. १३२. प्र. डी. जी. सडेकर. प्र. ठि.

बेळगांव, प्र. ता. २२।१२।२४. प्रथम आवृत्ति, किं. ८ आणे. मु. डी. जी. सडेकर, धनंजय प्रेस, खानापूर, जि. बेळगांव. प्रती २०००.

सन १९२४ सालीं बेळगांव येथें महात्मा गांधींच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे वेळीं हें पुस्तक प्रसिद्ध झालें. लोकमित्र मासिकाच्या ग्राहकांस हें पुस्तक वार्षिक भेट म्हणून रा. सडेकर यांनीं वाटलें. या पुस्तकास रा. सदाशिव लक्ष्मण सोमण यांनीं प्रस्तावना लिहिली आहे.

थॉमस पेनचें चरित्र—ले. मुंडले व्ही. डी. पृष्ठें २२०. प्र. मुंडले व्ही. डी. प्र. ठि. इस्लामपूर, सातारा; प्र. ता. १८।१२।२४. प्रथम आवृत्ति; किं. २ रु. (सचित्र); मु. ए. एस. गोखले, विजय प्रेस, पुणें शहर. प्रती १०००.

अमेरिकेंत वसाहत करणाऱ्या इंग्लिश लोकांपैकीं प्रसिद्ध व सुशील पुढारी थॉमस पेन याचें हें चरित्र आहे. अमेरिकेला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यास जे थोर पुरुष कायावाचामनेंकरून झटले, त्यांपैकीं थॉमस पेन हा एक आहे. त्यानें अमेरिकेला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां जो त्रास व जीं दुःखें सोशिलीं त्यांचें सुंदर वर्णन या पुस्तकांत दिलें आहे.

श्रीमाधवनाथदीपप्रकाश—ले. नाथसुत, पृ. ३३४. प्र. आर. एन. कुलकर्णी; प्र. ठि. इंदूर; प्र. ता. ३१ जाने. १९२५; आवृत्ति १ ली; किं. २८८ रु. मु. नी. एस. चिने व के. आर. गोंधळेकर; श्रीगजानन प्रिंटिंग प्रेस इंदूर व जगद्धितेच्छु प्रेस पुणें शहर. प्रती १०००.

या ग्रंथांत श्रीसद्गुरु माधवनाथ महाराज, संस्थान चित्रकूट, यांचें चरित्र वर्णन केलें आहे. तें ओंवीवृत्तांत आहे. ग्रंथ पोथीवजा आहे. ओवीसंख्या पांच हजार आहे. महाराजांच्या लीला व त्यांचा उपदेश हीं यांत ग्रथित केलीं आहेत. हठयोग, राजयोग यांचीही या ग्रंथांत माहिती आहे.

जॉर्ज वॉशिंग्टन याचें चरित्र—ले. आपटे व्ही. टी. पृ. १०४, प्र. ए. पी. बापट, प्र. ठि. बुधवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. २५।२।२५,

साईझ क्राऊन १६ पेजी. प्रथम आवृत्ति; किं. ०८; मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, शनवार पेठ पुणें शहर. प्रती २०००.

अमेरिकेला स्वातंत्र्य मिळवून देणारा थोर पुरुष जॉर्ज वॉशिंग्टन याचें हें चरित्र मुलांकरितां लिहिलेलें आहे.

श्रीशिवछत्रपतींचें सप्तप्रकरणात्मक चरित्र:—ले. चिटणीस मल्हार रामराव; पृ. ३७६, प्र. के. एन्. सानें; प्र. ठि. कल्याण; प्र. ता. १९।१।२५, साईझ क्राऊन १६ पेजी. किं. २ रु. मु. ए. व्ही. पटवर्धन आर्यभूषण प्रेस, पुणें. प्रती १०००.

चिटणिसांच्या बखरीची ही नवी आवृत्ति इतिहाससंशोधक रावबहादुर साने यांनीं काढली आहे. यांत जागजागीं मागील आवृत्तीपेक्षां जास्त टीपा दिल्या आहेत.

श्रीगुरुगोविंदमहाराज यांचें चरित्र—ले. काळे डॉ. पी. व्ही. पृ. १३६, प्र. लेखक. प्र. ठि. नाशिक, प्र. ता. १२।२।२५, साईझ क्राऊन १६ पेजी. प्रथम आवृत्ति. किं. १ रु. (सचित्र) मु. एल. बी. कोंकाटे. हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ पुणें शहर, प्रती १०००.

खानदेशमधील क्षेत्र सोनगीर येथील साधु गुरु गोविंद यांचें हें चरित्र आहे. यांत महाराजांनीं केलेल्या चमत्कारांचेंही वर्णन आहे. चरित्र प्रेमळ व रसाळ आहे.

मुलांचें रामदास—ले. करमरकर व्ही. व्ही. पृ. ५३. प्र. एम्. बी. गोडबोले. प्र. ठि. सदाशिव पेठ पुणें, प्र. ता. ६।३।२५, साईझ डेमी, प्रथम आवृत्ति, किं. ५ आणे. मु एम्. बी. गोडबोले, वृत्तप्रसारक प्रेस, ५३० सदाशिव पेठ पुणें. प्रती १०००.

मुलांकरितां सोप्या भाषेंत हें चरित्र लिहिलेलें आहे.

श्रीमच्छत्रपति शाहूमहाराज यांचें चरित्र—ले. लठ्ठे ए. बी. पृ. ५२४,

प्र. बी. एल. पाटील; प्र. ठि. कोल्हापूर, प्र. ता. १०।५।२५. साईझ डेमी ८ पेजी. आवृत्ति १ ली, किं. २ रु., (सचित्र); मु. डी. ए. सावंत, श्रीरामतत्वप्रकाशक प्रेस बेळगांव, प्रती २२००.

कै. शाहू छत्रपति (कोल्हापूर) यांचें हें चरित्र रावबहादूर लठ्ठे यांनीं लिहिलेलें आहे. मूळ चरित्र इंग्लिशमध्यें आहे, त्याचें हें भाषांतर आहे.

समर्थांचें सामर्थ्य किंवा रामदासस्वामींचा लीलानुग्रह—ले. आठल्ये के. एन्. पृ. ७५१; प्र. के. बी. ढवळे; प्र. ठि. ठाकूरद्वार मुंबई नं. ४; प्र. ता. २९।१।२५; साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली; किं. २॥. रु. मु. के. आर. गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, ५०७ शनिवार पेठ पुणें. प्रती ४०००.

केरळकोकीळकर्ते रा. आठल्ये यांनीं हें रामदासस्वामींचें चरित्र लिहिलें आहे. समर्थांनीं केलेल्या अनेक अद्भुत गोष्टींचाहीं यांत समावेश केलेला आहे. हें पुस्तक ऐतिहासिक दृष्टया व चिकित्सक दृष्टया लिहिलेलें नाहीं असा याजवर टीकाकारांचा आक्षेप आहे.

बंगाली क्रांतिकारक बारींद्रकुमार घोष—पृ. १६, प्र. जी. व्ही. गोखले, प्र. ठि. ५३९ शनिवार पेठ, पुणें. प्र. ता. १५।४।२५; साईझ क्राऊन; प्रथम आवृत्ति; किं. २ आणे; मु. जी. व्ही. गोखले, नारायण प्रेस, ५३९ शनिवार पेठ, पुणें. प्रती २०००.

बंगाली क्रांतिकारक उपेंद्रनाथ बानर्जी:—पृ. २४; प्र. जी. व्ही. गोखले; प्र. ठि. ५३९ शनिवार पेठ, पुणें; प्र. ता. १५।५।२५; साईझ क्राऊन; प्रथम आवृत्ति; किं. ०१ आणा; मु. जी. व्ही. गोखले, नारायण प्रेस ५३९ शनिवार पेठ, पुणें. प्रती २०००.

हे युगांतर पत्राचे संपादक होते. त्यांना अलीपूरच्या बॉंब केसमध्यें जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा झाली. ते कैदेंतून सुटून आल्यावर त्यांनीं आत्मचरित्र लिहिलें त्याचा हा अनुवाद आहे. बंगाली तरुणांच्या आचारविचा-

रांत कसा फरक पडत चालला आहे हें या पुस्तकावरून कळतें.

डॉ. ॲनि बेझंट यांचें चरित्रः–ले. भागवत आर. एस. पृ. ५५; प्र. लेखक; प्र. ठि. ३२१ शनिवार पेठ, पुणें. प्र. ता. १।५।२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली; किं. ०४ आणे; मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ, पुणें. प्रती १०००.

सुबोध कृष्णचरित्र–ले. करमरकर व्ही. व्ही. पृ. ६२, प्र. एम्. बी. गोडबोले, प्र. ठि. पुणें शहर. प्र. ता. १।८।२५; साईझ डेमी, आवृत्ति १ ली, किं. ६ आणे. मु. एम्. बी. गोडबोले वृत्तप्रसारक प्रेस, पुणें शहर. प्रती १०००.

हें चरित्र मुलांकरितां सोप्या भाषेंत लिहिलें आहे.

वीररत्न बाजी प्रभु देशपांडे–ले. कुलकर्णी बी. एस. पृ. ७४; प्र. लेखक; प्र. ठि. दादर, मुंबई नं. १४; प्र. ता. १८।६।२५; साईझ क्राऊन, प्रथम आवृत्ति, (सचित्र); किं. १२ आणे; मु. बी. आर. कद्रेकर, रवींद्र प्रिंटिंग वर्क्स, गिरगांव, मुंबई. प्रती १५००.

शिवाजी महाराजांचा शूर स्वामिनिष्ठ सरदार बाजी देशपांडे याचें हें लहानसें चरित्र आहे. बाजी देशपांडे यांच्या वंशाचीही हकीकत यांत दिली आहे. या कुटुंबांतील अस्सल सनदांच्याहि नकला दिल्या आहेत.

मोरोपंतांचें चरित्र–ले. परांजपे श्रीधर विष्णु; पृ. २२८; प्र. पांडुरंग जावजी; प्र. ठि. मुंबई; प्र. ता. १।६।२५; साईझ डेमी ८ पेजी; आवृत्ति ४ थी (सुधारून वाढविलेली); किं. १०८ रु. मु. रामचंद्र येसू शेडगे, निर्णयसागर प्रेस, मुंबई; प्रती २०००.

या पुस्तकांत मोरोपंतांचें समग्र चरित्र दिलें आहे. नंतर पंतांच्या काव्यांतील गुणदोषांचें उत्कृष्ट विवेचन केलें आहे. लेखकानें पंतांची निरनिराळ्या कवींशीं तुलना केली आहे. एका भागांत पंतांच्या निरनिराळ्या ग्रंथांतील निरनिराळे रस दाखविणारीं उदाहरणें घेतलीं आहेत.

न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे—ले. फाटक एन. आर. पृ. ५९६, प्र. एन्. आर. फाटक, प्र. ठि. ३६४ ठाकूरद्वार मुंबई; प्र. सा. १९२४. प्रथम आवृत्ति; किं. ३ रु. (सचित्र); मु. ए. ए. मोरमकर, श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, ३६४ ठाकूरद्वार, मुंबई.

न्यायमूर्ति रानडे यांचें सविस्तर लिहिलेलें असें हें पहिलेंच वाचनीय चरित्र आहे. चरित्रलेखकानें परिश्रमपूर्वक माहिती गोळा केली आहे.

श्रीनिरंजनबोध—ले. नवांगुळ बी. एस. पृ. २८; प्र. लेखक; प्र. ठि. कऱ्हाड, प्र. ता. २५।३।२५; साईज रॉयल; आवृत्ति १ ली; किं. २॥ आणे, मु. पी. बी. कोल्हापुरे, सुमंत प्रेस, कऱ्हाड. प्रती ५००.

नामदार गोखले यांचें चारित्र—ले. साने पी. एस. पृ. ३१४; प्र. व्ही. जी. ताम्हणकर, प्र. ठि. बुधवार पेठ पुणें. प्र. ता. १०।३।२५; साईज क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र); किं. २ रु. साधी, २॥ रु. कापडी बांधणी. मु. के. आर. गोंधळेकर व एस्. एन्. जोशी जगद्धितेच्छु प्रेस व चित्रशाळा प्रेस पुणें. प्रती २०००.

रा. साने यांनीं कै. गोपाळराव गोखले यांचें हें चरित्र उत्कृष्ट लिहिल्या-बद्दल सर्वमतांच्या वर्तमानपत्रकर्त्यांनीं त्यांचें अभिनंदन केलें. यास प्रो. पोत-दार यांनीं प्रस्तावना जोडली आहे. तींत चरित्रकाराला रा. गोखले व टिळक यांजबद्दल वाटत असलेल्या सारख्याच प्रेमाचा व आदराचा उल्लेख केला आहे. रा. साने यांची भाषा संस्कृतशब्दामिश्रित पण गोड व जोमदार आहे.

पुरश्चरणकांडः—ले. दीक्षित के. एच. पृ. ७०; प्र. डी. जी. सडेकर; प्र. ठि. खानापूर (बेळगांव); प्र. ता. १६।२।२५; साईज डेमी, आवृत्ति १ ली; किं ॥३ आणे. मु. डी. जी. सडेकर, घनंजय प्रेस, खानापूर (बेळ-गांव); प्रती ५००.

समर्थ रामदासस्वामी यांचें संपूर्ण माहितीनें भरलेलें चरित्र रा. दीक्षित

हे प्रसिद्ध करणार आहेत. त्यांनीं पुरश्चरणकांड हा भाग या वर्षीं प्रसिद्ध केला आहे. त्यांत समर्थांनीं १२ वर्षें तपश्चर्या केली त्या वेळची हाकिगत दिली आहे.

नाटकें

भरतभाव:—ले. दांदे एम्. व्ही. पृष्ठें ९६; प्र. लेखक. प्र. ठि. परेळ मुंबई, प्र. ता. १८।१२।२४; प्रथम आवृत्ति; किं. ८ आणे, मु. डी. के. फडके, अरुणोदय प्रेस ठाणें, प्रती १०००.

या नाटकांत स्त्रियांची भूमिका मुळींच नाहीं. शाळेंतील वार्षिक अगर इतर समारंभांचे वेळीं विद्यार्थ्यांनीं करावयाजोगें हें नाटक आहे.

संगीत नंदकुमार—ले. गुर्जर व्ही. एस. पृ. ८०, प्र. लेखक, प्र. ठि. केळशी, जि. रत्नागिरी; प्र. ता. १८।१।२५; प्रथम आवृत्ति; किंमत १ रु. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, पुणें शहर, प्रती ५०००.

गंधर्व नाटक मंडळीकरितां हें नाटक लिहिलें आहे. राधाकृष्णांचें प्रेम हा या नाटकाचा विषय आहे.

राजाचें बंड—ले. टी. एस्. कारखानीस, पृष्ठें १४३, प्र. लेखक. प्र. ठि. पुणें शहर, प्र. ता. १३।१२।२४; प्रथम आवृत्ति; किं. १ रु. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस पुणें शहर. प्रती ५०००.

राजसत्तेला जगांत कोठेंही जी उन्मत्तपणाची अवस्था येत असते ती जमेस धरून त्या अवस्थेंत राजबीजाला आपल्या आंगच्या दैवी शक्ति प्रकट करण्याची संधि केव्हां व कशी मिळू शकते याची दृश्य काव्याचे रूपानें मीमांसा हा प्रस्तुत नाटकाचा प्रतिपाद्य विषय असून अशा प्रकारें राजबीजानें दैवी शक्ति प्रकट करणें याचेंच नांव ' राजाचें बंड ! ' प्रजेला आपलीशीं

करून हें बंड यशस्वी कसें करतां येतें हें प्रस्तुत नाटकांत दाखविण्याचा प्रयत्न आहे. पण हें या नाटकाचें भौतिक रूप होय. आत्मिक रूप वेगळें असून तोच नाटकाचा खरा उद्देश होय. जगांतील कोणतेंही महत्कृत्य करण्याचें सामर्थ्य हें पुरुषाचें सामर्थ्य असलें तरी तें अनेक कारणांनीं अप्रकट किंवा सुप्त स्थितींत राहिलेलें असतें. त्याला जागृत करून कार्य करावयास लावणारी जगांतील खरी शक्ति म्हणजे स्त्रियांच्या हृदयांत प्रेमरूपानें जी वास करते तीच होय. हें तत्व विशद करून दाखविणें हा या नाटकाचा उद्देश होय.

त्राटिका नाटक—ले. केळकर व्ही. बी. पृ. १५२; प्र. जे. आर. रानडे, सेक्रेटरी, श्रीसरस्वतीमंडळ; प्र. ठि. शनवार पेठ, पुणें शहर; प्र. ता. २४।११।२४; आवृत्ति ५ वी; किं. १ रु. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग प्रेस, पुणें शहर. प्रती ३०००.

शेक्सपिअरच्या 'टेमिंग ऑफ धि श्रू' या नाटकाची ही प्रतिकृति सुप्रसिद्ध मराठी लेखक कै. प्रो. वासुदेव बळवंत केळकर, प्रोफेसर फर्ग्युसन कॉलेज, यांनीं सन १८८९ सालीं छापिली; हें नाटक फारच लोकप्रिय झालें. शाहूनगरवासी मंडळी हें करीत असे व महाराष्ट्र नाटकमंडळी करीत आहे. या नाटकाची ही ५ वी आवृत्ति आहे. उद्दाम प्रकृतीच्या पण सरळ अंतःकरणाच्या स्त्रीला पतीनें आज्ञाधारक स्त्री बनवून उभयतांचा संसार कसा सुखमय केला हें यांत सांगितलें आहे.

प्रतापी प्रतापसिंह:—ले. कुलकर्णी एच. के. पृ. ३६; प्र. एस्. एन्. जोशी, प्र. ठि. पुणें शहर, प्र. तां. ४।१२।२४; आवृत्ति १ ली, किं. ३ आणे, मुद्रक एस्. एन्. जोशी, चित्रशाळा प्रेस, पुणें. प्रती १०००.

या लहान नाटकाचे तीन अंक आहेत. उदेपूरचा राणा प्रतापसिंह याच्या आयुष्यांतील एका प्रसंगावर हें नाटक रचलें आहे.

मुक्तधारा:—भाषांतरकार एस्. जी. भावे, पृ. ९६, प्रकाशक ए.

सी. भट, प्र. ठि. पुणें शहर, प्र. ता. १०।१२।२४; आवृत्ति १ ली; किं. ८ आणे, मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, पुणें शहर, प्रती २०००.

कविसम्राट रवींद्रनाथ टागोर यांच्या याच नांवाच्या नाटकाचें हें भाषांतर आहे. जुलमी राजसत्ता कशी टिकत नाहीं, व मनुष्याच्या स्वातंत्र्याला बांध घालणें किती अशक्य व अप्रयोजक आहे हें यांत दाखविलें आहे. भाषांतर बरें साधलें आहे.

प्रबोधचंद्रोदय नाटकः—भाषांतरकार जी. व्ही. सावंत, पृ. ८२, प्र. लेखक, प्र. ठि. कुडाळ, सावंतवाडी संस्थान; प्र. ता. १२।१।२५; आवृत्ति १ ली, किं. १४ आणे, मु. एस. जी. विरकूड, रवींद्र प्रिंटिंग प्रेस, आंबेवाडी, गिरगांव मुंबई. प्रती १०००.

मूळचें संस्कृत नाटक श्रीकृष्णमिश्र यांनीं लिहिलेलें आहे. बौद्ध, जैन, पाशुपत वगैरे मतांचें खंडन करून उपनिषदांतील तत्वज्ञान व हिंदुधर्म किती श्रेष्ठ आहे हें दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. नाटकांतील विनोद सामान्य वाचकांचीही करमणूक करील.

नवा खेळः—ले. वरेरकर बी. व्ही. पृ. ८६, प्र. बी. डी. पानवलकर, प्र. ठि. २०, कांदेवाडी मुंबई, प्र. साल १९२४, आवृत्ति १ ली, किं. १८४ रु. (सचित्र); मु. महादेव सखाराम थोरात व आर. एम. मंडलीक, हेरल्ड प्रिंटिंग प्रेस मुंबई ४ व लोकमान्य प्रेस मुंबई ४; प्रती माहीत नाहींत.

संगीत राणीचा बावटा—ले. के. के. जोशी, पृ. ११८; प्र. टी. ए. चिवटे, प्र. ठि. मिरज, प्र. ता. २५।३।२५, साईझ क्राऊन १६ पेजी. प्रथम आवृत्ति, किं. १२ आणे (सचित्र) मु. डी. आर. मित्र, मनोरंजन प्रेस, सँढर्स्ट रोड, मुंबई ४; प्रती २०००.

महाभारतांतील प्रमिला राणीनें अर्जुनाशीं केलेल्या स्वयंवराच्या कथेवर या नाटकाची उभारणी केली आहे.

संगीत सौभद्र नाटक—ले. किर्लोस्कर बी. पी. पृ. १४४, प्र. ए. व्ही. पटवर्धन, प्र. ठि. पुणें, प्र. ता. २२।५।२५, साईझ डेमी ३२ पेजी. पुनर्मुद्रण किं. १२ आणे; मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. प्रती १०००.

सौभाग्यलक्ष्मी—ले. शुक्ल एस्. ए. पृ. १३६, प्र. एस्. आर. सरनाईक, प्र. ठि. किर्लोस्कर थिएटर पुणें शहर. प्र. ता. ३०।४।२५, साईझ क्राऊन १६ पेजी. प्रथम आवृत्ति, किं. १ रु. मु. एस्. एन्. जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ पुणें. प्रती २१००.

तरुण विधवांच्या पुनर्विवाहाबद्दल लोकमत अनुकूल करण्यास हें सामाजिक नाटक लिहिलें आहे. प्रिन्सिपॉल भाटे यांनीं याला प्रस्तावना लिहिली आहे.

संगीत वरवंचना—ले. टेंभे जी. एस्. पृ. ८८, प्र. लेखक, प्र. ठि. ६६ शुक्रवार पेठ पुणें; प्र. ता. २९।४।२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी. प्रथम आवृत्ति, किं. १२ आणे (सचित्र); मुद्रक ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती ३१००.

इंग्लिश नाटककार शेरिडन याच्या Duenna या नाटकाच्या आधारें हें नाटक लिहिलें आहे.

संगीत कुंजविहारी—ले. वरेरकर बी. व्ही. पृ. ९२, प्र. जे. बी. निमकर, प्र. ठि. माधवाश्रम मुंबई, प्र. ता. १।३।२५, साईझ क्राऊन १६ पेजी. आवृत्ति २ री, किं. १॥ रु. मु. एम्. एस्. थोरात, हेरल्ड प्रेस, १० वा गिरगांव बॅक रोड मुंबई ४. प्रती ५०००.

श्रीकृष्णाच्या कुंजवनांतील लीला, हा ह्या नाटकाचा प्रधान विषय आहे.

आरोग्य—पृ. १६, प्र. जी. के. देवधर, प्रॉव्हेनशिअल सेक्रेटरी नॅशनल बेबी वुईक प्राव्हेनशिअल कमेटी; प्र. ठि. मुंबई; प्र. ता. ११।६।२५; साईझ क्राऊन १६ पेजी. प्रथम आवृत्ति, किं. दीड आणा. मु. एस्. टी. आजगांवकर, मनोरंजन प्रेस, सँढर्स्ट रोड, मुंबई ४. प्रती १५००.

सामाजिक आरोग्यावर मिस् सी. एल्. सायलर यांनीं लिहिलेल्या लहान इंग्लिश नाटकाचें हें भाषांतर रा. माधवराव शिर्के यांनीं केलें आहे. रा. गोपाळराव देवधर यांनीं या पुस्तकास प्रस्तावना लिहिली आहे.

आरोग्य–पृ. २४; प्र. जी. के. देवधर, ऑनररी प्राव्हेन्शिअल सेक्रेटरी नॅशनल बेबी वुइक. प्र. ठि. ३ रा सँढर्स्ट रोड मुंबई; प्र. ता. २२।७।२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी. आवृत्ति २ री, किंमत २ आणे मु. एस्. टी. आजगांवकर, मनोरंजन प्रेस, सँढर्स्ट रोड मुंबई. प्रती १५००.

वरील पुस्तकाची ही दुसरी आवृत्ति आहे.

स्थानिक स्वराज्य अथवा सचित्र म्युनिसिपालिटी—ले. जोशी एम्. एन्. पृ. १२८, प्र. ए. एस् गोखले, प्र. ता. २६।६।२५, साईझ डबल क्राऊन १६ पेजी. प्रथम आवृत्ति (सचित्र), किं. १२ आणे. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, शनिवार पेठ पुणें. प्रती ५०००.

म्युनिसिपालिटीच्या निवडणुकी व इतर गोष्टी यांचें विनोदपर चित्र काढण्याचा लेखकानें प्रयत्न केला आहे. पुण्याच्या रंगभूमीवर या नाटकाचे प्रयोग बरेच झाले. या नाटकांतील विनोद ग्राम्य आहे असें बऱ्याच टीकाकारांचें व प्रेक्षकांचें मत आहे. म्युनिसिपालिटीच्या कारभाराची काळीकुट्ट बाजू मात्र लेखकानें दाखविली आहे. केसरीकारांनीं या नाटकाचे विरुद्ध अभिप्राय दिला आहे.

शिवपावित्र्यः—ले. कोल्हटकर एस्. के. पृ. १५२ प्र. ए. ए. मोरमकर; प्र. ठि. ठाकुरद्वार मुंबई; प्र. ता. १।५।२५; साईझ क्राऊन १६ पेजी. प्रथम आवृत्ति, किं. १८४ रु. मु. ए. ए. मोरमकर, श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई; प्रती २१९५.

रा. कोल्हटकर यांचें हें नाटक सरस उतरलें आहे. कल्याणचा खजिना छत्रपति शिवाजीमहाराजांनीं लुटला, त्या वेळीं सुभेदाराची सून महाराजांचे

हातीं लागली. ही स्त्री अत्यंत लावण्यवती होती. महाराजांनीं तिला अत्यंत सन्मानानें वागवून तिची तिच्या पतीकडे रवानगी केली व अशा प्रकारें आपला मनोनिग्रह व पावित्र्य दाखविलें, हा या नाटकाचा विषय आहे. या नाटकांतील विनोद व वीररस उत्कृष्ट आहे.

संगीत अहंकार नाटकः—ले. कोरान्ने बी. के. पृ. ८८; प्र. ए. एस्. गोखले; प्र. ठि. शनिवार पेठ पुणें. प्र ता. २६।५।२५; साईझ क्राऊन १६ पेजी आवृत्ति १ ली (सचित्र); किं. १२ आणे. मु. ए. एस् गोखले, विजय प्रेस, शनिवार पेठ पुणें शहर. प्रती २०००.

पौराणिक कथेवर या नाटकाची उभारणी केली आहे. गर्वाचा मोड कसा होतो हें दाखविण्याचा या नाटकाचा मुख्य हेतु आहे.

संगीत वनविहार अर्थात् घोषायात्राः—ले. पटवर्धन जी. व्ही. व महाबळ बी. बी. पृ. ८३; प्र. व्ही. जी. रानडे; प्र. ठि. जमखिंडी, प्र. ता. २१।६।२५; साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथम आवृत्ति (सचित्र); किं. १ रु. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, शनिवार पेठ पुणें शहर. प्रती २०००.

पांडव वनांत राहात असतांना दुर्योधन आपलें सर्व वैभव घेऊन त्यांना खिजविण्याकरितां गोभार पाहण्याचें निमित्त करून आला व शेवटीं गंधर्वांचे हातून पराभव पावला, या महाभारतीय कथेवर हें नाटक रचिलेलें आहे.

पेशव्यांचा पेशवाः—ले. सारोळकर डी. जी. पृ. १२० प्र. एस्. बी. पानसे, प्र. ठि. पुणें शहर. प्र. ता. ३०।७।२५; साईझ क्राऊन; आवृत्ति १ ली; किं. १ रु. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, शनिवार पेठ पुणें शहर; प्रती २०००.

नारायणराव पेशव्यांचे वधानंतर नाना फडणीसांचे हातीं राज्यसूत्रें आलीं. यानंतर नानांनीं राज्यकारभार अत्यंत कुशलतेनें चालविला, पण त्यांचा उत्कर्ष सहन न होऊन त्यांच्याविरुद्ध कांहीं मंडळींनीं कारस्थान रचिलें.

त्यांत नागनाथ नांवाचा रघुनाथरावाचा एक दुष्ट हस्तक होता. त्यानें नानांचे विरुद्ध कारस्थान कसें रचिलें व शेवटीं त्याचा परिणाम काय झाला, याचें चित्र या नाटकांत दाखविलें आहे. नाट्यकलाप्रवर्तक नाटक मंडळी या नाटकाचा प्रयोग करिते.

राष्ट्रीय आरोग्यसप्ताह–मुंबई इलाखाः—ले. वाळिंबे डी. आर. पृ. ५; प्र. मिसेस जानकीबाई भट; प्र. ठि. ७९० सदाशिव पेठ पुणें शहर. प्र. ता. २०।७।२५; साईझ क्राऊन १६ पेजी; प्रथम आवृत्ति, किंमत कांहीं नाहीं. मु. मिसेस जानकीबाई भट, महिलाविजय प्रेस पुणें शहर. प्रती १००.

आरोग्यावर हें एक अंकीं लहानसें नाटक आहे.

संगीत भर्तृहरि नाटकः–ले. आदरकर व्ही. आर. पृ. ८८; प्र. लेखक. प्र. ठि. पुणें. प्र. ता. ३१ ऑगष्ट १९२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली. किं. १ रु. मु. जे. पी. बंगाले, लॉयल प्रिंटिंग प्रेस, पुणें. प्रती १०००.

संगीत संत सखूबाई नाटकः—ले. आपटे एच्. एन. पृ. ११२; प्र. ए. व्ही. पटवर्धन; प्र ठि. पुणें. प्र. ता. १३ ऑगस्ट १९२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति ५ वी (सचित्र); किं. १ रु. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें. प्रती २०००.

प्रेमसंन्यास नाटकः—ले. गडकरी आर. जी. पृ. १६७; प्र. बी. व्ही. परचुरे; प्र. ठि. माधवबाग मुंबई. प्र. ता. १० ऑक्टोबर १९२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी आवृत्ति ३ री (सचित्र); किं. १ रु. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, शनिवार पेठ पुणें. प्रती ३१००.

संगीत एकच प्यालाः—ले. गडकरी आर. जी. पृ. १३५; प्र. बी. व्ही. परचुरे, प्र. ठि. माधवबाग मुंबई. प्र. ता. ३ ऑक्टोबर १९२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी. आवृत्ति ४ थी (सचित्र); किं. १ रु. मु.

ए. एस. गोखले, विजय प्रेस शनिवार पेठ पुणें. प्रती ५१००.

गोपाळकाला:——ले. करंदीकर के. व्ही. पृ. १४; प्र. लेखक. प्र. ठि. सोलापूर; प्र. ता. २६ ऑगष्ट १९२५, साईझ फूल्सकॅप १६ पेजी; प्रथम आवृत्ति; किं. २ आणे.मु.ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस पुणें. प्रती ५००.

काव्य.

अहमदनगर हिंदसेवामंडळ शाखेच्या अनाथविद्यार्थिगृह मेळ्याचीं पद्यावलिं, वर्ष ३ रें. प्रती १५००.

गोसेवक मेळ्याची पद्यावलि–१९२४. प्रती १०००. बेळगांव.

सन्मित्रसमाज मेळा, १९२४ सालचीं पद्यें. प्रती ३०००, पुणें.

श्रीगणेश प्रासादिक मेळ्याचीं पदें, शके १८४६; प्रती १०००, पुणें.

श्रीअंबानंदन मेळ्याचीं पदें, द्वितीय गीतावलि. प्रती ३००.

शिवराज मुंढवा मेळा–पद्यावलि, प्रती १०००. पुणें.

भारतमित्रसमाज मेळा, मेळ्याचीं पदें १९२५, पुणें. प्रती १५००.

नेनेघाट गणेशमेळा, सन १९२५ सालचीं पदें, पुणें, प्रती १५००.

मधुकरमेळा–पद्यावलि, पुणें. प्रती १५००.

जुना मावळी मेळा–पद्यावलि पुणें. प्रती २०००.

विद्यार्थी मेळा पद्यावलि, प्रती २५०, पुणें.

टिळक राष्ट्रीय विद्यालय सातारा–मेळ्याचीं पदें, सातारा.

मुलामुलींचा समर्थ मेळा, प्रती २५००, पुणें.

सन्मित्रसमाज मेळा, १९२५ सालचीं पद्यें. पुणें. प्रती ३०००.

स्वदेशी कन्यामेळा पद्यावलि. पुणें. प्रती १०००.

भारत मराठा मावळी मेळ्याचीं पदें, १९२४, पुणें. प्रती ५०००.

भारत मराठा मावळी मेळ्याचीं पद्यें, १९२५, पुणें, प्रती ११५०.

जुना मावळी मेळा पद्यावलि, पुणें, प्रती २०००.

पैसाफंड मेळ्याची पद्यावलि, वर्ष ९ वें पुणें, प्रती १५००.

राष्ट्रीय मेळ्याची पद्यावलि मुंबई. प्रती २०००.

श्रीनामदेव मेळ्याचीं पद्यें पुणें, प्रती १०००.

आग्र्याचे अटकेवरील पोवाडा—ले. दाभाडे एम्. के. पृ. १२; प्र. लेखक, प्र. ठि. औंध (सातारा), प्र. ता. २९।५।२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली; किं. दाखल नाहीं. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्य-भूषण प्रेस, पुणें शहर. प्रती १०००. शिवछत्रपति आग्र्यास गेले असतां त्यांना औरंगजेबानें कसें कैद केलें व तेथून ते कसे निसटून आले याचें वर्णन या पोवाड्यांत आहे.

अबलाविजय—ले. लक्ष्मणशास्त्री लेले, पृ. २४; प्र. जी. जी. आधि-कारी; प्र. ठि. ५३३ सदाशिव पेठ, पुणें शहर. प्र. ता. ९।१२।२४ साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली किं. ४ आणे. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणें शहर. प्रती १०००. पुरुष काय किंवा स्त्री काय, जन्मतः अडाणी; त्याला किंवा तिला संस्कारानें किंमत चढते. दोघांनीं सुसंस्कृत होऊन परस्परांशीं प्रेमानें व आदरानें वागणें हें योग्य होय. असा या काव्याचा शेवटीं सदुपदेश आहे. सजीव आणि निर्जीव स्त्रीवाचक पदार्थ घेऊन त्यांचा विजय या काव्यांत वर्णिला आहे.

अहल्याजार—ले. परांजपे एस्. एम्. पृ. ८; प्र. लेखक; प्र. ठि. पुणें शहर. प्र. ता. २२।१२।२४; साईझ क्राऊन; आवृत्ति १ ली, किं. २ आणे. मु. एस्. एम्. परांजपे, गोवर्धन प्रेस, पुणें शहर. प्रती ५००. इंद्रानें गुप्त-रूपानें अहिल्येचें पातिव्रत्यभंग केलें ही कथा यांत आहे.

अध्यात्मअयोध्या अथवा **रामायणसप्तकांडसार**—ले. पद्मावतीबाई

पृ. २८८, प्र. मित्राबाई व्ही. शिरूर; प्र. ठि. नारायणपूर—हुबळी; प्र. ता. २५।२।२५; साईझ क्राऊन १६ पेजी; प्रथमावृत्ति (सचित्र); किं. १०८ रु. मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती ५००. यांत रामायणांतील एकेक प्रसंग वर्णन करून त्याची अध्यात्मदृष्टीनें रूपकात्मक चिकित्सा केली आहे. हें काव्य अभंगवृत्तांत असून सुलभ व रसाळ आहे.

आर्यभूमीचा अमीर—पृ. १६,प्र. व्ही. टी. देव, प्र.ठि. मुरारजी गोकुळदास—चाळ नं. ३, मुंबई नं. ४; प्र. ता. १०।७।२५; साईझ फूल्सकॅप लहान. आवृत्ति १ ली, किं. १ आणा. मु. बी. आर. कद्रेकर, रवींद्र प्रिंटिंग वर्क्स, आंबेवाडी, ई ब्लॉक, गिरगांव मुंबई. प्रती १०००. शिवछत्रपतींच्या स्तुतिपर हें लहान काव्य आहे. यांत छत्रपतींच्या स्वातंत्र्यप्रियतेचें वर्णन केलें आहे.

अभंगमाला:—ले. तिवारी दुर्गाप्रसाद आसाराम. पृ. २८; प्र. जी.एस्. शिंपी; प्र. ठि. काव्यानंदमंडळ चाळीसगांव; प्र. ता. ३।९।१९२५; साइझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली, किं. ४ आणे; मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. प्रती १०००. यांत तिवारी कवींनीं तुकारामाच्या धर्तीवर केलेल्या भक्तिपर अभंगांचा संग्रह केला आहे. यांतील कांहीं अभंग बोध व भक्तिरस यांनीं ओथंबलेले आहेत.

उपरति झाली—ले. जोशी बी. बी. पृ १२; प्र. ए. सी. भट; प्र. ठि. पुणें शहर. प्र. ता. १५।२।२५; साईझ डेमी १२ पेजी; आवृत्ति १ ली; किं. १ आणा. मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, पुणें शहर. प्रती ५००.

कार्तिकमाहात्म्य:—ले. साने यमुनाबाई; पृ. ४६, प्र. लेखक; प्र. ठि. पुणें शहर; प्र. साल १९२५; साईझ क्राऊन ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ६ आणे; मु. डी. जी. खांडेकर, लॉ प्रिंटिंग प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर. श्रीकृष्णस्तुतिपर स्त्रियांनीं म्हणण्याजोगीं अशीं गाणीं यांत दिलीं आहेत.

कार्तिक महिन्याचें माहात्म्य यांत वर्णन केलें आहे.

काव्यकुसुमोद्यान (प्रथमांजलि)—ले. वाड व्ही. एन्. पृ. ४२; प्र. लेखक, प्र. ठि. नाशिक, प्र. ता. २७।११।२४; साईझ फूलस्कॅप १६ पेजी; आवृत्ति १ ली, किं. ६ आणे; मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. प्रती २०००. यांत प्रभुनमन, सुखाचा शोध, तुलसीदास वगैरे विषयांवर लहान लहान कविता आहेत. कविता शुद्ध, सुबोध व सोपी आहे.

कांहीं तरी—ले. गोखले एच्. एस्. पृ. १९०; प्र. ए. एस्. गोखले प्र. ठि. पुणें शहर; प्र. ता. १।२।२५, साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति २ ली; किं. १ रु. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ पुणें शहर. प्रती ५००. या पुस्तकांत रा. हरि सखाराम गोखले यांची स्फुट कविता ग्रथित केली आहे. या पुस्तकास प्रो. लागू यांची बिद्वत्ताप्रचुर अशी ५० पानांची प्रस्तावना जोडली आहे.

गाईचा आक्रोश—ले. बिडकर आर. एस्. पृ. २०; प्र. लेखक; प्र. ठि. ५२१ रविवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. २७।६।२५; साईझ फूलस्कॅप ८ पेजी, आवृत्ति २ री. किंमत सव्वा आणा. मु. व्ही. एन्. दाते, हिंदसेवक प्रेस, पुणें शहर. प्रती १००००. या काव्यांत गोरक्षण करण्यास कळकळीची विनंती केली आहे.

गीत द्विदल—ले. कमलाबाई देशपांडे व वाय. एन्. केळकर, पृ. ७२; प्र. वाय्. एन्. केळकर, प्र. ठि. ५५४ सदाशिव पेठ, पुणें शहर; प्र. ता. १।१।२५; साईझ फूलस्कॅप १६ पेजी; आवृत्ति १ ली, किंमत ८ आणे. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती १०००. रा. नरसिंह चिंतामण केळकर यांचे चिरंजीव रा. यशवंतराव व यशवंतरावांच्या भगिनी श्रीमती कमलाबाई या दोघांची स्फुट कविता या पुस्तकांत प्रसिद्ध केली आहे.

गोरोबा यांचें लग्न-पृ. १६; प्र. व्ही. व्ही. गोडबोले; प्र. ठि. उद्धवघांट-पंढरपूर, प्र. ता. ऑगस्ट १९२५; साईझ फूलसकॅप ८ पेजी; आवृत्ति १ ली; किं. २ आणे. मु. जी. एस्. बिडकर, पंढरीसमाचार प्रेस, बिडकर गल्ली, पंढरपूर. प्रती २०००. भक्तश्रेष्ठ गोरोबा कुंभार याचें चरित्र यांत वर्णिलें आहे.

गोपाळ गायनसमाज राष्ट्रगीतमाला, पुष्प १ लें-पृ. ३; प्र. जी. जी. देसाई, मॅनेजर गोपाळ गायनसमाज; प्र. ठि. ८१७ सदाशिव पेठ, पुणें शहर. प्र. ता. ४।५।१९२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली; किं. अर्धा आणा. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. प्रती १०००.

गोमातेचे हंबरडे-ले. आर. एस्. अहीर; पृ. १६; प्र. एस्. आर. बिडकर, प्र. ठि. ५२१ रविवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. ३१।१२।२४, साईझ फूलसकॅप ८ पेजी, आवृत्ति ८ वी. किं. सव्वा आणा. मु. व्ही. एन्. दाते हिंदसेवक प्रेस, ५८९ शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती ५०००. यांत गोरक्षण करण्याची सर्व हिंदी बांधवांना विनंति केली आहे.

गोविंदगीत पुस्तक ३ रें-पृ. १६; प्र. व्ही. के. दातार; प्र. ठि. नाशिक; प्र. ता. २०।१२।२४; साईझ डेमी १६ पेजी; आवृत्ति १ ली, किं. २ आणे. मु. डी. एम्. चंद्रात्रे, लोकसत्ता प्रेस, नाशिक. प्रती १०००.

चहा काव्य-ले. आपटे जी. एस्. पृ. २२; प्र. लेखक; प्र. ठि. वज्जन; प्र. ता. १।६।२५; साईझ फूलसकॅप; आवृत्ति २ री, किं. ४ आणे. मु. जी. बी. जोशी, आनंद प्रेस, सदाशिव पेठ पुणें शहर. प्रती ५००. यांत चहा पिण्यापासून होणारे अपाय दाखविले आहेत. हें काव्य विनोदपर आहे.

चांद्रसेनीय कायस्थ प्रभुसमाजाला विजयादशमीचा संदेश-ले. ठाकरे के. एस् पृ. ४, प्र. लेखक, प्र. ठि. सदाशिव पेठ, पुणें शहर. प्र. ता. २७।९।२५, साईझ फूल्सकॅप फोलिओ, आवृत्ति ३ री. किंमत कांहीं नाहीं.

मु. के. एस्. ठाकरे, प्रबोधन प्रेस, ३४५ सदाशिव पेठ पुणें शहर. प्रती ५००. यांत चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंच्या उज्वल गत इतिहासाची त्यांना जाणीव करून दिली आहे व भविष्यकाळही या इतिहास प्रमाणें उज्वल राखावा असा उपदेश केला आहे.

चौदावें रत्न अर्थात् त्राटिकापद्यावलि—ले. कोल्हटकर ए. बी. पृ. १६; प्र. सी. जी. कोल्हटकर, प्रेसिडेंट श्रीसरस्वतीमंडळ; प्र. ठि. शनिवार पेठ, पुणें शहर; प्र. ता. १८।५।२५, साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. दाखल नाहीं. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती २०००.

जनताजनार्दन नाटकाची पद्यावलि—ले. सारोळकर डी. जी. पृ. १६, प्र. ए. पी. बापट अँड ब्रदर्स; प्र. ठि. बुधवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. २३।५।२५; साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली. किंमत ३ आणे. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती १५००.

झेंडूचीं फुलें—सं. डी. जी. केळकर, पृ. ३४; प्र. ठि. सरस्वतीप्रकाशक मंडळ, पुणें शहर; प्र. ता. ३१।८।१९२५; साईझ क्राऊन ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आ. प्रती ५००. मु. एस्. आर. राजगुरु, श्रीसमर्थ छापखाना पुणें शहर. यांत कांहीं आधुनिक कवींच्या स्फुट व विनोदपर कवितांचा संग्रह केला आहे.

झांशीची संग्रामदेवता राणी लक्ष्मी—ले. तिवारी. डी.ए. पृ. ६८, प्र. लेखक, प्र. ठिं. जळगांव, पूर्व खानदेश; प्र. ता. २२।३।२५; साईझ फूलसकॅप ८ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र), किं. ८ आणे. मु. डी. जी. सडेकर, धनंजय प्रेस खानापूर. प्रती १०००. झांशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या पराक्रमाचें वर्णन या काव्यांत केलें आहे. हें काव्य वीररसप्रधान आहे. प्रो. बेहेरे यांनीं या काव्यास प्रस्तावना लिहिली आहे.

तुकारामाची गाथाः—पृ. १२१९, प्र. के. आर. गोंधळेकर, प्र. ठि. बुधवार चौक, पुणें शहर; प्र. ता. २०।३।२५; साईझ डेमी १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. २ रु. मु. के. आर. गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, ५०७ शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती ५०००.

दक्षप्रजापतियज्ञ व स्फुट मुक्तामणी—ले. करंदीकर बी. पी. पृ. ३२, प्र. लेखक, प्र. ठि. दापोली, जिल्हा रत्नागिरी; प्र. ता.१५।७।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ५ आणे. मु. सी. एस्. देवळे, मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड, गिरगांव मुंबई; प्रती २५०. दक्षप्रजापतीच्या यज्ञाची कथा व इतर लहान स्फुट काव्यें यांत दिलीं आहेत.

देहावर निराकारी पदें व अभंग—पृ. ३२, प्र. के. व्ही. पुरंदरे; प्र. ठि. माधवबाग मुंबई. प्र. ता. १५।१०।२५; साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति ६ वी, किं. ३ आणे. मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, ३ ठाकूरद्वार रोड, मुंबई नं. ४; प्रती ४०००.

धवलगिरि—–पृ. ३२, प्र. जी. जी. पोतदार, प्र. ठि. धुळें; प्र. ता. २२।११।२४, साईझ फूल्सकॅप ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ३ आणे. मु. व्ही. जी. जावडेकर, आत्माराम प्रिंटिंग प्रेस, धुळें. प्रती १०००. आधुनिक सहा कवि व एक कवयित्री यांच्या स्फुट कवितांचा हा छोटासा संग्रह आहे.

नवरदेवांना शेलापागोटें—ले. आर. व्ही. दाते, पृ. ८, प्र. लेखक, प्र. ठि. ५८५ शनिवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. जानेवारी १९२५; साईझ फूल्सकॅप, प्रथमावृत्ति, मु. के. एस. ठाकरे, प्रबोधन प्रेस, सदाशिव पेठ पुणें शहर. प्रती १५००. हुंड्याच्या पद्धतीचे दुष्परिणाम दाखविण्याकरितां हें लहानसें काव्य लिहिलें आहे.

नवपुष्पमाला—ले. जोशी बी. बी. पृ. ४८; प्र. ए. सी. भट, प्र. ठि.

पुणें शहर, प्र. ता. २३।११।२४; साईझ फुल्सकॅप १६ पेजी, आवृत्ति २ री, किं. ४ आणे. मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, पुणें शहर. प्रती ७००. रा. बाळकृष्ण भाऊ जोशीकृत हा भक्तिपर पद्यांचा संग्रह आहे.

पदें व अभंग, भाग १ ला व स्तुतिस्तोत्रें व इतर विषय, भाग २ रा—ले. मिस्ट्रेस राधाबाई लाजमी, पृ. १३२, प्र. लेखक. प्र. ठि. सारस्वत कॉलनी, सांताक्रूझ मुंबई; प्र. ता. १।९।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथम आवृत्ति, किं. १२ आणे, मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, शनवार पेठ पुणें शहर; प्रती १०००.

पद्यावलि—ले. बडोदकर नानाबुवा, पृ. १८, प्र. पी. पी. अत्रे, प्र. ठि. नारायण पेठ, पुणें शहर. प्र. ता. १०।६।२५, साईझ फूल्सकॅप १६ पेजी, आवृत्ति २ री, किं. १ आणा, मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती १०००. कीर्तनकारांचे उपयोगाकरितां निरनिराळ्या विषयांवरील पद्यें यांत दिलीं आहेत.

पर्वती—ले. व्ही. के. नेरूरकर. प्र. लेखक, प्र. ठि. मालवण, प्र. ता. २०।१२।२४ साईझ क्राऊन, प्रथमावृत्ति किं. ३ आणे. मु. के. एस्. देसाई श्रीभागीरथी प्रेस, मालवण. प्रती ५००. कवि पर्वतीस गेला असतां त्याचें मनांत उद्भवलेल्या कल्पना या छोट्या काव्यांत ग्रथित केल्या आहेत.

पावनखिंडीचा पोवाडा—ले. के. एस्. ठाकरे. पृ. १२; प्र. लेखक, प्र. ठि. प्रबोधन ऑफिस, ३४५ सदाशिव पेठ, पुणें शहर. प्र. ता. १।८।२५, साईझ फूल्सकॅप फोलिओ, आवृत्ति २ री, किं. १ आणा. मु. के. एस्. ठाकरे, प्रबोधन प्रेस, ३४५ सदाशिव पेठ, पुणें शहर. प्रती २०००. बाजी प्रभू देशपांडे यांनीं जिवावर उदार होऊन श्रीशिवछत्रपतींच्या बचावाकरितां पावनखिंडीचें रक्षण केलें तो प्रसंग यांत वर्णन केला आहे.

पुष्पराज—पृ. ३२. प्र. जी. व्ही. करमरकर; प्र. ठि. सांगली; प्र. ता.

१०।४।१९२५, साईझ फूलसकॅप, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे. मु. जी. बी. जोशी, आनंद प्रेस, सदाशिव पेठ, पुणें. प्रती ५००. विनायकात्मज आणि काव्यकिंकर हीं नांवें धारण केलेल्या कवींच्या स्फुट काव्यांचा संग्रह यांत केला आहे.

पुष्पवाटिका—पृ. ६२; प्र. एस्. के. उपाध्ये. प्र. ठि. दादर. प्र. ता. १०।१।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथमावृत्ति, किं. ८ आणे. मु. आर. एन्. मंडलीक, लोकमान्य प्रेस, मुंबई. प्रती १०००. आधुनिक कांहीं मराठी कवींच्या कवितांचा हा छोटा संग्रह आहे.

पुष्पहार—ले. साठवर एस्. एन्. पृ. ८०; प्र. लेखक; प्र. ठि. मुगभाट क्रॉस लेन, गिरगांव मुंबई नं.४. प्र. ता.३१।७।२५; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ८ आणे. मु. सी. एस् देवळे, मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड, गिरगांव मुंबई. प्रती १०००. यांत भक्तिपर व स्फुट पद्यें दिलीं आहेत.

पेशवाई नाटकाची पद्यावलि—पृ.८; प्र. के. एच. दीक्षित, प्र. ठि. शहापूर (बेळगांव); प्र. ता. १।६।२५; साईझ डेमी १२ पेजी. आवृत्ति ३ री किं. २ आणे. मु. के. आर. गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती २०००.

पैसाफंड मेळ्याचीं पदें आणि हा खरा धर्मवीर—पृ. ४०, प्र. व्ही. आर. रानडे, शुक्रवार पेठ पुणें शहर. प्र. ता. २०।८।२५, साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ०४; प्रती ४००, मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर.

पंचव्यसनानिषेध काव्य—ले. मुळे सी. एल्. पृ. २२, प्र. लेखक; प्र. ठि. शेगांव (वऱ्हाड); प्र. ता. ५।९।२५; साईझ फुलसकॅप, आवृत्ति १ ली, किं. २ आणे. मु. जी. बी. जोशी, आनंद प्रेस, सदाशिव पेठ, पुणें शहर; प्रती २०००. यांत चहा, तंबाखू, अफू, गांजा व भांग या पांच

व्यसनांपासून दूर राहण्याचा उपदेश केला आहे.

बालनवनीत—पृ. ८८, प्र. एल्. आर. पुरवर, प्र. ठि. टिळक राष्ट्रीय विद्यालय. खामगांव. प्र. ता. १०।१।२५, साईझ क्राऊन, आवृत्ति २ री, किं. ८ आणे. मु. जी. बी. जोशी, आनंद प्रेस, ३३० सदाशिव पेठ पुणें. प्रती १०००. लहान मुलांकरितां निरनिराळ्या कवींच्या लहान कवितांचा संग्रह यांत केला आहे.

बिल्वदळ—ले. बुधकर बी. एस्. पृ. ५५, प्र. लेखक, प्र. ठि. कोळें, जि. सातारा; प्र. ता. १०।७।२५; साईझ फूलस्कॅप १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे. मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस पुणें शहर. प्रती १०००. हा भक्तिपर आणि इतर विविध विषयांवरील कवितांचा एक छोटा संग्रह आहे.

भक्तिसुधारस—पृ. ४८, रचणार व प्रकाशक एच. आर. भागवत, सदाशिव पेठ, पुणें शहर; प्र. साल शके १८४७; ता. १८।८।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे, मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणें शहर. प्रती १०००. भक्तिपर पद्यें यांत दिलीं आहेत.

भजनावलि—पृ. ३२, प्र. एल्. जे. काळे. प्र. ठि. सोमणांची चाळ, कोळेवाडी, गिरगांव मुंबई. प्र. ता. २६।१०।२५, साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति ५ वी, मु. सी. एस. देवळे, मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड, गिरगांव मुंबई; प्रती ५००.

भजनी स्वच्छंद—पृ. ५८, प्र. आर. जी. जोशी हेबळकर, प्र. ठि. पोष्ट कलगी (निझाम स्टेट); प्र. ता. २६।२।२५, शके १८४६; साईझ डेमी १६ पेजी; मु. डी. जी. सडेकर, धनंजय प्रेस, खानापूर (बेळगांव); प्रती ५००; निरनिराळ्या कवींचीं प्रार्थनेचीं पद्यें यांत दिलीं आहेत.

मारुतीस्तोत्र—पृ. ८, प्र. के. बी. साळी, प्र. ठि. अमळनेर; प्र. ता.

१९।८।२५, साईझ फूलस्कॅप १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ६ पै. मु. व्ही. के. भावे, बालवसंत प्रेस, अंमळनेर, पूर्व खानदेश; प्रती १०००.

महिषासुरमथन—ले. वसंतविहार, पृ. १६, प्र. एस्. डी. जोशी; प्र. ठि. जेमशेट रोड, दादर मुंबई; प्र. ता. २८।२।२५; साईझ फूलस्कॅप फोलिओ. आवृत्ति १ ली, किं. २ आणे; मु. बी. आर. कद्रेकर, रवींद्र प्रिंटिंग वर्क्स, आंबेवाडी मुंबई ४; प्रती १०००. यांत अफजुलखानाच्या वधाचें वर्णन दिलें आहे.

राजा शिवाजी, भाग १ ते ६—ले. कुंटे एम्. एम्. पृ. १४४, प्र. जी. जी. अधिकारी. प्र. ठि. ५३३ सदाशिव पेठ, पुणें शहर. प्र. ता. २९।११।२४; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति २ री. किं. १८४ रु. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणें शहर; प्रती १०००. कै. माधवराव कुंटे यांच्या शिवाजी काव्याची ही नवी आवृत्ति आहे. पुष्कळ दिवस या काव्याची आवृत्ति न निघाल्यामुळें तें दुर्लभ झालें होतें.

राधामाधव—ले. तिवारी, डी. ए. पृ. १२०; प्र. लेखक; प्र. ठि. जळगांव (पूर्व खानदेश); प्र. ता. १७।३।२५; साईझ फूलस्कॅप १६ पेजी; आवृत्ति १ ली (सचित्र); किं. १० आणे, मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. प्रती १०००. राधेचें कृष्णावरील प्रेम किती निःसीम व पवित्र होतें हें या काव्यांत दाखविलें आहे. कवीनें निरनिराळ्या वृत्तांची योजना केली आहे. यांतील वर्णनें बहारीचीं आहेत. रा. तिवारी यांचें हें काव्य सरस उतरलें आहे.

रामदासी सांप्रदायानुरूप बेलधडीची भजनपद्धति—पृ. ६४; प्र. एच. एस. कौजलगी, प्र. ठि. विजापूर. प्र. ता. ९।१२।२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति २ री; किं. ८ आणे; मु. एच. एस्. कौजलगी, ग्रामाधिकारी प्रेस, विजापूर. प्रती १०००.

रेंदाळकरांची कविता, प्रथमखंड--पृ. ४१८, प्र. जी. जी. अधिकारी. प्र. ठि. सदाशिव पेठ, पुणें शहर. प्र. ता. १२।११।२४; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली, किं. २८४ रु. मु. ए. व्ही. पटवर्धन. आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. प्रती १०००. यांत कै. रेंदाळकरांची कविता संग्रहीत केली आहे. रा. कुंटे यांनीं संपादकाचें काम केलें आहे. रा. माडखोलकर यांनीं छोटीशी प्रस्तावना लिहिली आहे.

लोकमान्य टिळक यांचा पोवाडा--ले. खानविलकर आर. व्ही. पृ. १३०; प्र. डी. एल्. लेले. प्र. ठि. वाई. प्र. ता. १।२।२५, साईझ क्राऊन ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १० आणे. मु. डी. एल्. लेले, मोदवृत्त प्रेस, ३४३ मधली आळी, वाई. प्रती ३०००. लोकमान्यांच्या चरित्र वर हा पोवाडा रचलेला आहे. याला रा. नरसिंह चिंतामण केळकर यांनीं प्रस्तावना लिहिली आहे.

'वर पाहिजे' नाटकाची पद्यावलि—पृ. १२, ले. पांडे बी. एन्. प्र. टेंभे आणि मंडळी. प्र. ठि. कांदेवाडी नाका मुंबई. प्र. साल जानेवारी १९२५, साईझ डेमी १६ पेजी, प्रथमावृत्ति किं. २ आणे; मु. आर. एस्. मंडलीक, लोकमान्य प्रेस, रास्ती बिल्डिंग, गिरगांव मुंबई. प्रती २०००.

वत्सहरण—ले. पंडित दामोदर. पृ. ५१, प्र. व्ही. एल्. भावे; प्र. ठि. ठाणें, प्र. ता. १५।६।२५; साईझ डेमी ८ पेजी; आवृत्ति १ ली; किं. १ रुपया; मु. डी. के. फडके, अरुणोदय प्रेस, ठाणें. प्रती ५००. महानुभावी कवीनें केलेलें हें काव्य आहे. यांत अघासुरानें गोकुळांतील वासरें गिळलीं असतां श्रीकृष्णानें अघासुराचा नाश करून त्यांना कसें सोडविलें याचें वर्णन आहे. हें काव्य रा. विनायकराव भावे यांनीं संपादिलें आहे.

विष्णुगीत—ले. भाजेकर व्ही. एम्. पृ. ३४, प्र. एम्. ए. गद्रे; प्र. ठि. किंग्ज् सर्कल, माटुंगा. प्र. ता. ३०।९।२५, साईझ क्राऊन ३२ पेजी. आवृत्ति १ ली, किं. २ आणे. मु. एस्. टी. आजगांवकर, मनोरंजन प्रेस, सँढर्स्ट रोड,

मुंबई. प्रती ५०००. लेखकानें निरनिराळ्या विषयांवर केलेल्या स्फुट कविता यांत दिल्या आहेत.

शेतकऱ्यांस विनंति–पृ. १६, प्र. आर. एस्. बिडकर, प्र. ठि. रविवार पेठ पुणें शहर; प्र. ता. ३१।१२।२४, साईझ फूलसकॅप ८ पेजी, आ. २ री, किं. १ आणा, मु. व्ही. एन् दाते, हिंदसेवक प्रेस, ५८२ शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती ५०००. शेतकऱ्यांनीं आपल्या गाई खाटकांस विकूं नयेत ह्मणून त्यांस या लहान काव्यांत कळकळीची विनंति केली आहे.

शेतकऱ्यांचें मधुर गायन–ले. कै. भालेकर के. पी. पृ. ३२, प्र. एम्. जी. पाटील. प्र. ठि. तारावाडी, जि. अहमदनगर, प्र. ता. २३।७।२५, साईझ फूलसकॅप, आवृत्ति ३ री, किं. ४ आणे. मु. एम्. जी. पाटील, दीनमित्र प्रेस, तारावाडी, जि. अहमदनगर, शेतकऱ्यांच्या जागृतीसाठीं केलेलीं प्रोत्साहनपर पद्यें यांत आहेत.

श्रीगुरुस्तव–ले. सीताकुमार, पृ. ३० प्र. आर. बी. देशपांडे, प्र. ठि. चाळीसगांव. प्र. ता. १०।१२।२४; साईझ फूलसकॅप ८ पेजी; आवृत्ति १ ली, किं. ०२०६ आणे. मु. एन्. व्ही. जोशी; आर्यावर्त प्रेस, आग्रा रोड, घरनंबर ३६ धुळें, पश्चिम खानदेश. प्रती ५००. यांत श्रीदत्तात्रेयाच्या स्तुतिपर पद्यें आहेत.

श्रीगुरुगीतानुवाद–ले. मानकल एच्. एस्. पृ. ४८; प्र. लेखक; प्र. ठि. चिटगुप्पा (निझाम स्टेट); प्र. ता. १८।२।२५, साईझ रॉयल ३२ पेजी, आवृत्ति १ ली, किं. दाखल नाहीं. मु. डी. आर. मित्र, मनोरंजन प्रेस, सँढर्स्ट रोड मुंबई. प्रती २००. श्रीगुरुगीता या ग्रंथाचा सारांश कवितारूपानें यांत दिला आहे.

श्रीपद्मनाभ भक्तमंडळ पुणें, पुष्प ७ वें–पृ. १६, प्र. डी. एस्. कोटफोडे; प्र. ठि. ६२९ कसबा पेठ, पुणें शहर; प्र. ता. २७।१।२५; साईझ

क्राऊन ३२ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १ आणा. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, ४९५ शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती ३००. पद्मनाभाचार्य स्वामी यांच्या भक्तमंडळानें रचलेलीं गाणीं यांत आहेत.

श्रीपंचरत्न हरिपाठ—पृ. १२५ प्र. के. व्ही. पंत पराडकर, प्र. ठि. श्रीविठ्ठल एजन्सी, पंढरपूर; प्र. ता. २।७।२५, साईझ सुपर रॉयल ३२ पेजी. आवृत्ति १ ली, किं. ४ आणे. मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती ४०००. यांत जुन्या पांच कवींचीं प्रार्थनेचीं पद्यें दिलीं आहेत.

श्रीदत्तस्तवनामृत—ले. डी. जी. राजाध्यक्ष, पृ. १६, प्र. लेखक; प्र. ठि. उभादांडा, वेंगुर्लें, प्र. ता. १५।७।२५, साईज फुल्सकॅप ८ पेजी. आवृत्ति १ ली, किं. १ आणा. मु. ए. व्ही. मराठे, किरात छापखाना, वेंगुर्लें; प्रती ५००. श्रीदत्ताच्या स्तवनार्थ केलेल्या पद्यांचा हा संग्रह आहे.

श्रीवटसावित्रीचें आख्यान—ले. उमाबाई कोल्हटकर, पृ.२८; प्र.एस्. टी. देसाई, प्र. ठि. काका पाटील यांचा वाडा, अंधेरी; प्र. ता. २८।५।२५, साईज क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे, मुद्रक जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, ४९५ शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती २०००. श्रीसत्यवानसावित्रीची कथा यांत दिली आहे.

श्रीश्लोक मनाचे—पृ. २३०, प्र. एस्. एस्. देव, प्र. ठि. धुळें, प्र. ता. १७।३।२५, साईझ सुपर रॉयल ३२ पेजी, आवृत्ति ५ वी, किं. ८ आणे; मु. व्ही. जी जावडेकर, आत्माराम प्रेस, धुळें. प्रती ४०००. श्रीसमर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक यांत दिले आहेत.

श्रीहरिसंभव—ले. डी. जी. काळे, पृ. १०, प्र. लेखक, प्र. ठि. असोदें (पूर्व खानदेश); प्र. ता. १३।१२।२४, साईझ सुपर रॉयल ३२ पेजी, प्रथमावृत्ति, किं. दीड आणा, मु. ए. व्ही. पटवर्धन; आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. प्रती २५०. यांत श्रीकृष्णजन्मकथा वर्णिली आहे.

श्रीज्ञानेश्वरकृत हरिपाठ—पृ. ३२, प्र. अनंत केशव व रघुनाथ नारायण; प्र. ठि. १८० बुधवार पेठ, पुणें शहर; प्र. ता. ५।११।१९२४; साईझ रॉयल ३२ पेजी, आवृत्ति १ ली, किं. २ आणे, मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, पुणें शहर. प्रती ५०००. ज्ञानेश्वरकृत हरिपाठाचे अभंग यांत दिले आहेत.

सप्तरंगी पुष्पगुंफा—पृ. ३२, प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. माधवबाग मुंबई, प्र. ता. २०।१०।२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १० वी, किं. ४ आणे, मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, ३ ठाकूरद्वार मुंबई. प्रती ४०००. यांत निरनिराळ्या नाटकांतील पद्यें दिलीं आहेत.

सद्गुरुमानसपूजा—ले. सिन्नरकर व्ही. आर., पृ. ८, प्र. लेखक, प्र. ठि. संगमनेर (नगर), प्र. ता. ५।६।२५, साईझ फुल्सकॅप १६ पेजी, आवृत्ति १ ली; किं. २ आणे, मु. ए.सी. भट, यशवंत प्रेस, शनिवार पेठ पुणें शहर; प्रती ५००.

समर्थरत्नसंग्रह—पृ. ५१८, प्र. व संपादक एस्. के. आळतेकर, प्र. ठि. कऱ्हाड, प्र. ता. १०।४।२५, साईझ फूलसकॅप १६ पेजी, आवृत्ति १ ली; किं. १८४ रु. मु. जी. के. गोखले व व्ही. व्ही. अतीतकर, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, पुणें शहर व श्रीसमर्थप्रसाद प्रेस, तळेगांवदाभाडे. प्रती २०००. समर्थ रामदासस्वामी यांच्या ग्रंथातून घेतलेल्या उपदेशपर उत्तम वेंच्यांचा हा संग्रह आहे.

समर्थसंजीवनी ऊर्फ रामदासी वेंचे—संपादक एल्. आर. पांगारकर, पृष्ठें ४०८, प्र. एल्. आर. पांगारकर, प्र. ठि. पुणें शहर. प्र. ता. ३१।१२।२४ साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति दाखल नाहीं. किं. २ रु. प्रती ३००. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ पुणें शहर. श्रीसमर्थांच्या ग्रंथांतून यांत वेंचे घेतले आहेत व स्पष्टीकरणार्थ रा. पांगारकर.

यांनीं टीपा दिल्या आहेत.

सर्वांगयोग—ले. चैतन्य श्रीमायानंद, पृ. १६, प्र. एन्. बी. ठाकूर, प्र. ठि. शुक्रवार पेठ, पुणें शहर; प्र. ता. १७।३।२५. साईझ डेमी ३२ पेजी, आवृत्ति २ री, किं. दाखल नाहीं. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, ४९५।९६ शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती ३०००.

सामराज कविविरचित रुक्मिणीहरण—पृ. १९२, प्र. जी. व्ही. तुळपुळे, प्र. ठि. ८४४ सदाशिव पेठ पुणें शहर. प्र. ता. २४।११।२४, साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १८४, रु. मु. ए. सू. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती १०००. भावे यांनीं पूर्वी प्रसिद्ध केलेलें हें काव्य प्रो. तुळपुळे यांनीं प्रसिद्ध केलें आहे. कवीचा काल, कवीचें चरित्र, काव्यांतील गुणदोष यांचें विवेचन प्रारंभीं केलें आहे. कठीण शब्दांवर टीपा दिल्या आहेत.

स्वातिधारा—पृ. १०६ सं. व प्र. एन. व्ही. आठवले, प्र. ठि. व ६३० सदाशिव पेठ पुणें, प्र. ता. २८।३।२५, साईझ फूल्‌स्कॅप १६ पेजी, प्रथमावृत्ति, किं. दाखल नाहीं; मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ पुणें शहर. प्रती १०००. ज्ञानेश्वरींतील १०८ सुंदर वेंचे यांत घेतले आहेत.

स्त्रीगीत-रत्नमंजूषा—ले. मिसेस् अन्नपूर्णाबाई देसाई, पृ. ६०, प्र. लेखिका, प्र. ठि. शील, तालुके राजापूर; प्र. ता. २२।११।२४, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १ली, किं. ८ आणे, मु. जी. एन्. दातार, दातार प्रेस, गुजरआळी, राजापूर; प्रती १०००. स्त्रियांना म्हणण्यास योग्य अशा लहान लहान गाण्यांचा यांत संग्रह केला आहे.

स्त्रीगीतमाला—ले. सरस्वतीबाई साठे व यमुनाबाई नामजोशी, पृ. ४२, प्र. जी. एच. साठे, प्र. ठि. झांशी, प्र. ता. ३।३।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १० आणे, मु. एम. एन. जोशी, चित्र.

शाळा स्टीम प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर; प्रती १०००; स्त्रियांनां गाण्यास योग्य अशा गाण्यांचा हा संग्रह आहे.

सुबोध ज्ञानदीप ओव्या—ले. नाईक जी. ए. पृ. ३७, प्र. लेखक, प्र. ठि. केकटनी भोरेन, तालुका जामनेर, जिल्हा पूर्व खानदेश, प्र. ता. १८।६।२५, साईझ फूल्सकॅप ४ पेजी, आवृत्ति १ ली, कि. ८ आणे, मु. डी. व्ही. जोशी, खानदेश प्रेस, जळगांव, पूर्व खानदेश; प्रती २००; यांत परमार्थाची लहान लहान कविता आहे.

सुंदरकांड रामायण—ले. पद्मावतीबाई, पृ. ५६, प्र. मित्राबाई व्यंकटराव, शिरूर प्र. ठि. (हुबळी), प्र. ता. ३०।११।२४, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथमावृत्ति, किं. ३ आणे, मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, पुणें शहर. प्रती ५००; रामायणांतील सुंदरकांडांतील एकेक प्रसंग घेऊन अध्यात्मदृष्टीनें त्यांतून काय शिकतां येतें हें कवयित्रीनें या काव्यांत दाखविलें आहे; हें काव्य अभंगवृत्तांत आहे.

संतराममारुती अष्टक—ले. ओक के. बी. पृ. ८, प्र. लेखक, प्र. ठि. कल्याण, प्र. ता. १।९।२५, साईझ रायल १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १ आणा, मु. के. बी. ओक, आर्यवैद्यकबोध प्रेस, कल्याण; प्रती ५०००; यांत कल्याण येथील साधू राममारुती यांच्या स्तुतिपर ८ कविता आहेत.

संगीत शलोमो नाटक पद्यावलि—पृ. १३, ले. मालेकर आर. एच् प्र. लेखक, प्र. ठि. उमरखाडी, मुंबई; प्र. ता. ७।११।२५, साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं ४ आणे, मु. वाय. के. पडवाल, तत्त्वविवेचक प्रेस, भायखळा, मुंबई; प्रती ५००.

संजयप्रबोधन—ले. वसंतविहार पृ. १६, प्र. के. एस्. ठाकरे, प्र. ठि. ३४५, सदाशिव पेठ पुणें शहर, प्र. ता. २३।१।२५, साईझ क्राऊन, प्रथमा-

वृत्ति, किं. १ आणा, मु. के. एस्. ठाकरे, प्रबोधन प्रेस, ३४५ सदाशिव पेठ पुणें शहर; प्रती १०००. विदुलेनें आपला मुलगा संजय याला शूरपणानें रणांत जाऊन शत्रूशीं लढण्याचा स्फूर्तिदायक उपदेश महाभारतांत केला आहे, त्याचें हें रूपांतर आहे.

संगीत बालक्रीडा पद्यावलि—ले. गोपीकर जी. आर., पृ. ८, प्र. लेखक, प्र. ठि. आनंद संगीत नाटक मंडळी, सातारा; प्र. ता. २६।६।२५' साईझ डेमी, आवृत्ति १ ली, किं. २ आणे, मु. डी. जी. सडेकर, घनंजय प्रेस, खानापूर, जि. बेळगांव, प्रती ३०००.

हनुमान अष्टक—ले. ओक के. बी., पृ. १२, प्र. लेखक, प्र. ठि. कल्याण, प्र. ता. १।१२।२४, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १ ली. किं. २ आणे, मु. के. बी. ओक, आर्यवैद्यकबोध प्रेस, कल्याण, प्रती १०००. यांत हनुमानाचे स्तुतिपर ८ कविता आहेत.

गोष्टी व कादंबऱ्या

आर्यक्षात्रिय पुष्पमाला, पुष्प ३ रें—पृ. ४०, प्र. यु. एन. नवगिरे, वेताळ पेठ, पुणें; साईझ डेमी, किं. ४ आणे, मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, पुणें शहर. प्रती ५००; आर्यक्षत्रिय या जातीचा हितसंबंध असणाऱ्या गोष्टींची यात चर्चा केली आहे.

अरुणमाला वर्ष २ रें, अंक २,—पृ. ४२, प्र. एम्. जी. रांगणेकर, प्र. ठि. भटवाडी २, गिरगांव मुंबई; प्र. ता. २०।१०।२५, साईझ डेमी, १६ पेजी, सचित्र, प्रथमावृत्ति, किं. ३ आणे, मु. ए. ए. मोरमकर, श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, ठाकुरद्वार मुंबई; प्रती १०००.

वैश्य धर्मोन्नतिमाला, वर्ष ७ वें, पुष्प १९ वें—पृ. ५२, प्र. जी. व्ही

मोरे; प्र. ठि. कांदेवाडी, मुंबई नं. ४; प्र. ता. २०।१०।२५, साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, मु. सी. एस्. देवळे, मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड, गिरगांव, मुंबई; प्रती १५००.

विविधमाला, पुष्प १ ते १४—पृ. प्रत्येकीं ४८, प्र. ए. ए. मोरमकर, ठाकुरद्वार मुंबई; साईझ डेमी १६ पेजी, किं. २ आणे प्रत्येकीं; मु. ए. ए. मोरमकर, श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, ठाकुरद्वार मुंबई नं. २; प्रती ४००० प्रत्येकीं.

नवीन एक आणामाला—अंक १ ते ६ व १० ते १३, (शिवाय खास अंक १), पृष्ठें प्रत्येकीं ४०, सं. जी. जी. अधिकारी, सदाशिव पेठ पुणें शहर; साईझ क्राऊन १६ पेजी, किं. १ आणा, मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणें शहर; प्रती ३००० ते ६०००.

एक आणामाला, अंक ७, ८, ९–पृ. ४८ प्रत्येकीं, सं. जी. जी. अधिकारी, सदाशिव पेठ, पुणें; साईझ क्राऊन १६ पेजी; किं. १ आणा, मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, सदाशिव पेठ, पुणें शहर; प्रती ६००० प्रत्येकीं.

हिंद एजन्सी एक आणामाला नं. ११६, ११९ व १२०--पृ. प्रत्येकीं ४८; प्र. एन्. एन्. केतकर, प्र. ठि. नारायण पेठ पुणें शहर; साईझ रॉयल १६ पेजी; किं. १ आणा. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, सदाशिव पेठ, पुणें शहर; प्रती ५००० प्रत्येकीं.

साहित्यसेवामाला, पाकळी २ री–मु. बी. व्ही. घाटे व एम्, एन्. देशपांडे; पृ. १६, प्र. ठि. कऱ्हाड; प्र. ता. ९।४।२५; साईझ रॉयल ३२; आवृत्ति १ ली, किं. ९ पै; प्रती १०००. मु. बी. पी. कोल्हापुरे, सुमंत प्रेस, कऱ्हाड. यांत लहान गोष्टी, पुस्तकपरीक्षण, कविता हीं दिलीं आहेत.

आजचः–ले. आपटे एच्. एन्; पृ. २००; प्रकाशक ए. व्ही. पट-

वर्धन पुणें, प्र. ता. ४।११।१९२४, प्रथम आवृत्ति, किंमत दीड रुपया; मुद्रक ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर; प्रती २०००. कैलासवासी हरिभाऊ आपटे यांच्या सामाजिक कादंबऱ्यांपैकीं अपूर्ण अशी ही कादंबरी आहे.

कथासप्तक—लेखक कोल्हटकर एस्. के. व केळकर एन्. सी; पृष्ठें १६०; प्रकाशक एस्. व्ही. रानडे; प्रसिद्धीचें ठिकाण सांगली; प्र. ता. २३।४।१९२५, साईझ क्राऊन १६ पेजी, किंमत १ रुपया; प्रथम आवृत्ति; मुद्रक ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें; प्रती २०००. रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व रा. नरसिंह चिंतामण केळकर, यांनीं लिहिलेल्या ७ गोष्टी यांत दिल्या आहेत.

कनककांता—पृ. १२८, प्र. जी. एम्. वीरकर, प्रोप्रायटर मेसर्स गणेश महादेव अँड को; प्र. ठि. ६२१ गिरगांव रोड, मुंबई; प्र. ता. २।६।१९२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे. मु. जी. एम्. वीरकर, साहित्यसेवक प्रेस, सँढर्स्ट रोड, मुंबई; प्रती ६०००. चार आणे मालेचें हें एक पुस्तक आहे.

कथापंचक—ले. साठे पी. बी. पृष्ठें ६२; प्रकाशक आर. एस्. चांदेकर, प्रोप्रायटर वैदर्भ पुस्तकालय; प्र. ठि. यवतमाळ, प्र. ता. ७।११।१९२५, साईझ डेमी, आवृत्ति १ ली, किंमत ८ आणे. प्रती १०००. मु. डी. जी. सडेकर, धनंजय प्रेस, खानापूर, जि. बेळगांव; लोकमित्र मासिकांत पूर्वीं प्रसिद्ध झालेल्या ५ गोष्टी यांत दिल्या आहेत.

कसे दिवस जातील ?—ले. कुलकर्णी एन्. व्ही. पृष्ठें १९०; प्र. व्ही. आर. खाडिलकर; प्र. ठि. पुणें, प्र. ता. २५।६।२५; साईझ क्राऊन, प्रथमावृत्ति. किं. १ रु. मुद्रक जी. के गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, पुणें शहर, प्रती २०००. शेतकरी, मजूर वगैरे लोकांची गृहस्थिति, त्यांच्यावर येणारीं संकटें, त्यांचा स्वभाव, त्यांच्यांतील उत्तम गुण या सर्वांचें चित्र या कादंबरींत रेखाटलें आहे. शहरांतील आयुष्यक्रम गरीब लोकांना सुखावह नाहीं,

त्यांचें कल्याण शेतींतच आहे, हें दाखविण्याचा लेखकानें प्रयत्न केला आहे.

कळयंत्री घोडा—पृष्ठें ६९, प्र. के. व्ही. पुरंदरे, माधवबाग मुंबई; प्र. ता. १६।१२।२४; साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति ५ वी, किं. ८ आणे, मुद्रक पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, ठाकुरद्वार मुंबई नं. ४; प्रती २०००. यांत कांहीं अद्भुत व मनोरंजक लहान गोष्टी आहेत.

कुलाब्याची दांडी—ले. फडके एन्. एस्. पृ. २८८; प्र. ए. एस्. गोखले, प्र. ठि. ५७० शनवार पेठ, पुणें; प्र. ता. ७।२।२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी; प्रथमावृत्ति, किंमत १॥ रु. सचित्र; मुद्रक ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनवार पेठ, पुणें शहर, प्रती २०००. डेक्कन कॉलेजांतील पटवर्धन नांवाच्या एका श्रीमंत विद्यार्थ्याचें एका तरुण विद्यार्थिनीवर प्रेम बसतें. बापानें ठरविलेली शीलवती व कुलीन वधू पसंत न करतां या विद्यार्थिनीशीं लग्न लावण्याचें तो ठरवितो. ही विद्यार्थिनी दुसऱ्याच विद्यार्थ्याशीं लग्न लावण्याचें ठरवितें. तो तिला फसवितो. पटवर्धनावर अनेक संकटें आल्यावर त्याला बापानें पसंत केलेल्या शीलवती मुलीची खरी किंमत कळते व तिच्याशीं तो लग्न लावितो, असें या कादंबरीचें संविधानक आहे.

केवळ ध्येयासाठीं—भाषांतरकार इंदिराबाई सहस्रबुद्धे; पृ. १९५, प्र. एस्. जी. विरकूड, आंबेवाडी, मुंबई, नं. ४; प्रसिद्धीची ता. १२।१।२५; साईझ क्राऊन, प्रथम आवृत्ति, किं. दीड रुपया; मुद्रक बी. आर. कद्रेकर, रवींद्र प्रिंटिंग वर्क्स, आंबेवाडी गिरगांव मुंबई. प्रती १५००. विवाहाविधीन स्त्रियांचें स्वातंत्र्य नाहींसें होतें, म्हणून तो नको, असें मत प्रतिपादन केलेल्या एका इंग्लिश कादंबरीचें हें भाषांतर आहे. हें पुस्तक महाराष्ट्रसाहित्य या मासिकानें आपल्या ग्राहकांस भेट दिलें होतें. यांतील विचारसरणी हिंदी समाजास न पटणारी आहे.

कोरलईचा किल्लेदार—(प्रथम खंड) ले. भिडे व्ही. डब्ल्यू. पृ. ४१६;

प्र. मिसेस् पी. एस्. मसे, प्र. ठि. गिरगांव मुंबई, प्र. ता. १५।५।२५; साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथमावृत्ति, किं. २ रु. साधी बांधणी, २८८ कापडी बांधणी; मु. के. आर. गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, ५०७ शनिवार पेठ, पुणें शहर; प्रती ४०००. ही अपूर्ण कादंबरी आहे. मुंबईच्या दक्षिणेस ३० मैलांवरील कोरलईचा किल्लेदार कृष्णराव यास दुष्टांनीं कपटानें पकडून प्रतिबंधांत ठेविलें, हें या कादंबरीचें संविधानक आहे.

कौमार्यबली—ले. ब्रह्मनाळकर आर. एम्. पृ. ४८; प्र. ए. ए. मोरमकर, प्र. ठि. मुंबई; प्र. ता. २०।६।२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे, मु. ए. ए. मोरमकर; श्रीलक्ष्मीनारायण प्रेस, ठाकूरद्वार मुंबई; प्रती १०००. एका रजपूत कुमारीचा एका राजाशीं प्रेमसंबंध जडला. पण अशा निंद्य संबंधाचा तिला पश्चाताप होऊन आपला कौमार्यभंग करणाऱ्या पापी राजाचा तिनें वध करून आपला सूड उगविला, ही कथा या कादंबरींत दिली आहे.

खुनी कोण?:—पृ. १३९; प्र. जी. एम् वीरकर, प्रोप्रायटर गणेश महादेव अँड को; प्र. ठि. गिरगांव रोड मुंबई नं. ४; प्र. ता. २।११।२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे; मु. जी. एम्. वीरकर, साहित्यसेवक प्रेस, सँढर्स्ट रोड, मुंबई; प्रती ७०००. चार आणे मालेचें हें एक पुष्प आहे.

खुळा राक्षस:—भाषांतरकार जी. एन्. दातार, पृ. १८, प्र. भाषांतरकार; प्र. ठि. १७१ गुजर आळी, राजापूर, जिल्हा रत्नागिरी. प्र. ता. २३।१०।१९२५, साईझ रॉयल १६ पेजी; आवृत्ति १ ली, किं. १ आणा, प्रती ५००, मु. जी. एन्. दातार, दातार प्रेस, गुजर आळी, राजापूर, जिल्हा रत्नागिरी. कथासरित्सागराचे आधारें लहान मुलांकरितां लिहिलेली ही एक काल्पित गोष्ट आहे.

सुलबकावलीः—पृ. १६६, प्र. के. व्ही. पुरंदरे अँड कंपनी; प्र. ठि. माधवबाग मुंबई, प्र. ता. २५।८।१९२५, साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति १० वी, किं. १०४ रु. प्रती ३०००, मु. सी. एस्. देवळे, मुंबईवैभव प्रेस, मुंबई. ही एक अद्भुत कथा आहे. या कथेंतील नायक नायिकेच्या प्रेमानें अनेक साहसाच्या गोष्टी करितो.

चार बंगाली गोष्टीः—पृ. १६०, प्र. ए. सी. भट, प्र. ठि, पुणें शहर; प्र. ता. १०।१२।१९२४, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १२ आणे, प्रती २०००. मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, १७२ शनिवार पेठ, पुणें शहर. बंकिमचंद्र चतर्जी यांच्या स्फुट गोष्टींचें हें भाषांतर आहे.

जिंजीवास अथवा छत्रपति राजाराममहाराजः—ले. काळे व्ही. एल्. पृ. १७२, प्र. लेखक; प्र. ठि. शहापूर; प्र. ता. २५।१०।२५; साईझ सुपर रॉयल १६ पेजी, आवृत्ति ३ री, किं. १२ आणे, मु. डी. ए. सावंत, श्रीरामतत्वप्रकाशक प्रेस बेळगांव, प्रती १०००; छत्रपति राजारामाचे काळच्या इतिहासावर या कादंबरीचें संविधानक रचलें आहे. ही कादंबरी फार लोकप्रिय झालेली आहे.

जीवनक्रांतिः—लेखक शिवराम, पृ. २१०, प्रकाशक. पी. एन्. जव्हेरी, नवरोजी स्ट्रीट, मुंबई नंबर २; प्र. ता. २०।९।२४; साईझ क्राऊन १६ पेजी; प्रथम आवृत्ति, किं. १। रु. मु. पी. एन्. जव्हेरी, विनय प्रेस, नवरोजी स्ट्रीट, मुंबई नंबर २; प्रती ५००; मुलांकरितां लिहिलेली ही एक कादंबरी आहे. एका सुशील मुलावर अनेक प्रकारची आपत्ति आली असतां तो एका श्रीमंत व प्रेमळ स्नेह्याच्या मदतीनें या आपत्तींतून पार पडतो व शेवटीं सुखाचा उपभोग घेतो, हें या कादंबरीचें संविधानक आहे.

तीन आणे माला, नं. ७ अंतरपाटः—ले. के. एन्. अरनोडकर, पृ. ७२, प्र. एन्. आर. जोशी, प्र. ठि. गिरगांव मुंबई; प्र. ता. २०।९।२५,

साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ३ आणे, मु. एन्. आर. जोशी, रामदास प्रिंटिंग प्रेस, खटाव मकनजीची वाडी, गिरगांव मुंबई, प्रती ८०००.

दुटप्पी कीं दुहेरी?—ले. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, पृ. १२८, प्र. जी. जी. अधिकारी, प्र. ठि. सदाशिव पेठ पुणें शहर; प्र. ता. २३।१।१९२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली, कि. १ रु., मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणें शहर. प्रती २०००. या लहान कादंबरीचें संविधानक अगदीं साधें आहे; पण, भाषा व विचारसरणी या योगानें हें पुस्तक रमणीय झालें आहे.

देवांच्या दुनियेंत—ले. शुक्ल एस्. ए., पृ. ७२, प्र. एन्. आर. जोशी; प्र. ठि. गिरगांव मुंबई, प्र. ता. ५।१०।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, कि. ३ आणे, मु. एन्. आर. जोशी, रामदास प्रिंटिंग प्रेस, खटाव मकनजी वाडी, गिरगांव मुंबई; प्रती ८०००. तीन आणे मालेचें हें एक पुष्प आहे.

नऊ-नारीचारित्र—पृ. ७२, प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. माधवबाग मुंबई; प्र. ता. २।२।१९२५, साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति ४ थी, किं. ८ आणे, प्रती ३०००. मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, मुंबई नं. ४.

नटसम्राट—ले. नाथमाधव, पृ. २१०, प्र. एन्. आर. जोशी, प्र. ठि. गिरगांव मुंबई; प्र. ता. १।१०।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १ रु., मु. एन्. आर. जोशी, श्रीरामदास प्रिंटिंग प्रेस, खटाव मकनजीची वाडी, गिरगांव, मुंबई. प्रती २०००.

नटीचे नाच—ले. नेरूरकर व्ही. के. पृ. ८०, प्र. एन्. आर. जोशी, प्र. ठि. गिरगांव मुंबई, प्र. ता. २०।८।१९२५, साईझ क्राऊन १६ पेजी;

आवृत्ति १ ली, किं. ३ आणे; प्रती ८०००. मु. एन् आर. जोशी, रामदास प्रिंटिंग प्रेस, खटाव मकनजी वाडी, गिरगांव मुंबई. तीन आणे मालेंतील हें एक पुस्तक आहे.

न पटणारी गोष्ट ऊर्फ चित्तशुद्धि--लेखक आपटे एन्. एच्., पृ. २७३, प्रकाशक एस्. के. शिंदकर, चिटणीस वाङ्मयविहारमंडळ, पुणें; प्रसिद्धीचें साल १९२३, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथम आवृत्ति, किं. १ रु., मुद्रक पृ. १ ते ९६ पर्यंत, एस्. एम्. परांजपे, गोवर्धन प्रेस पुणें व बाकीचीं पृष्ठें एल्. ब. कोकाटे, हनुमान प्रेस पुणें; प्रती १६००. एका बाणेदार मुलीचें एका वृद्धाशीं लग्न झालें. तिला ही गोष्ट आवडली नाहीं. ती वृद्धपतीशीं पत्नी या नात्यानें वागण्यास तयार झाली नाहीं; तिनें आपलें शील फार उज्ज्वल राखिलें. वृद्ध पतीला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला. या स्त्रीनें आपल्या पतीची सेवा एकनिष्ठपणें केली व त्याचे पश्चात् आयुष्य परोपकारांत घालविलें.

नवनाथभक्तिसारकथारसः--पृ. १७६, प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. पुरंदरे आणि कंपनी; माधवबाग मुंबई; प्र. ता. २५।६।२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति ६ वी, किं १ रु. मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, ३ ठाकूरद्वार, मुंबई. प्रती ३०००. मालू कवीच्या नवनाथ-भक्तिसार यांतील कथा सरळ गोष्टीच्या रूपानें सोप्या भाषेंत लिहिलेल्या आहेत. जालंदरनाथ, गोरखनाथ वगैरे नाथपंथाचे साधुपुरुषांनीं केलेले चमत्कार यांत वर्णन केले आहेत.

पांडवप्रतापः--ले. पाबळकर के. एन्. पृ. २८८; प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. मुंबई नं. ४, प्र. ता. १०।१२।१९२४, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति ६ वी (सचित्र); किं. १८१२ रु. प्रती ३०००. मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, मुंबई नं. ४. श्रीधर कवीच्या पांडवप्रताप

ऱ्या ग्रंथाचें आधारें यांत पांडवांच्या चरित्रांतील भाग गोष्टीच्या रूपानें दिला आहे.

पानिपतची मोहीम:—ले. बापट एन्. व्ही. पृ. ६५६, प्र. तात्या नेमिनाथ पांगळ, प्र. ठि. रविवार पेठ पुणें, प्र. ता. ३१।३।२५; साईझ क्राऊन १६ पजी, आवृत्ति २ री, किं. ७ रु. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ पुणें शहर; प्रती २०००. रा. बापट हे मागील पिढींतील प्रसिद्ध लेखक होते. 'छत्रपति संभाजीमहाराज,' 'चितोरचा वेढा,' 'बाजीराव' वगैरे त्यांचीं पुस्तकें अत्यंत लोकप्रिय होतीं. पानिपतची मोहीम ही त्यांची फार मोठी कादंबरी आज बरींच वर्षें दुर्मिळ होती, तिची ही नवीन आवृत्ति पांगळ यांनीं काढली आहे.

पावन तीर्थ:—ले. एम्. व्ही. जोशी; पृ. २९६; प्र. पी. व्ही. जोशी; प्र. ठि. दादर मुंबई; प्र. ता. ३।९।२५; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र); किं. १॥ रु. मु. ए. बी. घगवे आणि सी. एस्. देवळे, व्हिक्टर प्रिंटिंग प्रेस व मुंबईवैभव प्रेस, गिरगांव मुंबई; प्रती २०००. पोर्तुगीज लोकांनीं १६ व्या १७ व्या शतकांत बळजबरीनें खिस्तधर्माचा कसा प्रसार केला व त्या योगानें कोंकणमधील हिंदु लोकांना कसा त्रास झाला व पतितपरावर्तनाचे प्रयत्न त्या वेळीं देखील कांहीं महात्म्यांनीं कसे केले याचें चित्र या कादंबरींत रेखाटलें आहे.

पावागडचा प्रलय:—पृ. ३०९, प्र. एम्. जी. व्होरा, प्रोप्रायटर सुरसग्रंथप्रसारक मंडळ, प्र. ठि. शुक्रवार पेठ, पुणें शहर, प्र. ता. १८।६।२५; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ३॥ रु. मु. डी. जी. खांडेकर, लॉ प्रिंटिंग प्रेस, शनिवार पेठ पुणें शहर; प्रती १२००. ही एक ऐतिहासिक कादंबरी आहे. मुसलमानांनीं चंपानेर येथील रजपूत राजाचा पराभव केला आणि नंतर पावागडच्या किल्याचा विध्वंस केला, या ऐति-

हासिक भागावर कादंबरीची उभारणी केली आहे.

फांकडे तलवारबहाद्दर:—ले. आठल्ये के. एन्. पृ. १४३; प्र. लेखक प्र. ठि. पुणें. प्र. ता. १।६।२५; साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथमावृत्ति, किं. १२ आणे, मु. एस्. एन्. जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ पुणें, प्रती १२५०. स्पॅनिश भाषेंतील प्रसिद्ध विनोदपर ग्रंथ 'डॉन क्विक्झोट' ह्या पुस्तकाचें हें रूपांतर केरळकोकिळचे संपादक आठल्ये यांनीं केलें आहे. मूळ पुस्तकांतील चालीरीती, समाज व काळ हीं अगदींच भिन्न असल्या-मुळें त्यांतील गोष्टी रूपांतरांत येणें शक्य नाहीं. तथापि रा. आठल्ये यांनीं हें पुस्तक मनोरंजक करण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे व तो बराच साधला आहे.

बकुळा व हानिफा बेगम:—ले. भिडे बी. जी. पृ. ४०२; प्र. तात्या नेमिनाथ पांगळ, प्र. ठि. मुंबई नं. ४, प्र. ता. ८।१२।२४; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ रु. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ पुणें; प्रती १३००. सरस वाङ्मयमालेचें हें ५३ वें पुष्प आहे. यांत दोन कादंबऱ्या आहेत. पहिली कादंबरी चार्लस गेविस या कादंबरीकाराचे एका पुस्तकाचें रूपांतर आहे. दुसरी वॉल्टर स्कॉट याच्या क्विंटिनडर्वर्ड या कादंबरीचें रूपांतर आहे.

बाईलवेडा:—ले. हडप व्ही. व्ही. पृ. २६४, प्र. व्ही. पी. पेंढरकर, प्र. ठि. गिरगांव मुंबई, प्र ता. १०।४।२५; साईझ क्राऊन ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. २ रु. (सचित्र); मु. व्ही. पी. पेंढरकर, टयुटोरिअल प्रेस, गिरगांव बॅक रोड मुंबई; समाजांतील कांहीं प्रतिष्ठित लोकांचीं दुष्कृत्यें दाखविण्याचा या कादंबरींत प्रयत्न केला आहे.

बायको हरवली:—पृ. ३६; प्र. ए. व्ही. मराठे. प्र. ठि. वेंगुर्लें. प्र. ता. १।२।२५; साईझ फूलसकॅप, ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. २ आणे,

प्रती १०००; मु. ए. व्ही. मराठे, किरात प्रेस, पोष्ट वेंगुर्ला, जि. रत्नागिरी. समवायिक कुटुंबपद्धतीचे फायदे दाखविण्याकरितां हें लहानसें प्रहसन लिहिलें आहे.

बीजेची दिवाळी:--ले. अस्नोडकर के. एन्. पृ. ७२ ; प्र. एन्. आर. जोशी; प्र. ठि. गिरगांव मुंबई. प्र. ता. २०।१०।२५; साईझ क्राऊन १६ पेजी; प्रथम आवृत्ति, किं. ३ आणे, मु. एन्. आर. जोशी, रामदास प्रिंटिंग प्रेस, खटाव मकनजी वाडी, गिरगांव, मुंबई नं. ४, प्रती ८०००; तीन आणा मालेचें हें एक पुष्प आहे.

बेबंदशाही नाटकाचें कथानक--पृष्ठें १२, प्र. जे. जी. कर्णिक, प्र. ठि. बॉंबे थिएटर मुंबई, प्र. ता. ५।२।२५ आवृत्ति २ री, किं. १ आणा. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस पुणें शहर; प्रती ५०००. या नाटकाची उभारणी संभाजीच्या कारकीर्दीच्या इतिहासावर केली आहे. महाराष्ट्र नाटक कंपनीचे नट स. औंधकर यांनीं हें नाटक रचिलें. या नाटकाचे प्रयोग महाराष्ट्रांत फार लोकप्रिय झाले. नटानें उत्तम नाटक लिहिल्याचीं जीं कांहीं थोडीं उदाहरणें आहेत त्यांपैकीं हें एक आहे.

बंगाली वीरांच्या कथा—ले. आपटे ए. व्ही., पृ. ४८, प्र. एन्. व्ही. आपटे, प्र. ठि. पुणें शहर, प्र. ता. १।१२।२४, साइझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ५ आणे, प्रती २०००; मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, ४९५ शनिवार पेठ, पुणें शहर. बालवीर संस्थेच्या वाङ्मयांतील हें एक पुस्तक आहे. यांत बंगाल्यांतील शूर पुरुषांच्या कथा दिल्या आहेत.

भक्तिविजयकथासार--पृ. २१८, प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. माधवबाग मुंबई ४; प्र. ता. ४।५।२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति ५ वी (सचित्र), किं. १ रु.; मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, ठाकुरद्वार रोड

मुंबई नं. ४. प्रती ३०००. महिपतीच्या भक्तिविजय ग्रंथांतील संतांच्या कथा सोप्या भाषेंत दिल्या आहेत.

भारतांतील सुबोध गोष्टी—ले. करमरकर व्ही. व्ही., पृ. ६०; प्र. एम्. बी. गोडबोले, प्र. ठि. ५३० सदाशिव पेठ, पुणें शहर; प्र. ता. ९।३।२५, साईझ डेमी, आवृत्ति १ ली, किं. ६ आणे, प्रती १०००, मु. एम्. बी. गोडबोले, वृत्तप्रसारक प्रेस, ५३० सदाशिव पेठ, पुणें शहर. लहान मुलांकरितां भारतांतील कांहीं चरित्रें व गोष्टी यांत दिल्या आहेत.

भुताटकी बुरूज व मर्दानी सौंदर्य, खंड ४।५—ले. भिडे बी. जी. व देसाई पी. एस्. पृ. ४३५, प्र. तात्या नेमिनाथ पांगळ, प्र. ठि. ४३८ रविवार पेठ, पुणें शहर; प्र. ता. १०।८।२५, साईझ क्राऊन ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४॥८ रु., मु. डी. बी. खांडेकर, लॉ प्रिंटिंग प्रेस, ५३० शनिवार पेठ पुणें शहर; प्रती १३००. सरस वाङ्मयमालेचें हें एक पुष्प आहे.

मजूर—ले. कुळकर्णी एन्. व्ही., पृ. १९६, प्र. व्ही. आर. खाडिलकर, प्र. ठिकाण नारायण पेठ पुणें, प्र. ता. २५।३।२५, साईझ क्राउन, प्रथम आवृत्ति, किं. १ रुपाया. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, शनवार पेठ, पुणें; प्रती २०००. मजुरांचीं दुःखें काय असतात याचें उत्कृष्ट वर्णन या कादंबरींत केलें आहे. भांडवलवाल्यांच्या सहानुभूतीनें संपासारख्या आपात्ती सहज टाळतां येतील व मजुरांचें आयुष्य सुखकर करतां येईल हें दाखविण्याचा प्रयत्न या कादंबरींत केला आहे. डेक्कन व्हर्नाक्युलर सोसायटीनें या पुस्तकास बक्षीस दिलें आहे.

मराठशाहीची ढाल—ले. जोशी एल्. एन्., पृ. २६२, प्र. गणेश महादेव ॲंड को, प्र. ठि. गिरगांव मुंबई. प्र. ता. २०।८।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १॥८ रु., मु. के. जी. जोशी, रामदास प्रिंटिंग प्रेस, गिरगांव मुंबई; प्रती २५००. ही ऐतिहासिक कादंबरी आहे.

या कादंबरींत १६८९ ते १७०० चा इतिहास आहे. संताजी घोरपडे याचा नाश कसा झाला हें लेखकानें दाखविलें आहे.

मास्तरीण काकू—ले. व्ही. व्ही. इडप, पृ. ३५०. प्र. व्ही. पी. पेंढरकर, प्र. ठि. गिरगांव मुंबई, प्र. ता. २५।८।२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र), किं. १॥ रु. मु. व्ही. पी. पेंढरकर, टयूटोरिअल प्रेस, गिरगांव बॅकरोड मुंबई, प्रती २०००. दुर्व्यसनी व अरेरावी अधिकाऱ्यांच्यामुळें स्त्रीशिक्षकांवर कसा जुलूम होतो व त्यामुळें मुलींच्या शिक्षणाचें पाऊल कसें मागें पडतें हें दाखविण्याच्या हेतूनें ही कादंबरी लिहिलेली आहे. यांतील प्रसंग एका संस्थानांत घडले आहेत असें दाखविलें आहे.

महावीर कोआपेना—ले. रेव्ह. सावरकर डी. एस्., पृ. ४८, प्र. रे. एम्. मॅकनिकल, प्र. ठि. स्टॅव्हले रोड पुणें, प्र. ता. २१।३।१९२५, साईझ रॉयल ४८ पेजी, आवृत्ति २ री, किं. ६ पै, प्रती ५०००. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, बुधवार पेठ, पुणें शहर. 'आपल्या वैऱ्यावर प्रेम कर' या खिस्ताच्या उक्तीचें उदाहरण म्हणून ही गोष्ट प्रत्यक्ष घडलेल्या एका गोष्टीच्या आधारानें लिहिली आहे. पासिफिक महासागरांतील बेटावर राहणाऱ्या एका रानटी मनुष्याचें कोआपेना हें नांव आहे. हाच कथेचा नायक आहे. यानें खिस्ती धर्म स्वीकारून खिस्ताची आज्ञा पाळली.

मातृदेवता—ले. काकतकर एस्. एन्. पृ. १०४; प्र. जी. व्ही. पटवर्धन, प्र. ठि. रत्नागिरी, प्र. ता. सप्टेंबर १९२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १० आणे, मु. जी. व्ही. पटवर्धन, बळवंत प्रेस, रत्नागिरी, प्रती २०००. गरीबींत वाढलेला हुशार मुलगा आपल्या आईला व पत्नीला सोडून विद्यार्जनाकरितां मुंबईस गेला. तेथें तो आपल्या हुशारीनें परीक्षा पास झाला. पण तो आपल्या प्रेमळ मातेला व पत्नीला पार विसरला. त्याचें एका श्रीमंत मुलीशीं लग्न झालें. सासऱ्यानें त्याला विलायतेंत

पाठविलें. परत आल्यावर तो मोठा अधिकारी झाला. पण श्रीमंत पत्नीपासून त्याला सुख झालें नाहीं. शेवटीं त्याला पश्चात्ताप झाला व त्यानें आईची व पत्नीची क्षमा मागितली व परोपकारांत आयुष्य घालविलें, अशी कथा यांत आहे.

मूकनायिका—ले. श्री. जानकीबाई देसाई, पृ. ४००, प्र. नात्या नेमिनाथ पांगळ, प्र. ठि. मुंबई नं. ४, प्र. ता. १०।१०।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ रु. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ पुणें शहर; प्रती १३००. सरस वाङ्मयमालेचें हें एक पुष्प आहे.

मूर्खशिरोमणी अर्थात् एका विक्षिप्त मनुष्याचें चरित्र–पृ. ७२, प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. माधवबाग मुंबई नं. ४, प्र. ता. १६।६।१९२५, साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति ३ री, किं. ८ आणे, प्रती ३०००. मु. प्रभाशंकर जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. ४. एका विक्षिप्त मूर्ख मनुष्याच्या गोष्टी यांत दिल्या आहेत.

मुकुंदपंचविशी–प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. माधवबाग, मुंबई नं. ४; प्र. ता. २१ सप्टेंबर १९२५, साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति ५ वी, किं. ४ आणे, प्रती ४०००. मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग वर्क्स, ठाकुरद्वार मुंबई. पंडित मुकुंदराज यांनीं विद्यानगरच्या रामराजाला सांगितलेल्या २५ गोष्टी यांत दिल्या आहेत.

मुक्तग्रहण व हरपलेलें रत्न–ले. आपटे जी. एस्. व जोशी व्ही. जी. पृ. ४३६, प्र. तात्या नेमिनाथ पांगळ, प्र. ठि. रविवार पेठ पुणें शहर; प्र. ता. १५।६।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथमावृत्ति, किं. ४ रु. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस ३०० सदाशिव पेठ, पुणें शहर. प्रती १२५०. सरस वाङ्मयरत्नमालेचें हें एक पुष्प आहे. यांत दोन कादंबऱ्या आहेत.

हरिभाऊ आपटे यांच्या ‘ सूर्यग्रहण ’ कादंबरीनंतरचा भाग मुक्तग्रहण यांत घेतला आहे. व छत्रपति शिवाजी दिल्लीपतीच्या अटकेंतून सूटून दक्षिणेंत कसे आले हें या कादंबरींत दाखविलें आहे. दुसऱ्या कादंबरींत हरवलेलें रत्न पुन्हा कसें सांपडलें हें सांगितलें आहे.

मुलींची सीता–ले. किनरे के. जी. पृ. २८०, प्र. लेखक प्र. ठि. नारायण पेठ पुणें शहर, प्र. ता. २९।८।१९२५, साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, (सचित्र), किं. १। रु. प्रती २०००. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर. मुलींकरितां. सीतेचें हें विस्तृत चरित्र रा. किनरे यांनीं लिहिलें आहे.

म्हैसूरचा वाघ–पृ. १५५, प्र. ए. व्ही. पटवर्धन, प्र. ता. १५।८।२५ साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १। रु. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस पुणें शहर. प्रत २०००. रा. हरी नारायण आपटे यांच्या करमणूक वर्तमानपत्रांत इसवी सन १८९० सालीं ही कादंबरी क्रमशः प्रसिद्ध झाली. कर्नल मेडोझ टेलर या ग्रंथकर्त्यांच्या ‘ टिपू सुलतान ’ या इंग्रजी कादंबरीचें हें रूपांतर आहे. रा. म. का. कारखानीस यांनीं या कादंबरीस छोटी प्रस्तावना जोडली आहे.

मोलकरीण–पृ. २००, प्र. जी. एन्. दातार, प्र. ठि. गुजर आळी राजापूर, जिल्हा रत्नागिरी; प्र. ता. २१।११।२५, साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १॥ रु. मु. जी. एन्. दातार, दातार प्रेस, गुजर-आळी, राजापूर, जिल्हा रत्नागिरी. प्रती १०००. रेनॉल्डच्या Seam Stress या पुस्तकाचें हें रूपांतर आहे.

यमुना व दुसऱ्या गोष्टी—पृ. २४, सं. मिस्ट्रेस डब्ल्यू ब्रुअर, वुइमेन्स खिश्चन टेंपरन्स युनिअन; प्र. ठि. पुणें, प्र. ता. ८।८।१९२४, साईझ डबल क्राऊन १६ पेजी, प्रथमावृत्ति, किं. २ आणे. मु. ए. एस्. गोखले,

विजय प्रेस शनिवार पेठ, पुणें शहर; प्रती ५००. ख्रिस्ती मद्यपाननिषेधक मंडळानें हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. यांत मद्यपाननिषेधपर गोष्टी दिलेल्या आहेत.

रक्तलांछन व मुमताज बेगम–पृ. १४६, प्रकाशक जी. एम्. वीरकर गणेश महादेव मंडळीकरितां, ६२१ गिरगांव रोड मुंबई, प्र. ता. २।२।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथम आवृत्ति, किं. ४ आणे, मु. जी. एम्. वीरकर, साहित्यसेवक प्रेस, गिरगांव मुंबई; प्रती ५०००. चार आणे मालेचें हें एक पुष्प आहे.

रत्नगोल—पृ. १३२, प्र. जी. एम्. वीरकर; गणेश महादेव आणि कंपनीकरितां ६२१ गिरगांव रोड मुंबई, प्र. ता. २।३।२५; साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथम आवृत्ति, किं. ४ आणे, मु. जी. एम्. वीरकर, साहित्यसेवक प्रेस, सँढर्स्ट रोड गिरगांव मुंबई. प्रती ६०००; चार आणे मालेचें हें एक पुष्प आहे. यांत गुप्तपोलिसाच्या चातुर्याच्या गोष्टी आहेत.

राजाचें बंड या नाटकाचें कथानक—पृ. १०; प्र. जी. आर. इनामदार, प्र. ठि. शनिवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. १३।१२।१९२४; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली, किं. १ आणा, प्रती २०००; मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ पुणें शहर. याच नांवाच्या नाटकाचें सार यांत दिलें आहे.

रामविजयकथासार, सचित्र—पृ. १९२; प्र. के. व्ही. पुरंदरे; प्र. ठि. माधवबाग मुंबई; प्र. ता. ५।२।१९२५; साईझ रॉयल १६ पेजी; आवृत्ति ६ वी (सचित्र); किं. १ रु प्रती ३०००; मु. पी. जे पाठक, पुरंदरे, पाठक प्रिंटिंग प्रेस, ३ ठाकुरद्वार मुंबई. यांत श्रीधरकवीच्या रामविजयाच्या आधारें रामचरित्र सरळ गोष्टीच्या रूपानें दिलें आहे.

लांच्छितचंद्रमा उर्फ राणा हमीर—ले. आपटे एन्. एस्. पृ. १५०,

प्र. लेखक. प्र. ठि. कोरेगांव, (सातारा), प्र. ता. ६।८।२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी; आवृत्ति २ री, किं. १ रु. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ पुणें शहर. प्रती २१००; राणा हमीर याला राज्य सोडून वनवास कसा भोगावा लागला व पुन्हा त्यानें राज्य परत कसें मिळविलें तें यांत वर्णन केलें आहे.

वणव्यांतलें फूल—पृ. ३१९, प्र. एम्. जी. व्होरा; संपादक सुरस-ग्रंथप्रसारक मंडळी, प्र. ठि. शुक्रवार पेठ पुणें शहर. प्र. ता. १२।२।१९२४, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली. किं. ३०८ रु. मु. डी. जी. खांडेकर, लॉ प्रिंटिंग प्रेस, शनिवार पेठ पुणें. प्रती १५००; सुरस वाङ्मय-मालेचें हें एक पुष्प आहे. समाजसुधारक हें टोपणनांव धारण करून एका लेखकानें ही कादंबरी लिहिली आहे. समाजांतील रूढीमुळें विधवांचें आयुष्य किती खडतर होतें, हें या कादंबरींत दाखविलें आहे व पुनर्विवाहाचें मंडण केलें आहे.

वसईचा रणसंग्राम—ले. सी. के. दामले, पृ. १७४, प्र. एस्. के. भावे, प्र. ठि. ठाकुरद्वार, मुंबई. प्र. ता. ५।७।२५; साईझ क्राऊन ८ पेजी, आवृत्ति १ ली. किं. १। रु. मु. डी. के. फडके, अरुणोदय प्रेस; ठाणें. प्रती ३०००. इ. स. १७३९ सालीं मराठ्यांनीं पोर्तुगीज लोकांपासून वसई घेतली, या प्रसंगाला अनुलक्षून लिहिलेली ही ऐतिहासिक कादंबरी आहे.

वाईकर भटजी—पृ १८८; प्र. सी. आर. टिकेकर, प्र. ठि. नवी पेठ, सोलापूर, प्र. ता. १५।२।१९२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी; आवृत्ति २ री. किं. १०४ रु. मु. ए. एस्. गोखले, शनवार पेठ, पुणें शहर. प्रती ५०००; प्रसिद्ध लेखक ' धनुर्धारी ' यांनीं ' Vicar of wakefield ' च्या धर्तीवर लिहिलेल्या कादंबरीची ही नवीन आवृत्ति काढलेली आहे.

विनोदलहरी, भाग २ रा—पृ. १८४, प्र. एन्. बी. चव्हाण. प्र. ठि.

पुणें शहर. प्र. ता. १९।८।१९२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र); किं. ११ रु. प्रती १०००; मु. एन्. बी. चव्हाण, हरिहर प्रेस, पुणें शहर.

विसकटलेली वेणी—कोल्हटकर ए. बी. पृ. ७२. प्र. एन्. आर. जोशी, प्र. ठि. गिरगांव मुंबई. प्र. ता. ५।९।१९२५; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति २ री. किं. ३ आणे. प्रती १२०००, मु. एन्. आर. जोशी, रामदास प्रिंटिंग प्रेस, खटाव मकनजीवाडी गिरगांव, मुंबई. मुसलमान लोक उच्चवर्णीय हिंदू मुलींना पळविण्याकरितां कोणते उपाय योजितात हें या गोष्टींत दाखविलें आहे.

वीरात्मा, प्रथम व द्वितीय खंड—ले. फाटक गणेशशास्त्री, पृ. २३२, प्र. एम्. जी. व्होरा. संपादक सुरसग्रंथप्रकाशक मंडळी. प्र. ठि. शुक्रवार पेठ पुणें शहर. प्र. ता. ६।२।१९२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली. किं. ६०१२ मु. डी. जी. खांडेकर, लॉ प्रिं. प्रेस, शनिवार पेठ पुणें. प्रती १५००.

वेताळपंचविशी—पृ. १५२; प्र. के. व्ही. पुरंदरे; प्र. ठि. माधवबाग मुंबई नं. ४ प्र. ता. २।५।२५, साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति ६ वी. किं. ०१२; मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिं. प्रेस, नं. ३ ठाकुरद्वार मुंबई. प्रती ३०००. यांत विक्रमराजाला वेताळानें सांगितलेल्या २५ गोष्टी दिल्या आहेत.

शलाका—पृ. १०६, प्र. वाय्. डी. पेंढारकर; प्र. ठि. ४६१ शनिवार पेठ पुणें शहर; प्र. ता. ९।९।१९२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १ रुपाया, प्रती १०००; मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार, पुणें शहर; रविकिरणमालेचें हें ५ वें पुष्प आहे. यांत लहान गोष्टी व कांहीं कविता दिल्या आहेत.

शामसुंदर—ले. कोल्हटकर एस्. के. पृ. २८४; प्र. एन्. एच्. आपटे,

प्र. ठि. कोरेगांव, जि. सातारा; प्र. ता. २९।६।२५, साईझ डबल क्राऊन १६ पेजी, प्रथमावृत्ति; सचित्र किं. १ रु. २ आणे. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ पुणें; प्रती १०००. प्रसिद्ध लेखक रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची ही सामाजिक कादंबरी आहे. एकाद्या फारशा न शिकलेल्या पण अंतःकरणांत सहानुभूति असलेल्या तरुणाला मागासलेल्या वर्गाला सुशिक्षित करून सदाचरणी कसें करितां येतें हें यांत दाखविलें आहे.

शालिवाहन शक—ले. दातार जी. एन्. पृ. २९२; प्र. लेखक, प्र. ठि. गुजर आळी राजापूर; प्र. ता. ५।३।१९२५; साईझ डेमी अष्टपत्री; प्रथम आवृत्ति; किं. २०८ रु. मु. जी. एन्. दातार, दातार प्रेस, राजापूर, गुजर आळी. प्रती ७५०. रेनॉल्डच्या 'पोप जोन' या कादंबरीच्या आधारें ही कथा लिहिली आहे.

शिपाई—ले. कुलकर्णी एन्. व्ही. पृ. १८२, प्र. व्ही. आर. खांडेकर, प्र. ठि. नारायण पेठ पुणें शहर; प्र. ता. २६।९।२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली (सचित्र); किं. १ रु. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिं. वर्क्स, पुणें शहर. प्रती २ हजार. या कादंबरींत खेडेगांवांतील आयुष्यक्रम वर्णन केला आहे. सरकारी अधिकाऱ्यांना बगलेंत मारून कांहीं प्रतिष्ठित लोक गरिबांला कसे छळतात याचें सुंदर चित्र या पुस्तकांत दाखविलें आहे.

शुकछत्तिशी—पृ. ८१, प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. माधवबाग मुंबई नं. ४; प्र. ता. ३०।७।१९२५; साईझ डेमी १२ पेजी, आ. तिसरी; किं. ०८; प्रती ३०००. मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिं. प्रेस, ३ ठाकुरद्वार मुंबई.

स्वराज्याचें परिवर्तन—ले. नाथमाधव, पृ. ४७२, प्र. जी. एम्. वीरकर, प्रोप्रायटर गणेश महादेव अँड को. प्र. ठि. गिरगांव मुंबई; प्र. ता. १६।१० २५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. रु. १ मु. जी. एम्. वीरकर, साहित्यसेवक प्रेस, सँढर्स्ट रोड, मुंबई. प्रती ६०००. श्रीयुत नाथमाधव यांनीं

मराठ्यांच्या इतिहासावर कादंबऱ्या लिहिण्याला प्रारंभ केला आहे. या कादंबरींत राजारामाच्या कालचा इतिहास दिलेला आहे.

सूर्यग्रहण–लें. आपटे एच्. एन्. पृ. ३१५; प्र. ए. व्ही. पटवर्धन, प्र. ठि. पुणें. प्र. ता. १८।८।१९२५, साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति २ री, कि. २८४ रु. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर; प्रती २०००. ही एक ऐतिहासिक कादंबरी आहे. श्रीशिवछत्रपतीस जयसिंगाशीं तह करून आग्र्यास जावें लागलें व त्या ठिकाणीं ते कैदेंत पडले, या ऐतिहासिक प्रसंगावर या कादंबरीचें संविधानक रचलेलें आहे.

सौंदर्याचा फुलबाग—ले. व्ही. व्ही. हडप, पृ. ४१०, प्र. व्ही. पी. पेंढारकर. प्र. ठि. गिरगांव-मुंबई, प्र. ता. १५।९।२५, साईझ क्राऊन ८ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र), किं. २८८ रु. मु. व्ही. पी. पेंढरकर, ट्युटोरिअल प्रेस, गिरगांव बॅकरोड मुंबई. प्रती ३०००. समाजांतील पुढारी वर्गांतील कांहीं व्यक्तींचें दुराचरण दाखविण्याचा प्रयत्न यांत केला आहे.

संपूर्ण बंकिमचंद्र, चतुर्थ खंड–भाषांतरकार व्ही. जी. आपटे, पृ. ३६२, प्र. एम्. एन्. कुलकर्णी, प्र. ठि. ठाकुरद्वार, मुंबई, प्र. ता. २९।९। १९२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १८१४ रु. साधी, व कापडी २८६ रु. मु. एम्. एन्. कुलकर्णी, कर्नाटक प्रेस, ३१८ अ, ठाकुरद्वार, मुंबई. प्रती ४०००. प्रसिद्ध बंग कादंबरीकार बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांच्या 'रजनी,' 'युगलांगुलीय,' 'राधाराणी' 'व' 'राजसिंह' यांचें भाषांतर या पुस्तकांत दिलें आहे.

संतांचा बाजार—ले. भावे व्ही. पी. पृ. २८; प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. माधवबाग मुंबई नं. ४. प्र. ता २५ ऑगस्ट १९२५, साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति ५ वी; किं. ४ आणे. प्रती ३०००. मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, ठाकुरद्वार मुंबई. यांत महाराष्ट्रांतील संतांच्या

अद्भुत चमत्काराच्या कथा दिल्या आहेत.

संसार चित्र–ले. प्रभू बी. डी. पृ. २३१, प्र. लेखक. प्र.ठि आंबेवाडी गिरगांव मुंबई. प्र. ता. १२।१।२५, साईझ क्राऊन, प्रथम आवृत्ति, किं. १८१२ मु. एस्. जी. विरकूड; रवींद्र प्रिंटिंग वर्क्स, आंबेवाडी, गिरगांव मुंबई. प्रती १०००. मनुष्याचें शील हींच प्रधान गोष्ट होय, याजवरच त्याची खरी योग्यता अवलंबून असते, हें या सामाजिक कादंबरींत दाखविलें आहे.

हिरकणी—लें. जोशी वाय्. जी. पृ. १९६, प्र. जी. आर. साने, सं. साहित्यसेवक ग्रंथमाला; प्र. ठि. शुक्रवार पेठ पुणें शहर; प्र. ता. १५।३।१९२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १ ली. किं. १ रु. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती १०००. हिंदु विधवांची स्थिति किती केविलवाणी व असहाय असते हें या कादंबरींत दाखविलें आहे.

हरिविजयकथासार–पृ. २१६, ले. धावडे एच्. व्ही. प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. माधवबाग मुंबई, प्र. ता. २५।९।१९२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १२ वी, (सचित्र); किं. १ रु. प्रती ४००. मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, ठाकुरद्वार, मुंबई.

हिऱ्यांचा हार–पृ. १५२, प्र. जी. एम्. वीरकर (गणेश महादेव कंपनी, ६२१ गिरगांव रोड, मुंबई करितां), प्र. ता. १४।१।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथम आवृत्ति, किं. ४ आणे. मु. जी. एम्. वीरकर, साहित्यसेवक प्रेस, सँढर्स्ट रोड मुंबई. प्रती ४०००. गुप्त पोलिसांच्या चातुर्याची ही एक गोष्ट आहे.

इतिहास व राजकारण.

गझनीच्या महमुदाच्या स्वाऱ्या:—ले. वैद्य सी. व्ही. पृ. २१७, प्र. लेखक; प्र. ठि. सदाशिव पेठ पुणें, प्र. ता. १ आक्टोबर १९२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवात्ति १ ली; किं. १ रु. मु. गोखले जी. के. श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, पुणें शहर. प्रती ५००.

पेशव्यांची बखर--पृ. २२७, प्र. रा. ब. काशिनाथ नारायण साने, प्र. ठि. कल्याण, प्र. ता. ५।६।१९२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति ५ वी, किं. दाखल नाहीं. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. प्रती २०००;

मराठी रियासत, मध्य विभाग' ४—ले. सरदेसाई जी. एस्. पृ. ४०८, प्र. जी. एम्. वीरकर, प्रोप्रायटर गणेश महादेव अँड को. प्र. ठि. ६२१ गिरगांव मुंबई, प्र. ता. ३ सप्टेंबर १९२५, साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ३ रु. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती २०००;

राजधानी सातारा—ले. कुंभारे व्ही. एन्. पृ. ८८, प्र. ले. प्र. ठि. मारवाडआळी सातारा. प्र. ता. २१।६।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथम आवृत्ति, किं. १० आणे, मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, शनिवार पेठ पुणें शहर. प्रती १०००; यांत सातारा शहराचा इतिहास व त्याचें वर्णन दिलेलें आहे.

शिवाजी आणि चंद्रराव मोरे—ले. वैद्य सी. व्ही. पृ. ३४, प्र. सी. जी. कोल्हटकर, प्र. ठि. ४९५ शनिवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. १।९।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथम आवृत्ति किं. ४ आणे, मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती १०००;

सातान्याचें दैव का दैवाचा सातारा ?—ले. ठाकरे के. एस्. पृ. ४८, प्र. ठाकरे, के. एस्. प्र. ठि. ३४५ सदाशिव पेठ, पुणें शहर. प्र. ता. ४।९।१९२५, साईझ फूलस्कॅप, आवृत्ति १ ली (सचित्र), किं. २ आणे, प्रती ५०००; मु. के. एस्. ठाकरे, प्रबोधन प्रेस, ३४५ सदाशिव पेठ, पुणें शहर. छत्रपतींची साताऱ्याची गादी घालविण्यास ब्राह्मण मुत्सद्दी कारणीभूत कसे झाले हें यांत दाखविलें आहे.

राजकारण.

आजच्या स्वराज्यसंस्था—ले. के. व्ही. वझे, पृ. ६८, प्र. लेखक. प्र. ठि. नाशिक, प्र. ता. १५।११।१९२४, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ली, किं. ६ आणे, मु. के. आर. गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, ५०७ शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती १०००.

भावी हिंदी स्वराज्य—ले. के. व्ही. वझे, पृ. ३२५; प्र. लेखक. प्र, ठि. नाशिक, प्र. ता. १३।१०।२५; साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. १।८ रु. मु. के. आर. गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, ५०७ शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती १०००; हिंदुस्थानची खरी उन्नति होण्याकरितां ग्रामसंस्था कशी सुधारावी; जिल्हा बोर्डें, प्रांतिक कौन्सिलें यांनीं उद्योगधंदे, शिक्षण, वगैरे गोष्टींना कसें उत्तेजन द्यावें, व त्यांनीं कसें वागावें, याबद्दलचे आपले विचार लेखकानें दिले आहेत.

महायुद्ध आणि स्वराज्य—ले. नामजोशी एम्. एस्. पृ. १७६, प्र. लेखक. प्र. ठि. रत्नागिरी, प्र. साल १९२४ डिसेंबर, साईझ रॉयल १६ पेजी. आवृत्ति १ ली. किं. १ रु. मु. जी. व्ही. पटवर्धन, बलवंत प्रेस, रत्नागिरी. प्रती १०००.

हिंदी राजकारणाचें स्वरूप—ले. जावडेकर, एस्. डी. प्र. ले. प्र. ठि. इस्लामपूर, जिल्हा सातारा, प्र. ता. २३।१२।१९२४; साईझ क्राऊन १६

पेजी, किं. ८ आणे, मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणें. प्रती १०००.

धर्म.

—०—

अज्ञानासी ज्ञान—पृ. १८४; प्र. ए. बी. वानखडे, व एल्. आर्. सखारामजी देशमुख, प्र. ठि. सावूर (उमरावती), प्र. ता. १५।१।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथम आवृत्ति, किं. दाखल नाहीं. मु. एम्. एन्. कुलकर्णी, कर्नाटक प्रेस, ३१८ ए. ठाकूरद्वार मुंबई, प्रती १०००. आनंद-संप्रदायी जनांकरितां हें पुस्तक लिहिलें आहे. बाल भिकारी गीरगुरु रेवागिरी संन्यासी यांनी अनेक हस्तलिखित प्रतींवरून ही माहिती गोळा केली आहे.

आनंदमार्गीय गुरुकिल्ली-सूचक प्रश्नोत्तरावलि—ल. गोडबोले आर. डी. पृ. १५५, प्र. जी. डी. मुंडवाईक साहू; प्र. ता. २५।११।१९२४; साईझ फूलसकॅप १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ६ आणे (सचित्र), मु. एस्. एन्. जोशी, चित्रशाला प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर, प्रती १०००. आनंदमार्ग या सांप्रदायाचें ज्ञान होण्याकरितां प्रश्नोत्तररूपानें यांत माहिती दिली आहे.

उपदेशकास सूचना—पृ. ६९, प्र. रेव्ह. एन्. मॅकनिकल, प्र. ठि. १ स्टॅव्हली रोड पुणें, प्र. ता. १७।९।१९२५; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ६ आणे, प्रती १०००; मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्य-भूषण प्रेस, बुधवार पेठ, पुणें शहर.

एकनाथी भागवत—पृ. ९०४, प्र. पांडुरंग जावजी, प्र. ठि. कोलभाट लेन मुंबई, प्र. ता. २३।४।२५, शके १८४७; साईझ सुपर रॉयल ८ पेजी, आवृत्ति ३ री (सचित्र), किं. ६ रु. मु. आर. वाय्. शेडगे, निर्णय-

सागर प्रेस, २६।२८ कोलभाट लेन मुंबई नंबर २. एकनाथाचें भागवत मूळ ग्रंथ व स्पष्टीकरणार्थ पांगारकरांनीं दिलेल्या टीपा यांत दिल्या आहेत.

केवळ हिंदुधर्मासाठीं–पृ. २००, प्र. आर. एस्. भागवत, सेक्रेटरी मराठी थिऑसफिकल फेडरेशन, प्र. ठि. शनिवार पेठ, पुणें शहर; प्र. ता. ३।५।१९२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं.१०४ रु. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ, पुणें शहर; प्रती १०००. ॲनी बेझंट यांच्या In defence of Hinduism या पुस्तकाचें हें भाषांतर आहे. याला बाईचें चरित्र जोडलें आहे.

कैवल्यबोध–पृ. ७४, प्र. आर. एच्. पोतनीस, प्र. ठि. सांगली, प्र. ता. २०।८।१९२५; साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १ रु. प्रती १०००. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. श्रीसद्गुरु नारायण भाऊसाहेबमहाराज यांचा मोक्षप्राप्तीबद्दलचा उपदेश यांत दिला आहे.

खिस्तसंदेश–पृ. १२, भाषांतरकार डी. ए. पालेकर, प्र. भाषांतरकार, प्र. ठि. सातारा, प्र. ता. नोव्हेंबर १९२५, साईझ फूलस्कॅप, पहिली आवृत्ति, किं. ६ पै. मु. व्ही. आर. ढवळे, न्यायाधीश प्रेस, सातारा, प्रती ५०००.

खिस्ती महामंडळ व नवा करार–पृ. ६३, प्र. डी. एस्. सावरकर, प्र. ठि. पुणें, प्र. ता. ५।१।२५; साईझ फूलस्कॅप १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे, मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें; प्रती ५००. चर्च ऑफ स्कॉटलंड या धर्मसंस्थेनें भरविलेल्या परिषदेचे शेवटीं डॉ. मिचिगन यांनीं दिलेल्या व्याख्यानाचें हें भाषांतर आहे.

चित्ररामायण–ले. बाळासाहेब पंतप्रतिनिधि, पृ. १६०, प्र. बी. एस्. पंडित ऊर्फ बाळासाहेब पंतप्रतिनिधि, औंधकर; प्र. ठि. औंध, जि. सातारा; प्र. ता. १०।४।२५; साईझ रॉयल ८ पेजी, दुसरी आवृत्ति (सचित्र),

किं. ६ रु. मु. डी. व्ही. पंडित बालोद्यान प्रेस, सदाशिव पेठ, पुणें शहर. प्रती २०००. यांत रामायणांतील निरनिराळ्या प्रसंगांचीं सुंदर चित्रें व त्या प्रसंगांचें वर्णन दिलेलें आहे.

देवप्राप्ति करून घेणें—ले. रेव्ह० आर. ए. ह्यूम, पृ. ३२; प्र. रेव्हरंड एन्. मॅकनिकल, प्र. ठि. स्टॅव्हली रोड, पुणें; प्र. ता. १६।४।१९२५; साईझ रॉयल ३२ पेजी, आवृत्ति २ री, किं. ६ पै. प्रती २०००. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, बुधवार पेठ, पुणें शहर. ईश्वरप्राप्तीकरितां येशु ख्रिस्ताचा उपदेश ग्रहण करणें किती आवश्यक आहे हें यांत दाखविलें आहे.

धर्मजिज्ञासा—ले. घारवलकर एच्. एन्. पृ. २४; प्र. लेखक; प्र. ठि. आनंदतीर्थ कार्यालय, ब्रह्मपूर, गुलबुर्गा. प्र. ता. ३०।६।२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली, किं. ०२०६ आणे. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान् प्रेस, ३०० सदाशिव पेठ पुणें शहर; प्रती १०००. धर्माच्या निरनिराळ्या अंगांचा यांत विचार केला आहे.

धर्माचे मूल सिद्धांत—पृ. ८९; प्र. आर. एस्. भागवत, चिटणीस मराठी थिऑसाफिकल फेडरेशन. प्र. ठि. ३२१ शनिवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. २४।७।२५, साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति २ री, किं. ८५ आणे. मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, १२१ शनवार पेठ, पुणे शहर. प्रती १०००. मुंबई येथील थिऑसाफिकल सोसायटीची परिषद भरली होती त्या वेळीं ॲनि बेझंट यांनीं दिलेल्या चार व्याख्यानांपैकीं एका व्याख्यानाचें हें भाषांतर आहे.

नव्या करारांतील पुस्तकांची प्रवेशिका—ले. रेव्हरंड जी. पी. टायलर, पृ. ३५६, प्र. रेव्हरंड मॅकनिकल, प्र. ठि. १ स्टॅव्हली रोड, पुणें. प्र. ता. १३।७।२५, साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. २ रु. मु. ए. व्ही. पवटर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. प्रती १०००.

पवनविजय—पृ. ३९, प्र. के. व्ही. पुरंदरे; प्र. ठि. माधवबाग मुंबई; प्र. ता. १७।११।२५; साईझ रॉयल १६ पेजी; आवृत्ति ३ री, किं. ०४ आणे. मु. के. व्ही. सिनकर, पुरंदरे प्रिंटिंग प्रेस, ७३ मुगभाट क्रॉस लेन, मुंबई. प्रती २०००. शंकरांनीं पार्वतीला दिलेली योगशास्त्राची माहिती यांत दिली आहे.

भागवतधर्ममाला—पृ. ४०, संपादक व प्रकाशक एम्. के. देशपांडे; प्र. ठि. निगडी (सातारा); प्र. ता. १७।२।२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति; पहिली, किं ०१ आणा. मु. व्ही. एस् वैद्य, आनंद प्रेस, सातारा. प्रती २५०. भागवताच्या एकादश स्कंधाच्या दुसऱ्या अध्यायाचें हें भाषांतर आहे.

भागवतधर्ममाला, पुष्प १ लें, वर्ष १ लें.—पृ. ३६, प्र. एन्. के. देशपांडे; प्र. ठि. निगडी (सातारा), पोष्ट रहिमतपूर; प्र. ता. २५ आक्टोबर १९२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली, किं ०१ आणा. मु. पी. बी. कोल्हापुरे, सुमंत प्रेस, कऱ्हाड. प्रती २०००. श्रीमद्भागवताच्या एकादशस्कंधाच्या दुसऱ्या अध्यायाचें हें भाषांतर आहे.

भारती सचित्र बालबोध, भाग २ रा.—पृ. ११२, प्र. नाना आर. नाग; प्र. ठि. लोणंद, जिल्हा सातारा; प्र. ता. १५।२।१९२५; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र), किं. ८ आणे, प्रती २०००; मु. आर. वाय्. शेडगे, निर्णयसागर प्रेस, २६-२८ कोलभाट लेन, मुंबई. जैन धर्माची माहिती सोप्या भाषेंत व थोडक्यांत करून देण्याकरितां हें पुस्तक लिहिलें आहे.

मनाच्या शंका—ले. मराठे, जी. एस्. पृ. ८, प्र. लेखक; प्र. ठि. पुणें, प्र. ता. १०।८।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली. किं. १ आणा. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस; पुणें शहर. प्रती २०००; थिऑसॉ-

फिकल सोसायटीचे उद्देश यांत सांगितले आहेत.

मार्ककृत शुभ वर्तमान--पृ. ४५, प्र. ब्रिटिश व फॉरेन बायबल सोसायटी, बॅांबे ऑक्झिलरी, प्र. ठि. फोर्ट, मुंबई; प्र. ता. २३।९।२५; साईझ फूल्सकॅप ८ पेजी, पुनरावृत्ति, किं. ६ पै; मु. एम. एन्. कुलकर्णी, कर्नाटक प्रिंटिंग प्रेस, मुंबई; प्रती ३००००.

मंगलमूर्ति मोरया–ले. करंदीकर के. व्ही. पृ. १४, प्र. लेखक, प्र. ठि. सोलापूर, प्र. ता. २।९।२५, साईझ फूल्सकॅप १६ पेजी, प्रथमावृत्ति, किं. २ आणे, मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर. प्रती ५००. श्रीगजाननाची पूजा कशी करावी हें यांत सांगितलें आहे.

शब्बाथ शाळेचे धडे, जुन्या कराराचा अभ्यास–भाषांतरकार एस्. के. मार्टिन; पृ. ६४, प्र. डब्ल्यू. ए. स्कॉट, प्र. ठि. पुणें, प्र. ता. १९।१२।२४, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ५ आणे. मु. डब्ल्यू. ए स्कॉट, ओरिएंटल वाचमन पब्लिशिंग असोसिएशन, साल्सबरी पार्क, पुणें. प्रती ५००.

शांतिनिकेतनमाला-धर्म-भाग ५ वा—पृ. १७६, प्र. नारायण बळवंत चव्हाण; प्र. ठि. शनिवार पेठ पुणें शहर, प्र. ता. ३०।७।१९२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १ रु. प्रती १०००. मु. एन्. बी. चव्हाण, हरिहर प्रेस, पुणें शहर. रवींद्रनाथ टागोर यांचें चरित्र व त्यांचे विचार महाराष्ट्रवाचकांना कळण्याकरितां ही माला सुरू केली आहे.

श्रीकृष्णबोध–पृ. ६४. प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. माधवबाग मुंबई नं. ४. प्र. ता. १०।७।१९२५. साईझ रॉयल १६ पेजी; आवृत्ति १२ वी. किं. ०६ आणे; प्रती ४०००. मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, ३ ठाकुरद्वार मुंबई. प्रत्येक मनुष्यानें जगांत कसें वागावें याजबद्दल श्रीकृष्णानें अर्जुनास केलेला बोध यांत दिला आहे.

श्रीरामचारित्ररहस्य–ले. कामत आर. के. पृ. १६; प्र. दिगंबरदास. प्र. ठि. श्रीदुर्गादत्तमंदिर, माशेल, गोवा (पोर्तुगीज इंडिया); साईझ क्राऊन १६ पेंजी, आवृत्ति १ ली. किं १ आणा. मु. ए. सी. भट, यशवंत प्रेस, पुणें शहर. रामचरित्राचें रहस्य यांत सांगितलें आहे.

श्रीसद्गुरुस्तुति व भागवतधर्मआचार—पृ. १२, प्र. टी. आर. विंगळे, प्र. ठि. नंदुरबार, जि. पश्चिम खानदेश; प्र. ता. २४।१२।१९२४, साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति १ ली, प्रती १०००. मु. व्ही. जी. जावडेकर, आत्माराम प्रेस, धुळें; सद्गुरु खंडोजीमहाराज यांचीं स्तुतिपर पद्यें या पुस्तकांत दिलीं आहेत; आणि भागवतधर्माच्या आज्ञेप्रमाणें मनुष्यानें आचार कसा करावा हें यांत सांगितलें आहे.

श्रीहरनाथ ठाकूर यांची अपूर्व पत्रावलि, खंड २–पृ. ११६, प्र. जगमोहनदास कल्याणदास, प्र. ठि. वांद्रा, जि. ठाणें; प्र. ता. ५।९।१९२५, साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. दाखल नाहीं, प्रती १०००. मु. जी. बी. जोशी, आनंद प्रेस, सदाशिव पेठ, पुणें शहर. एका प्रसिद्ध बंगाली साधूच्या पत्रांचें हें मराठी भाषांतर रा. वासुदेवराव आपटे यांनीं केलें आहे. यांत धर्म व तत्त्वज्ञान यांचें विवरण आहे.

श्रीक्षेत्र कुकुरमुंडें येथील सनातनी पूज्यपाद पंडितांचीं व्याख्यानें–पृ. ३०; प्र. ओ. के. चौधरी, प्र. ठि. भालोद, जि. पश्चिम खानदेश; प्र. ता. १५।६।१९२५; साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे, प्रती १०००. मु. व्ही. जी. जावडेकर, आत्माराम प्रेस, धुळें.

सनातन–धर्मप्रवेश–भाषांतरकार के. एस्. देसाई (मालवण), पृ. २०७, प्र. आर. एस्. भागवत, प्र. ठि. ३२१ शनिवार पेठ, पुणें शहर, प्र. ता. ३१।१।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति २ री, किं. १॥८ रु. कापडी, १ रु. अर्धकापडी, मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७०

शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती २०००. बनारस येथील सेंट्रल हिंदु कॉलेजच्या बोर्ड ऑफ ट्रस्टीजनीं इंग्रजींत प्रसिद्ध केलेल्या ' सनातन धर्म ' (An elementary text book of religion and ethics) या पुस्तकाचें हें भाषांतर आहे. या पुस्तकास डेक्कन व्हर्न्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीनें बक्षीस दिलें आहे.

सार्वदेशिय पवित्र शास्त्रवाचनसंघाचे शब्बाथ शाळेचे धडे व रोजची शास्त्रवाचनपाठमाला १९२५—पृ. ३०, प्र. टी. व्ही. वीरकर, प्र. ठि. भायखळा मुंबई, प्र. ता. २३।१२।२४, साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १ आणा, मु. वाय्. के. पडवळ, तत्त्वविवेचक प्रेस, ३५४४ परेळ रोड, भायखळा मुंबई. प्रती दाखल नाहींत.

हिंदुस्थानांतील तरुण पिढी व उपनिषदें—पृ. १८, प्र. आर. एस्. भागवत, सेक्रेटरी मराठी थिऑसाफिकल फेडरेशन, प्र. ठि. शनिवार पेठ, पुणें शहर; प्र. ता. १५।३।१९२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. दाखल नाहीं. प्रती १०००. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर; मिसेस ॲनि बेझंट यांनीं मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुढें दिलेल्या भाषणाचें हें भाषांतर आहे.

हिंदु-धर्मशिक्षण, पुस्तक १ लें—ले. दिवेकर महादेवशास्त्री, पृ. ११२, प्र. डी. आर. घारपुरे, प्र. ठि. टिळक महाराष्ट्र विद्यालय, पुणें शहर, प्र. ता. २५।७।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, प्रथम आवृत्ति, किं. ६ आणे, मु. जी. बी. जोशी, आनंद प्रेस, सदाशिव पेठ, पुणें शहर; प्रती २०००. मुलांना हिंदु धर्माचें ज्ञान व्हावें या हेतूनें हें पुस्तक लिहिलें आहे. यांत हिंदु धर्माचीं मुख्य तत्वें व आचार यांची माहिती दिली आहे.

वैद्यक व आरोग्य.

अमृतपान (उषःपान)—ले. परांजपे जी. पी. पृ. ३६; प्र. लेखक. प्र. ठि. सांगली, प्र. ता. १५।८।१९२४; साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. ३ आणे. प्रती १०००. मु. जी. बी. जोशी, आनंद प्रेस, ३३० सदाशिव पेठ पुणें शहर. प्रातःकाळीं उषःपान केल्यानें आरोग्यदृष्ट्या कोणते फायदे होतात याचें यांत विवेचन केलें आहे.

आयुर्वेदांतील मूलतत्त्वें अथवा त्रिदोष—ले. पुरुषोत्तमशास्त्री हिर्लेकर, पृ. २०१, प्र. वाय्. जी. दीक्षित; प्र. ठि. बुधवार पेठ, पुणें शहर; प्र. ता. १५।१०।१९२५; साईझ रॉयल १२ पेजी; आवृत्ति १ ली; किं. १।८ रु. प्रती २०००. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ पुणें शहर. आयुर्वेदाप्रमाणें रोग, त्यांचीं कारणें, चिकित्सा व औषधें यांत दिलीं आहेत.

गरोदर स्त्रियांस उपयुक्त सूचना--ले. केळकर डी. व्ही. पृ. २६; प्र. डी. आर. चितळे, प्र. ठि. भवानी पेठ, सातारा शहर; प्र. ता. १६।३।२५; साईझ फूलसकॅप ८ पेजी; आवृत्ति १ ली, किं. १ आणा. प्रती १०००. मु. डी. आर. चितळे, शुभसूचक प्रेस, भवानी पेठ, सातारा शहर.

चिकित्साप्रभाकर, प्रकरण ३२ वें, ज्वर—ले. ओगले पी. बी. पृ. ७९; प्र. लेखक. प्र. ठि. ओगलेवाडी, औंध स्टेट; प्र. ता. १५।८।१९२५; साईझ रॉयल अष्टपत्री, आवृत्ति १ ली; किं. १२ आणे; प्रती २०००. मु. बी. एन्. कुलकर्णी, श्रीभुवनेश्वरी प्रेस, कऱ्हाड; आयुर्वेदपद्धतीनें वैद्यशास्त्रावर लिहिलेल्या एका मोठ्या ग्रंथाचा सदर पुस्तक हा एक भाग आहे. यांत सर्व प्रकारच्या तापांचा विचार केला आहे.

ताक व आरोग्य—ले. परांजपे जी. पी. प्र. लेखक. पृ. ३६; प्र. ठि. सांगली,

प्र. ता. २०।२।१९२५; साईझ क्राऊन; आवृत्ति ३ री, किं. ३ आणे. प्रती १०००. मु. जी. बी. जोशी, आनंद प्रेस, पुणें शहर. ताक पिण्यानें आरोग्य कसें सुधारतें हें यांत सांगितलेलें आहे.

दूध हें पृथ्वीवरील अमृत होय—ले. कोगेकर व्ही. के. पृ. ४९; प्र. लेखक; प्र. ठि. ६१६ सदाशिव पेठ, पुणें शहर; प्र. ता. २७।१२।२४; साईझ क्राऊन ८ पेजी; आवृत्ति १ ली, किं. ५ आणे. प्रती १०००. मु. व्ही. एन्. दाते, हिंदसेवक प्रेस, ५८२ शनिवार पेठ पुणें शहर.

मज्जातंतूंची दुर्बलता—ले. परांजपे जी. पी. पृ. ५६; प्र. लेखक; प्र. ठि. सांगली. प्र. ता. २०।२।१९२५; साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली (सचित्र), किं. ६ आणे, प्रती १०००. मु. जी. बी. जोशी, आनंद प्रेस, ३३० सदाशिव पेठ पुणें शहर. मज्जातंतूला दुर्बलता कोणत्या कारणानें येते व ती दूर कशी करावी याचें विवेचन यांत केलें आहे.

मनोवांच्छित संतति—ले. स्वामी शिवानंद, पृ. ३१४; प्र. आबासाहेब आगडकर. प्र. ठि. श्री जुम्मादादा व्यायाममंदिर, बडोदें. प्र. ता. २५।११।१९२४. साईझ क्राऊन १६ पेजी. आवृत्ति १ ली (सचित्र), किं. २ रु. प्रती ५०००. मु. एस्. एन्. जोशी, चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ पुणें, शहर.

मेस्मेरिझम—ले. भागवत आर. एस्. पृ. १७६, प्र. लेखक; प्र. ठि. पुणें शहर. प्र. ता. १५।७।१९२४; साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १॥८ रु. कापडी; १॥४ रु. कागदी. प्रती १०००. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर.

लिंबूचिकित्सा—ले. देशपांडे डी. एन्. पृ. २०; प्र. लेखक; प्र. ठि. पंढरपूर. प्र. ता. २६।१२।१९२४. साईझ क्राऊन ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे. प्रती १०००. मु. व्ही. एन्. दाते, हिंदसेवक प्रेस, ५८२

शनिवार पेठ, पुणें शहर. लिंबाचे औषधदृष्ट्या कोणते गुण आहेत याचें विवेचन यांत केलें आहे.

संततिनियमन—ले. प्रो. एन्. एस्. फडके. पृ. ११२ प्र. ए. एस्. गोखले; प्र. ठि. १७ नारायण पेठ, पुणें. प्र. ता. ३०।८।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र), किं. १ रु. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, शनिवार पेठ, पुणें. प्रती २०००.

संततिनियमन—ले. कर्वे आर. डी. पृ. १२८; प्र. लेखक; प्र. ठि. मुंबई. प्र. ता. १३।६।१९२५; साईझ डेमी १६ पेजी. आवृत्ति २ री; (सचित्र), किं. १२ आणे, प्रती १०००. मु. सी. एस्. देवळे, मुंबई-वैभव प्रेस, मुंबई. कृत्रिम उपायांनीं संतति कशी थांबवावी हें या दोन्ही पुस्तकांत दाखविलें आहे.

कायदा.

वतनदारांचा ॲक्ट—ले. राजमाचीकर एन्. टी. पृ. १२०; प्र. लेखक, प्र. ठि. ५०४ शनिवार पेठ; पुणें शहर; प्र. ता. १०।११।१९२४ व २०।१२।२४. साईझ रॉयल ८ पेजी. आवृत्ति ९ वी. किं. २ रु. प्रती १०००. मु. एन्. टी. राजमाचीकर, न्यायाश्रय प्रेस, पुणें शहर.

वारसा सर्टिफिकेट, प्रोबेट, हिंदूंचे मृत्युपत्राबाबद व हिंदूंनीं मिळकतींची व्यवस्था करण्याबाबत ॲक्ट—ले. एन्. टी. राजमाचीकर; पृ. १५८; प्र. भाषांतरकार. प्र. ठि. पुणें शहर. प्र. ता. ३१।३।१९२५. साईझ रॉयल ८ पेजी. आवृत्ति २ री, किं. २ रु. प्रती ५०० मु. एन्. टी. राजमाचीकर, न्यायाश्रय प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर.

सटीक पोलिसांबाबद पांच ॲक्ट आणि गुरांच्यां अतिक्रमणाबाबद व जुगाराबाबद ॲक्ट–ले. एन्. टी. राजमाचीकर; पृ. १४३; प्र. एन्. टी. राजमाचीकर; प्र. ठि. शनिवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. २५।१२।१९२४; साईझ रॉयल ८ पेजी; आवृत्ति ३ री, किं. २८८ रु. प्रती १०००. मु. एन्. टी. राजमाचीकर, न्यायाश्रय प्रेस, ५०४ शनिवार पेठ, पुणें शहर.

हिंदुस्थानच्या पुराव्याचा ॲक्ट–ले. राजमाचीकर एन्. टी. पृ. २५७; प्र. लेखक. प्र. ठि. ५०४ शनिवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. २५।५।२५. साईझ रॉयल ८ पेजी. आवृत्ति १० वी; किं. ३ रु. प्रती ५००. मु. एन्. टी. राजमाचीकर, न्यायाश्रय प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर.

ज्योतिषशास्त्र.

करणकल्पलता—ले. दप्तरी के. एल्. पृ. ३२०, प्र. एन्. सी. केळकर, व्हाईस प्रेसिडेंट, पंचांगप्रवर्तन कमेटी, प्र. ठि. पुणें, प्र. ता. १०।१।२५, साईझ रॉयल ८ पेजी, प्रथम आवृत्ति, किं. ५ रु. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, ४९५।४९६ शनिवार पेठ पुणें. प्रती १०००.

जातकमार्गोपदेशिका, खंड १ ला—ले. प्रधान वाय. के. पृ. २७९, प्र. लेखक, प्र. ठि. दादर मुंबई. प्र. ता. १५।८।२५, साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. २॥ रु. मु. के. आर. गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर. प्रती १५००.

ज्योतिषसंग्रह—पृ. ७२, प्र. के. व्ही. पुरंदरे, प्र. ठि. माधवबाग मुंबई, प्र. ता. १७।३।२५, साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति ९ वी, किं. १२ आणे, मु. पी. जे. पाठक, पुरंदरे पाठक प्रिंटिंग प्रेस, ३ ठाकुरद्वार मुंबई. प्रती ४०००.

ज्योतिषशास्त्राचा ओनामा—ले. बाळ महाजन पी. जी., पृ. २०४, प्र. लेखक, प्र. ठि. लाडघर, तालुके दापोली, जिल्हा रत्नागिरी, साईझ क्रौन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १॥ रु. (सचित्र); मु. एस्. व्ही. कामत व सी. एस्. देवळे, कामत प्रिंटिंग प्रेस, परेख स्ट्रीट मुंबई नं. ४; व मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड मुंबई. प्रती १०००.

परिभ्रमणपद्धति—ले. रामनारायण, पृ. ६८, प्र. वाय्. बी. गुप्ते, प्र. ठि. ६८, लेडी जेमशेटजी रोड मुंबई नं. १४; प्र. ता. १५।२।२५, साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. १० आणे, मु. बी. आर. कद्रेकर, रवींद्र प्रिंटिंग वर्क्स, आंबेवाडी, गिरगांव, मुंबई प्रती १५००.

वर्षभविष्य शके १८४७—ले. पटवर्धन पंडित रघुनाथशास्त्री, पृ. १९२, प्र. लेखक, प्र. ठि. ज्योतिर्भूषण कचेरी, बुधवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. २६।१२।२४, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ११ रु. मु. एल्. बी. कोकाटे व डी. जी. खांडेकर; हनुमान प्रेस व लॉ प्रिंटिंग प्रेस, पुणें. प्रती ६०००.

वर्षप्रबोध सन १९२५—ले. रामनारायण, पृ. ५५, प्र. वाय. बी. गुप्ते, प्र. ठि. ६८, लेडी जेमशेटजी रोड मुंबई नं. १४; प्र. ता. २५।१।२५ साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. ८ आणे. मु. बी. आर. कद्रेकर, रवींद्र प्रिंटिंग वर्क्स, आंबेवाडी, गिरगांव, मुंबई. प्रती २०००.

शकुनवंती—प्र. डी. ए. सावंत, पृ. ४०, प्र. ठि. बेळगांव, प्र. ता. २०।४।२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति ४ थी, किं. २ आणे, प्रती २०००. मु. डी. ए. सावंत, श्रीरामतत्त्वप्रकाश प्रेस, बेळगांव. नेपोलियनच्या शकुनावरील पुस्तकाचें हें भाषांतर आहे.

———

कोश.

—:०:—

महाराष्ट्रीय ज्ञानकोश, शरीरखंड, विभाग १० वा.—पृ. ४४४, प्र. एस्. व्ही. केतकर, महाराष्ट्र ज्ञानकोशमंडळाकरितां. प्र. ठि. ८४१ सदाशिव पेठ, पुणें शहर. प्र. ता. १०।११।१९२४; साईझ सुपर रॉयल ८ पेजी, आवृत्ति १ली (सचित्र), किं. १५ रु. प्रती ३०००. मु. एस्. व्ही. केतकर, ज्ञानकोश प्रेस, ८४१ सदाशिव पेठ, पुणें शहर. (क–काव्य):– यांत खालील लेख प्रामुख्यानें आले आहेत:—कलियुग, कच, कदंब आणि कादंब, करणवाघेला, कान्होजी आंग्रे, कॉर्नवालीस, कान्यकुब्ज ब्राह्मण-कायस्थ, कादंबरी, कान्हो, कानाचे रोग, कावीळ, कंकोळ, कालीफ्लावर, कर्व, कर्ममार्ग, कल्पनासाहचर्य, कान्ट, करणप्रकाश, कबीरपंथी, कामगार हितवर्धक सभा, कामशास्त्र, कर, कंपनी, करार, कायदा, कालवे, कवचधर-वर्ग, कॅक्स्टन, कांतकाम इ. इ.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश, शरीरखंड, विभाग ११ वा—पृ. ४६०, प्र. एस्. व्ही. केतकर, महाराष्ट्र ज्ञानकोशमंडळाकरितां. प्र. ठि. ८४१ सदाशिव पेठ, पुणें शहर. प्र. ता. १५।२।१९२५; साईझ सु. रा. ८ पे. आवृत्ति १ ली (सचित्र), किं. १५ रु. प्रती ३०००; मु. एस्. व्ही. केतकर, ज्ञानकोश प्रेस, ८४१ सदाशिव पेठ, पुणें शहर. (काव्य–केटा)—यांतील महत्वाचे लेखः— कुरु, कूर्मपुराण, कीटक, कृष्णाकुमारी, कुत्बशाही, काशीराज पंडित, कृष्णाजी कंक, क्लाइव्ह, काश्मिरी ब्राह्मण, कासार, कुणबी, कुमारिल भट्ट, काश्मिरी भाषा, कैलास, काळा आजार, कोरफड, कृषिकर्म, क्लोरोफॉर्म, क्रियावाद, कुंकू, कोंबड्या, कोळसा, कुळकर्णी, कोर्ट, किंडर गार्टन, इ. इ.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश, शरीरखंड, विभाग १२ वा—पृ. ४५०, प्र.

एस्. व्ही. केतकर, महाराष्ट्र ज्ञानकोशमंडळाकरितां; प्र. ठि. ८४१ सदाशिव पेठ, पुणें. प्र. ता. १५।२।१९२५; साईझ सु. रा. ८ पे. आवृत्ति १ ली (सचित्र); किं. १५ रु. प्रती ३०००. मु. एस्. व्ही. केतकर, ज्ञानकोश प्रेस, ८४१ सदाशिव पेठ, पुणें शहर; (खतें–खैरत्य) महत्वाचे लेखः— खांडववन, खालसा, खानझादा, खरोष्ट्र, खतें, खार पाडणें; खोत, खानेसुमारी, खलीफ, येशू ख्रिस्त, (ग–ग्वेर्नसे) गोगलगाय, गर्भधारण, गर्भविज्ञान, गुल्म, ग्रंथिरोग, गोरखचिंच, गंधक, गुरुत्वाकर्षण, गुलामगिरी, गणसत्ताक राज्यपद्धति इ. इ.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश, शरीरखंड, विभाग १३ वा—पृ. ४५०, प्र. एस्. व्ही. केतकर, महाराष्ट्र ज्ञानकोशमंडळाकरितां; प्र. ठि. पुणें शहर, प्र. ता. १।५।१९२५; साईझ सु. रा. ८ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र); किं. १५ रु. प्रती ३०००. मु. एस्. व्ही. केतकर, ज्ञानकोश प्रेस ८४१ सदाशिव पेठ पुणें शहर. महत्वाचे लेख– (घ–घोळ)घटोत्कच, घाशीराम, घायपात, घड्याळ, घटस्फोट. (च–च्यवन) चक्रवर्ति, चांदबिबी, चिमणाजी अप्पा, चिपळूणकर, चिदानंद स्वामी, चंदन, चलन, चुंबकत्व, चलचित्रें, चोरी. (छ–छोटी साद्री) छिंपा, छंदःशास्त्र, छायाचित्रपेटिका. (ज–जलपैगुरी) जटायू, जंगम, जपान, जंतुजन्य रोग, जमाबंदी, जड द्रव्य. इ. इ.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश, शरीरखंड, विभाग १४ वा—पृ. ४३९, प्र. एस्. व्ही. केतकर, महाराष्ट्र ज्ञानकोशमंडळाकरितां; प्र. ठि. ८४१ सदाशिव पेठ पुणें शहर, प्र. ता. २३।६।२५, साईझ सुपररॉयल ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १५ रु. प्रती ३०००. मु. एस्. व्ही. केतकर, ज्ञानकोश प्रेस, ८४१, सदाशिव पेठ पुणें शहर. (जलपैगुरी–ज्वालामुखी) महत्वाचे लेख–जाबाल, जहाज फिरंगी, जहागिरदारी, जोशी, जैनसंप्रदाय, जीवनकायविचार, जारकर्म, जिलेटिन. (झ–झोला) झामोरिन, झेन–उन्–निसाबेगम, झेपेलिन; (ट–ट्रेन) टागोर, टिळक, टिटागड, टक्का, ट्राम्वे;

(ठ–ठाणें) ठग, ठाकूर, (ड–तपून) डुप्ले, डफळे, डांग्या खोकला, ढोर, तपकीर इ. इ.

महाराष्ट्रीय ज्ञानकोश, शरीरखंड, विभाग १५ वा—पृ. ४५०, प्र. एस्. व्ही. केतकर, महाराष्ट्र ज्ञानकोशमंडळाकरितां, प्र. ठि. सदाशिव पेठ पुणें शहर; प्र. ता. ८ ऑगस्ट १९२५, साईझ सुपररॉयल ८ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र), किं. १५ रु. प्रती ३०००. मु. एस्. व्ही. केतकर, ज्ञानकोश प्रेस, सदाशिव पेठ, पुणें शहर. (तपून–घमन्या) महत्वाचे लेख–तैत्तिरीय शाखा, तोतया, तांबट, तोफखाना, त्वग्रोग, त्रेतायुग, तैलयंत्र, तर्कशास्त्र, थिऑसफी, दारूगोळा, दमा, देवी, दृष्टि, दुर्बीण, द्रवीभवन, दर्श, दिगंबरजैन, दूधदुभतें, दश, धनुर्वेद, धनुर्वात इ. इ.

धंदे व कला.

कलावैभव—ले. डी. जी. सडेकर, पृ. २४८, प्र. लेखक, प्र. ठि. खानापूर (बेळगांव), प्र. ता. १७।५।२५, साईझ डेमी, आवृत्ति ५ वी, किं. १ रु., प्रती २०००. मु. डी. जी. सडेकर, घनंजय प्रेस, खानापूर, बेळगांव, शेतीच्या व घरगुती धंद्यांसंबंधानें या पुस्तकांत माहिती दिली आहे.

धंदेशिक्षक, भाग दुसरा—ले. सरस्वतीनंदन, पृ. १५२, प्र. एन. बी. चव्हाण, प्र. ठि. शनिवार पेठ पुणें शहर; प्र. ता. १९।५।२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १ रु. प्रती १०००. मु. एन्. बी. चव्हाण, हरिहर प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर.

नूतन औद्योगिक निबंधमाला, पुष्प १ लें—ले. सहस्रबुद्धे जी. एन्. पृ. २४, प्र. लेखक, प्र. ठि. उमरावती (वऱ्हाड), प्र. ता. २।१।२५, साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे, प्रती १०००. मु.

एस्. एन्. जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

प्राचीन हिंदी शिल्पशास्त्रसार—ले. वझे के. व्ही., पृ. २१६, प्र. लेखक, प्र. ठि. नाशिक शहर, प्र. ता. २०।१२।१९२४, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति १ ली, सचित्र, किं. १॥ रु., प्रती १०००. मु. डी. एम्. चंद्रात्रे, लोकसत्ता प्रेस, नाशिक.

फलकृषिशास्त्र—ले. गर्गे एस्. वाय्., पृ. ९३, प्र. डी. जी. सडेकर, प्र. ठि. खानापूर, प्र. ता. १६ सप्टेंबर १९२५, साईझ डेमी ८ पेजी, प्रथमावृत्ति, किं. ६ आणे, प्रती २०००. मु. डी. जी. सडेकर, धनंजय प्रेस, खानापूर, जिल्हा बेळगांव. बागेची जोपासना कशी करावी याची माहिती यांत दिली आहे.

फोर्ड मोटार ड्रायव्हर—ले. आगरवाला एन्. के., पृ. २०, प्र. लेखक, प्र. ठि. अहमदनगर शहर, प्र. ता. १५।४।२५, साईझ फूलसकॅप १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १ रु. प्रती १०००. मु. जी. के. गोखले, श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्स, शनिवार पेठ, पुणें शहर.

मुलांसाठीं घरगुती धंदे—ले. परांजपे एस्. व्ही, पृ. ३८, प्र. डी. जी. सडेकर, प्र. ठि. खानापूर, प्र. ता. १६।९।२५, साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति २ री, किं. ३ आणे, प्रती १०००. मु. डी. जी. सडेकर, धनंजय प्रेस, खानापूर, जि. बेळगांव.

मुलांची औद्योगिक करमणूक—ले. वाडदेकर एन्. जी., पृ. ५६, प्र जी. बी. जोशी, प्र. ठि. सदाशिव पेठ पुणें, प्र. ता. १५।४।२५, साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे, प्रती ४५००. मु. जी. बी. जोशी, आनंद प्रेस, सदाशिव पेठ पुणें. लहान मुलांना सहज करतां येतील असे पदार्थ कसे करावे याचें विवेचन या पुस्तकांत केलें आहे. रा. वाडदेकर यांची भाषा व विवेचनपद्धति सोपी असते.

यांत्रिक धंदेशिक्षक—पृ. ४४, प्र. एम्. बी. खळदकर, सेक्रेटरी इंडियन फ्री इंडस्ट्रियल एज्युकेशन सोसायटी, प्र. ठि. खांडके बिल्डिंग, दादर मुंबई; प्र. ता. २८।८।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ६ आणे; प्रती १०००. मु. सी. एस्. देवळे, मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड, मुंबई.

विद्युत् स्वावलंबन—ले. दाते जी. के. पृ. ३४; प्र. लेखक. प्र. ठि. मालाड, बी. बॉ. व सी. आय्. रेल्वे, मुंबई; प्र. ता. २।८।२५; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र), किं. ६ आणे, मु. सी. एस्. देवळे, मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड, मुंबई. प्रती १०००.

साबण— पृ. ६०, ले. गर्गे एस्. वाय्. प्र. डी. जी. सडेकर, प्र. ठि. खानापूर, प्र. ता. १६ सप्टेंबर १९२५; साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति २ री, किं. ६ आणे, प्रती २०००. मु. डी. जी. सडेकर, घनंजय प्रेस, खानापूर, जिल्हा बेळगांव.

स्वतंत्र धंदेशिक्षण आणि यंत्रकलाविज्ञान—पृ. ३६, प्र. एम्. बी. खळदकर, सेक्रेटरी इंडियन फ्री इंडस्ट्रियल एज्युकेशन सोसायटी; प्र. ठि. खांडके बिल्डिंग, दादर मुंबई, प्र. ता. २८।८।१९२५, साईझ क्रौन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे, प्रती १०००. मु. सी. एस्. देवळे, मुंबईवैभव प्रेस, सँढर्स्ट रोड, मुंबई.

स्त्रियांसाठीं घरगुती धंदे—ले. परांजपे एस्. व्ही. पृ. ५०, प्र. डी. जी. सडेकर, प्र. ठि. खानापूर, प्र. ता. १६ सप्टेंबर १९२५, साईझ डेमी १२ पेजी, आवृत्ति २ री, किं. ४ आणे, प्रती १०००. मु. डी. जी. सडेकर, घनंजय प्रेस, खानापूर जि. बेळगांव.

संगीतशिक्षक, भाग १ ला—ले. गोखले जी. आर. पृ. ६२, प्र. लेखक, प्र. ता. १७।१२।१९२४; साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. १ रु.

प्रती १०००. मु. विष्णु दिगंबर पलूसकर, गांधर्वमहाविद्यालय छापखाना मुंबई.

संगीत कलादर्पण, भाग २ रा—ले. कुंदगोळकर उमामहेश्वर, पृ. १५४, प्र. लेखक. प्र. ठि. गायनसमाज बेळगांव, प्र. ता. १।१०।१९२५; साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति १ ली (सचित्र), किं. २॥ रु. प्रती २०००. मु. टी. वाय्. पाटील, श्रीशांतादुर्गाप्रकाश प्रेस, बेळगांव.

हिंदुस्थानी संगीत पद्धति, क्रमिक पुस्तकमालिका, पुस्तक पहिलें—ले. दत्तात्रेय केशव जोशी, पृ. ४७, प्र. बी. एस्. सुखटणकर, प्र. ठि. मुंबई, प्र. ता. २।९।१९२५, साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति ४ थी, किं. ८ आणे, प्रती ५०००. मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, पुणें शहर.

हार्मोनियमशिक्षक—ले. जोशी बी. एन्. पृ. १०, प्र. लेखक, प्र. ठि. कऱ्हाड, जि. सातारा, प्र. ता. १।५।२५, साईझ रॉयल १६ पेजी, आवृत्ति २ री, किं. दाखल नाहीं. प्रती १०००. मु. पी. बी. कोल्हापुरे, सुमंत प्रेस, कऱ्हाड.

हार्मोनियमप्रवेश—ले. दातार डी. जी. पृ. ११२, प्र. लेखक, प्र. ठि. शुक्रवार पेठ, पुणें शहर; प्र. ता. २५।३।१९२५, साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. १ रु. प्रती २०००. मु. एस्. एन्. जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

किरकोळ.

आमचें ओजस्वी वाङ्मय व त्यांतील दिव्य नवनीत—ले. नानासाहेब शावगी, पृ. ४० प्र. एस्. एम्. अभ्यंकर, सेक्रेटरी मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें; प्र. ठि. सदाशिव पेठ पुणें शहर. प्र. ता. १०।८।२५, साईझ डेमी १२

पेजी, आवृत्ति १ ली, किं. कांहीं नाहीं. प्रती २००. मु. टी. आर. 'वअट. इंदिरा प्रेस, सदाशिव पेठ पुणें शहर. ठाणें येथील मराठी ग्रंथसंग्रहालयाचे ३२ वे वार्षिक प्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें केलेलें भाषण यांत दिलें आहे.

आमच्या शिक्षणाचा प्रश्न—ले. लेले व्ही. आर. पृ. २५, प्र. लेले व्ही. आर. प्र. ठि. शनिवार पेठ पुणें शहर; प्र. ता. १५।९।२५; साईझ क्राऊन ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. दाखल नाहीं. प्रती ५०० मु. दाते व्ही. एन्. हिंदसेवक प्रेस, ५८२ शनिवार पेठ पुणें शहर. सध्यांच्या शिक्षण-पद्धतींतील दोष दाखविण्याचा प्रयत्न या पुस्तकांत केला आहे. विद्येचें महत्व, जन्मभाषेंतून शिक्षण व सर्वांगीण शिक्षणपद्धति असे ३ निबंध या पुस्तकांत आहेत.

आमचें सध्यांचें कर्तव्य—ले. भातखंडे जानकीबाई, पृ. २४. प्र. जानकीबाई भातखंडे; प्र. ठि. धारवाड; प्र. जानेवारी १९२५. साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. २ आणे, प्रती १०००. मु. डी. ए. सावंत, श्रीरामतत्वप्रकाश प्रेस, बेळगांव. स्वदेशी कापडाचें महत्व स्त्रियांचे मनावर बिंबावें व सूत काढणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे ही गोष्ट स्त्रियांचे मनांवर बिंबावी याकरितां हें पुस्तक लिहिलें आहे.

एका वेळूची कहाणी—ले. बी. ई. न्यू कोंब; पृ. १६; प्र. रेव्हरंड एन्. मॅक्निकल, मुंबई ट्रॅक्ट व बुकसोसायटीकरितां प्र. ठि. स्टेव्हली रोड पुणें. प्र. ता. २०।८।२५, साईझ रॉयल ३२ पेजी; आवृत्ति ३ री, किं. ३ पै. प्रती १००००; मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, बुधवार पेठ, पुणें शहर. न्यू कोंब साहेबांच्या इंग्लिश गोष्टीचें हें रूपांतर आहे. ही गोष्ट एक रूपक आहे.

१९२४ चा महाराष्ट्र—ले. साठे पी. बी. पृ. १४०, प्र. के. आर. काशीकर, प्र. ठि. शारदाकार्यालय, सांगली. प्र. ता. १३।१।२५ साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. १ रु. प्रती १०००; मु. डी. जी. सडेकर,

वंदे जिनवरं प्रेस, निपाणी व धनंजय प्रेस, खानापूर. इ. स. १९२४ सालीं महाराष्ट्रांत जी राजकीय, सामाजिक, औद्योगिक स्थिति होती तिचें चित्र या पुस्तकांत रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. यांत निरनिराळीं अशीं पत्रें आहेत. प्रत्येक पत्रांत एका विषयाची चर्चा केली आहे.

कविकाव्यसूचि—ले. भावे व्ही. एल्. प्र. लेखक. प्र. ठि. ठाणें. प्र. ता. २१।१२।२४, साईझ डेमी ८ पेजी; आवृत्ति १ ली, किं. १ रु. प्रती ५०० मु. डी. के. फडके, अरुणोदय प्रेस ठाणें. सुमारें ६७५ महानुभावपंथी व त्यांनीं केलेले सुमारें पांचहजार ग्रंथ यांची ही सूचि अत्यंत परिश्रमपूर्वक तयार केली आहे.

कालिदासानें न लिहिलेलें नाटक—ले. परांजपे एस्. एम्. पृ. २८, प्र. ठि. पुणें. प्र ता. १५।२।२५, साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे, प्रती ५००. मु. एस्. एम्. परांजपे; गोवर्धन प्रेस, पुणें शहर. कालीदासाच्या शाकुंतल नाटकावरील ही टीका आहे. कालिदास वाचकांच्या कल्पनाशक्तिवर मोठ्या कौशल्यानें कांहीं गोष्टी कशा सोंपवितो हें यांत दाखविलें आहे; व अशा प्रकारें शाकुंतल नाटकांत कोणत्या गोष्टी वाचकांच्या कल्पनाशक्तीवर या महाकवीनें सोंपविल्या आहेत याचें वर्णन लेखकानें दिलें आहे.

केसरीवरील खटला— पृ. ८४; प्र. एस्. व्ही. बापट, प्र. ठि. पुणें शहर; प्र. ता. २।९।१९२४; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली; किं. ६ आणे. प्रती २१००. मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ, पुणें शहर. टिळकांवरील १९०६ चे खटल्यासंबंधानें केसरींत जी टीका आली होती, तिजबद्दल संपादक रा. केळकर यांजवर कोर्टाची बेअदबी केल्याबद्दल खटला केला होता. त्या खटल्याची हकिकत, रा. केळकर यांनीं आत्मसंरक्षणार्थ केलेलें भाषण, वर्तमानपत्रांचीं या खटल्यासंबंधाचीं

मतें वगैरे माहिती या पुस्तकांत आली आहे.

केळकरांचे लेख, खंड १ ला.— पृ. ३८९, प्र. एस्. व्ही. औटी; प्र. ठि. श्रीभारतप्रकाशन कार्यालय, ५३८ शनिवार पेठ, पुणें शहर. प्र. ता. ६।३।१९२५; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली. किं. २ रु. प्र. २०००; मु. ए. एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ, पुणें शहर. शिक्षणाच्या बाबतींत केसरीचे संपादक रा. केळकर यांनीं जे निरनिराळे लेख लिहिले आहेत ते सर्व एकत्र करून या पुस्तकांत प्रसिद्ध केले आहेत.

कोदंडाचा टणत्कार--ले. ठाकरे के. एस्. पृ. १६८, प्र. लेखक; प्र.ठि. दादर मुंबई; प्र. ता. २५।४।२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति २ री; किं. १॥ रु. मु. एल्. बी. कोकाटे; हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ पुणें शहर; प्रती २०००. सन १९१७ सालीं इतिहाससंशोधक रा. राजवाडे यांनीं चतुर्थसंमेलनवृत्तांत ' कायस्थ धर्मदीप ' नांवाच्या उल्लेखांत चांद्रसेनीय कायस्थ प्रभुज्ञातीविषयीं कांहीं विधानें केलीं होतीं, त्यांना हें उत्तर रा. ठाकरे यांनीं या वेळीं दिलें होतें. त्याची ही वाढविलेली २ री आवृत्ति आहे.

खादीरहस्य—पृ. ३४, प्र. बाळाप्पा बोदाडे, प्र. ठि. दावणगिरी, (म्हैसूर स्टेट); प्र. ता. २४।१२।२४; साईझ क्राऊन ८ पेजी, आवृत्ति १ ली. किं. ३ आणे, प्रती २०००, मु. डी. के. ठाकूर, तरुण भारत प्रेस, बेळगांव. प्रश्नोत्तररूपानें खादीचे धार्मिक, सामाजिक व आर्थिक उपयोग काय आहेत हें सांगितलें आहे. हें कानडी पुस्तकाचें भाषांतर आहे.

गलित पुष्पें— ले. परळकर, एल्. व्ही. पृ. १५; प्र. लेखक. प्र. ठि. डामर लेन, ग्रँट रोड मुंबई; प्र. ता. ५।२।१९२५, साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. २ आणे, प्रती १०००, मु. बी. आर. कद्रेकर, रवींद्र प्रिंटिंग वर्क्स, आंबेवाडी मुंबई नं. ४. मुलांचे अकालीं मृत्यूसंबंधानें यांत विचार केला आहे.

गुरुवर्य डॉ. भांडारकर (कांहीं आठवणी व परिचयकाळांतील अनुभव)—प्र. डी. पी. वैद्य, प्र. ठि. प्रार्थनासमाज, गिरगांव मुंबई, प्र. ता. २३ आक्टोबर १९२५; साईझ रॉयल ८ पेजी, आवृत्ति १ ली, (सचित्र); किं. दाखल नाहीं. प्रती २००; मु. एस. टी. आजगांवकर, मनोरंजन प्रेस, गिरगांव मुंबई.

गृहिणीभूषण—ले. श्री. गिरिजाबाई केळकर, पृ. ७२, प्र. लेखिका प्र. ठि. जळगांव (पूर्वखानदेश), प्र. ता. ६।७।१९२५; साईझ क्राऊन १६ पेजी; आवृत्ति ५ वी, किं. ८ आणे. प्रती २०००; मु. ए. व्ही. पटवर्धन, आर्यभूषण प्रेस, बुधवार पेठ, पुणें शहर. गृहिणीनें संसारांत कसें वागावें हें यांत दाखविलें आहे.

चोराच्या उलट्या बोंबा, पुस्तक १ लें—ले. पार्शी एस्. एस्. पृ. १८; प्र. पार्शी एस्. एस्. प्र. ठि. कामाठीपुरा लेन, मुंबई. प्र. ता. १७ नोव्हेंबर १९२५; साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली. किं. दाखल नाहीं. प्रती ५००; मु. एस्. टी. आजगांवकर, मनोरंजन प्रेस, सँढर्स्ट रोड, मुंबई. प्रथम तेलगु संमेलनाच्या विरुद्ध झालेल्या तक्रारीला हें उत्तर आहे.

जोतिप्रणीत शुभवर्तमान, भाग १ ला.—संग्राहक जी. एम्. नलवडे, प्र. जी. एम्. नलवडे, प्र. ठि. नारायण पेठ, पुणें शहर. प्र. ता. १५।९।१९२५, साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली. किं. १॥ आणा. प्र. २०००; मु. जी. व्ही. गोखले; नारायण प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर. कै. जोतिबा फुले यांचीं मतें हिंदुधर्माच्या विरुद्ध कशीं होतीं हें यांत दाखविलें आहे.

जोतिबा फुल्यांच्या पुतळ्याचा बोजवारा—पृ. २४; प्र. जी. एम्. नलवडे, प्र. ठि. नारायण पेठ, पुणें शहर. प्र. ता. ५।९।२५; साईझ क्राऊन,

आवृत्ति १ ली, किं. दीड आणा, प्रती २०००; मु. जी. व्ही. गोखले, नारायण प्रेस, शनिवार पेठ, पुणें शहर. स्वर्गवासी जोतिबा फुले (सत्यसमाजाचे आद्यप्रवर्तक) यांचा पुतळा करावा असा ठराव पुणें म्युनसिपॅलिटीपुढें एका सभासदानें आणला होता. तो बहुमतानें नामंजूर झाला. त्या वादविवादाची हकिकत या छोट्या पुस्तकांत दिली आहे.

डबलबार—ले. केतकर जी. व्ही. प्र. लेखक, प्र. ठि. १०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर. प्र. ता. २८।७।१९२५; साईझ क्राऊन १६ पेजी. आवृत्ति १ ली. (सचित्र); किं. १० आणे. प्रती २०००; मु. एस. एन्; जोशी; चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ; पुणें शहर.

तिसरी महाराष्ट्र प्रांतिक परिषद १९२४—पृ. ७९, प्र. देवकीनंदन नारायण, प्र. ठि. जळगांव, जिल्हा पूर्व खानदेश, प्र. ता. १।१।१९२५, साईझ डेमी ८ पेजी, आवृत्ति १ ली, किं. दाखल नाहीं. प्रती ७००. मु. एस्. एन्. जोशी, चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर. श्रीगंगाधरराव देशपांडे यांच्या अध्यक्षतेखालीं जळगांव येथें भरलेल्या अधिवेशनाची हकीकत यांत दिली आहे.

दुसऱ्या व तिसऱ्या सुधागड तालुकासभांचा रिपोर्ट—पृ. ९०, प्र. पुरुषोत्तम एस्. आठवले, प्र. ठि. पाली, जि. कुलाबा, प्र. ता. २९।१२।२४, साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. कांहीं नाहीं. प्रती १०००. मु. के. आर. गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, ५०७ शनिवार पेठ, पुणें शहर.

देशाचे दुष्मान—ले. दिनकरराव जवळकर, पृ. ६४, प्र. के. एन्. जेधे, प्र. ठि. जेधे मॅनशन, पुणें शहर, प्र. ता. २३ ऑगष्ट १९२५, साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे. प्रती २०००. मु. आर. एन्. लाड, शिवाजी प्रेस, ५५६ सदाशिव पेठ, पुणें शहर. लो. टिळक, कै. विष्णुशास्त्री

चिपळुणकर व इतर ब्राह्मण हे देशाचे शत्रु आहेत हें यांत प्रतिपादन केलें आहे. या पुस्तकाबद्दल लेखकावर फौजदारी खटला झाला होता.

पहिलें शारदोपासक संमेलन—ले. राजवाडे व्ही. के. पृ. ३१, प्र. जी. जी. अधिकारी, प्र ठि. सदाशिव पेठ, पुणे शहर. प्र ता. १७।५।१९२५; साईझ क्राऊन १६ पेजी, आवृत्ति १ ली, किं. दाखल नाहीं. प्रती १२५०. मु. एल्. बी. कोकाटे, हनुमान प्रेस, सदाशिव पेठ पुणें. शारदोपासक मंडळाचें अधिवेशन पुण्यास झालें होतें. त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं केलेलें भाषण यांत दिलें आहे. यांत मराठी भाषेची सद्यःस्थिति व ती सुधारण्याचे उपाय सांगितले आहेत.

पाठारे क्षत्रियसमाज (अष्टागड) व पाठारे क्षात्रमंडळ—ले. म्हात्रे आर. सी. पृ. १२, प्र. लेखक. प्र. ठि. सासवणें, प्र. ता. १२।९।१९२५, साईझ रॉयल १२ पेजी, आवृत्ति १ ली, किं. दाखल नाहीं. प्रती ५००. मु. ए. व्ही. पवटर्धन, आर्यभूषण प्रेस, बुधवार पठे पुणें शहर.

प्रबोधन पाक्षिकांतल्या निवडक लेखांचे नमुने—ले. ठाकरे के. एस्. पृ २२, प्र. लेखक, प्र. ठि. सदाशिव पेठ, पुणें शहर, प्र. ता. १।३।२५, साईझ क्राऊन, आवृत्ति १ ली, किं. ४ आणे. प्रती ९००. मु. के. एस्. ठाकरे, प्रबोधन प्रेस, ३४५ सदाशिव पेठ, पुणें शहर.

पैशाचा बाजार—ले. ब्राम्हे के. व्ही. पृ. ३१; प्र. सेक्रेटरी, बेरार कोऑपरेटिंङ्ग इन्स्टिटयूट्; प्र. ठि. बडोदा, प्र. ता. ३१ आक्टोबर १९२५, साईझ डबल क्राऊन १६ पेजी; आवृत्ति १ ली, किं. ३ आणे; प्रती १०००. मु. एम्. एन्. कुलकर्णी, कर्नाटक प्रेस, ३१८ अ, ठाकूरद्वार मुंबई.

पोष्टाची माहिती—ले. चोळकर व्ही. के. पृ. ४४, प्र. लेखक. प्र. ठि. ५८५ कसबा पेठ, पुणें शहर; प्र. ता. १२।१२।१९२४; साईझ डबल क्राऊन १६ पेजी, आवृत्ति २ री, किं. ४ आणे, प्रती ५०००. मु. ए.

एस्. गोखले, विजय प्रेस, ५७० शनिवार पेठ, पुणें शहर.

बजरंगी सोटा—ठाकरे के. एस्. प्र. लेखक, प्र. ठि. पुणें शहर, पृ. ५२; प्र. ता. २१।७।१९२५; साईझ फूलस्कॅप १६ पेजी, आवृत्ति १ ली; किं. १ आणा. प्रती ५०००. मु. के. एस्. ठाकरे, प्रबोधन प्रेस, सदाशिव पेठ, पुणें शहर. यांत मुंबई येथील बावला यांच्या खुनाच्या खटल्यांत इंदोरच्या महाराजांचा कांहीं संबंध नाहीं हें दाखविण्याकरितां प्रबोधन मासिकांत जे लेख लिहिले होते तेच एकत्र छापलेले आहेत.

